

सोलापूर तरुण भारत
आसमंत

# नेतृत्वविकासाची कार्यशाळा

**निमित्त**
**मोहन शेटे**

गणेशोत्सवामध्ये रंग भरत असताना, भाविक या उत्सवाचा भरभरून आनंद लुटत असताना प्रत्येक भाविक सुखावतो आहे. हा संपूर्ण काळ गणेशाच्या पूजनात, आराधनेत रममाण होण्याचा, विविध कलांचा आस्वाद घेण्याचा, सांघिक शक्तीची अनुभूती घेण्याचा आहेच; त्याचबरोबर इतिहासात डोकावून याचे मूळ स्वरूप अभ्यासण्याचाही आहे. कारण कधी कधी इतिहासाच्या कवाडामध्ये डोकावून बघताना आजसाठी मौल्यवान ठरणारा ठेवा हाती येण्याची दाट शक्यता असते. म्हणूनच हा प्रयत्नही व्हायला हवा. हा उत्सव अगदी पेशवेकाळापासून सुरू असल्याचे आपण जाणतो. तसे ऐतिहासिक पुरावे आपल्याला सापडतात. मुळात पेशवे गणेशभक्त होते. शनिवारवाड्यात गणेशमहाल होता, गणपतीची मूर्ती होती आणि भाद्रपदात तिथे गणपती बसवला जायचा, हे आपण जाणतो. केवळ पेशव्यांकडेच नव्हे तर विविध सरदारांकडेही गणपती बसायचा आणि प्रतिष्ठापना व्हायची. सभागृहामध्ये वा महालात १० दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जायचे. त्यासाठी अगदी दूरवरून म्हणजे उत्तरभारतातूनही गायक, वादक, नर्तक कला सादर करायचे.

इतकेच नव्हे, तर गणेशाची विसर्जन मिरवणूकही देखणी असायची. हल्लीच्या काळात मानाच्या गणपतींचा असतो, तसा त्याकाळीही विसर्जनाचा क्रम ठरलेला असायचा. ही काही आजची बाब नाही तर पुण्यामध्ये हे फार पूर्वीपासून सुरू आहे. अर्थात तेव्हाचा उत्सव वैभवशाली असला, तरी तो एखाद्या कुटुंबापुरता, घरापुरता मर्यादित असायचा. आत्ताचा उत्सव मात्र वेगळा आहे. त्याचे सार्वजनिक रूप सगळ्यांना परिचित आहे.

१८९३ मध्ये गणपतीच्या अशा स्वरूपाच्या साजरीकरणाची सुरुवात झाली. त्यावर्षी पुण्यात पहिल्यांदा तीन सार्वजनिक गणपती बसले. पुण्यामध्येच असणारे लोकमान्य टिळक हे सगळे बघत होते. त्यांचे वेगळेपण हे की, या उत्सवाची ताकद त्यांनी ओळखली आणि हा उत्सव इंग्रजांविरोधात म्हणजेच भारताच्या पारतंत्र्याविरोधात एखाद्या शस्त्राप्रमाणे उपयोगी पडत असल्याचे मर्म त्यांनी जाणले. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली होती. त्यानिमित्ताने राजकीय कारणासाठी भारतीय समाज प्रथमच एकत्र येण्यास सुरुवात होत होती. शत्रू एक असणे, हे एकत्र येण्यामागील महत्त्वाचे कारण होते. मात्र शत्रू हे एकात्मतेचे सूत्र असणे योग्य नसल्याचे टिळक जाणून होते. कारण उद्या शत्रू देश सोडून गेला तर एकत्र आलेला समाज पुन्हा दूर जाण्याचा धोकाही त्यांना समजत होता. सवारना एकत्र बांधण्यासाठी त्यांना एका सूत्राची गरज जाणवत होती. म्हणूनच त्यांनी सांस्कृतिक एकात्मता साधली. त्यामुळेच टिळकांच्या राष्ट्रवादाचे प्रतीक म्हणूनच सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख केला जातो.



> **गणेशोत्सवात रंग भरत असताना या सणाच्या संपन्न इतिहासाची दखलही घ्यायला हवी. अगदी पेशव्यांच्या काळापयरत याचे संदर्भ पोहोचतात. कालांतराने या उत्सवाने स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी जनशक्ती सज्ज केली आणि अनेकांमधील नेतृत्वगुणांना चालना देण्याचे काम केले. याच उत्सवात अनेक कलाकारांना ओळख निर्माण करण्याची संधी मिळाली. आजचा उत्सवही समाज एकत्र आणण्याचे काम करतो आहे. ही कार्यशाळाच आहे.**

भारतावर मूठभर इंग्रजांना राज्य करणे शक्य होण्यामागील एक कारण भेदाभेद हे होते. जाती, भाषा, प्रांतांमधील भेदाभेद मोठा होता. तो नाहीसा करण्यासाठीही या उत्सवाचा उपयोग होणार असल्याचे टिळकांच्या लक्षात आले. म्हणूनच त्यांच्या पुढाकाराने उत्सवाला असे रूप प्राप्त झाले तेव्हा परिसरात राहणारी सगळी मंडळी जाती-पातीचा विचार न करता एकत्र येऊ लागली. इथे प्रत्येकाला कौशल्याप्रमाणे मांडव घालण्याचे, पूजा करण्याचे, सजावटीचे, सादरीकरणाचे काम मिळू लागले.

थोडक्यात, गणपतीचे काम करता करता भेदाभेद गळून पडण्याचे, येणे- जाणे वाढवण्याचे उद्दिष्टही त्यांच्यापुढे होते. तिसरा मुद्दा म्हणजे टिळक वकील होते. कायद्याचे चांगले अभ्यासक होते. सार्वजनिक ठिकाणी एकत्र येऊन देशाबद्दल, पारतंत्र्याबद्दल बोलणे अवघड असल्याचे ते जाणत होते. मात्र ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता गेल्यानंतर राणीने काढलेला जाहीरनाम्याचा वापर कसा करून घ्यायचा, यासंबंधी त्यांचा पक्का विचार होता. या जाहीरनाम्याद्वारे राणीने आम्ही तुमच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही, असे आश्वासन दिले होते.

टिळकांसारख्या वकिली बाण्याच्या माणसाने याचा लाभ उठवला आणि धार्मिक कारणांसाठी लोकांना एकत्र आणणे शक्य असल्याचे हेरून या संधीचा यथोचित उपयोग करून घेतला. आधी लोकांना एकत्र आणण्याच्या हेतूनेच त्यांनी उत्सवाला वेगळे रूप दिले आणि पुढे यातूनच कडवी देशभक्ती मनामनांत रुजत गेली. जसे की, चापेकर बंधू क्रांतिकारक होते तसे उत्तम कवीही होते. त्यांनी गणपती उत्सवातील मेळ्यांमधून गाणे गायल्याचे संदर्भ सापडतात. १९०५ मध्ये विसेक वषारच्या असणाऱ्या सावरकरांनीही पोवाडे लिहिल्याचे दिसते.

आधी गणपती उत्सव आणि त्यानंतर शिवजयंती उत्सवांमधून अशा गीतांचे, पोवाड्यांचे सादरीकरण व्हायचे, व्याख्याने व्हायची, चर्चा झडायच्या. त्यामुळेच चापेकर वा सावरकरांना समाजाला जागृत करण्यासाठी गणेशोत्सवाचे व्यासपीठ मिळालेच नसते, तर किती नुकसान झाले असते, याचा विचार आज करायला हवा आणि स्वातंत्र्याची प्रेरणा देणाऱ्या या व्यासपीठाचा मान प्रत्येकाने राखायला हवा.

गणेशोत्सवाने केलेले हे फार मोठे काम विसरता कामा नये. स्वातंत्र्योत्तर काळानंतरचा गणेशोत्सवही अनेक कलावंतांना व्यासपीठ मिळवून देणारा होता. आता आपण गणपती बघायला घराबाहेर पडतो. पण पूर्वी लोक वेगवेगळ्या कार्यक्रमांना हजेरी लावण्यासाठी घराबाहेर पडायचे. यायोगे सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हायचे. यातून हिराबाई बडोदेकर, गजाननराव वाटवे, सुधीर फडके आदी मंडळी समाजासमोर आली. गणेशोत्सवाचे हे फार मोठे बलस्थान विसरून चालणार नाही. आजही हे महत्त्व अबाधित आहे. काही जण यानिमित्ताने होणाऱ्या उधळपट्टीवर आक्षेप घेतात, टीका करतात. पण शेवटी कोट्यवधींच्या उलाढालीद्वारे आपल्याच लोकांना पैसे मिळतात हे विसरून चालणार नाही. खेरीज पैसा बाजारात फिरण्यामध्ये सवारचेच भले असते.

देश, समाजापासून व्यक्तीपयरत सर्व घटकांसाठी ती अत्यावश्यक बाब असते. या १० दिवसांच्या उत्सवकाळात होणाऱ्या उलाढालीतून, मिळणाऱ्या उत्पन्नातून काही घरांमध्ये मोठ्या काळासाठी आर्थिक विवंचना मिटते. अगदी गणपतीची मूर्ती तयार करणाऱ्या कारागिरांपासून सजावट करणारे, फळे-फुले विकणारे, खाद्य पदाथारची विक्री करणारे असे अनेक छोटे-मोठे व्यावसायिक या काळात चांगले पैसे मिळवतात. या काळात शेकडो प्रकारचे व्यवसाय चांगला नफा मिळवून देतात. बाजारातील उत्साह वाढवणारा उत्सव म्हणूनही याकडे आज बघावे लागते.

पारतंत्र्याच्या काळात गणेशोत्सवाच्या माध्यमातून लढणारे नेते पुढे आले आणि पुढे तेच संपूर्ण समाजाचे नेते झाले. मात्र, आताही या संधीची गरज आपण ओळखायला हवी. कारण नेतृत्वगुण समजण्यासाठी नेहमी अशा उत्सवांचा उपयोग होत असतो. शाळेमध्ये विविध विषयांची परीक्षा घेता येते. मैदानावर खेळांमधील कौशल्य दाखवता येते. पण एखाद्या मुलाकडे वा मुलीकडे नेतृत्वगुण आहे, हे दाखवण्याची संधी कुठे मिळणार हा खरा प्रश्न असतो. याचे उत्तर आजच्या गणेशोत्सवासारख्या सणामध्येच मिळते. एखादे मूल अन्य बाबतीत मागे असले, तरी १० मुलांकडून काम करवून घेते, इतरांची कौशल्ये ओळखून कामाचे वाटप करते, निर्णय घेते तेव्हा त्याच्यातील नेतृत्वगुणांचे दर्शन घडते. त्यातच भविष्यातील चांगला नेता होण्याची शक्यताही सापडते.

आजही गणेशोत्सवातून पुढे येऊन चांगले काम करणारे नेते आपल्याला पाहतो. गेल्या काही वषारमध्ये आमदार, खासदारपदे भूषवणाऱ्यांना आपण ओळखतो. थोडक्यात, अशी अनेक व्यक्तिमत्त्वं गणेशोत्सवातून पुढे आली आहेत. म्हणूनच 'नेतृत्वविकासाची कार्यशाळा' म्हणूनही या उत्सवाकडे बघता येईल.

आज अनेक गणेश मंडळे केवळ १० दिवसच नव्हे, तर वर्षभर अनेक विधायक कार्यक्रम राबवतात. एक प्रकारे मंडळांमध्ये विधायक कामांची स्पर्धाही बघायला मिळते. यातून वृक्षारोपण, वृद्धाश्रमांना भेटी देणे, रक्तदान शिबिरांचे आयोजन, पूरग्रस्तांना मदत असे अनेक उपक्रम आकार घेतात. कोरोना काळात गणेश मंडळांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका आपण विसरलेलो नाही.

(पान ४ वर)

# जागतिक शक्ती समीकरणांची नवी केंद्रे

**लक्ष्यवेध**
**पंकज जयस्वाल**

कोरोनानंतर जगाची गतिमानता बदलली, जेव्हा भारताने करुणा, सामायिकरण तसेच वैज्ञानिक आणि तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन करत लसींचे जलद उत्पादन केले. भारताने या लसी संपूर्ण जगालाही जलद गतीनेच पोहोचवल्या. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान लष्कराची ताकद दाखवण्यात आली. त्यावेळची अचूकता, वेग आणि तांत्रिक एकात्मता हे गेल्या दहा वर्षांत भारताने विकसित केलेल्या ताकदीचे प्रदर्शन होते.

**'ब्रिस'मुळे जागतिक पातळीवरील गतिमानता कशी बदलत आहे?**

उदयोन्मुख अर्थव्यवस्था सध्या विद्यमान शक्तींच्या वर्चस्वाला आव्हान देत आहेत. यामुळेच एकविसाव्या शतकातील जागतिक शक्तींच्या गतिमानतेत लक्षणीय बदल होत आहे. या बदलामुळेच जागतिक व्यवस्थेमध्ये एकध्रुवीय ते बहुध्रुवीय असे स्थित्यांतर होत आहे. चीन, भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या उदयोन्मुख अर्थव्यवस्था असून, हे देश राजकीय, तांत्रिक आणि आर्थिक क्षेत्रात सातत्याने शक्तीप्रदर्शन करत आहेत. या देशांचा वाढता 'जीडीपी', विकसित होणारे व्यापार नेटवर्क आणि 'जी २०' आणि 'ब्रिस'सारख्या बहुपक्षीय संघटनांमध्ये नेतृत्व यावरून यावरून ते महत्त्व अधोरेखित होते.

भारताला अधिक गुंतागुंतीच्या आणि गतिमान भूराजकीय वातावरणावर मात करावी लागेल आणि विकसित होत असलेल्या जागतिक व्यवस्थेबाबत कठोर निर्णयही घ्यावे लागतील. हे लक्षात घ्या की, २०१० सालच्या दशकाच्या सुरुवातीला, क्रयशक्ती समता (पीपीपी)द्वारे मोजला जाणारा चीनचा जीडीपी अमेरिकेपेक्षा जास्त होता. 'पीपीपी'नुसार २०१८ साली जागतिक 'जीडीपी'मध्ये 'ब्रिस' देशांचे प्रमाणही 'जी ७' देशांपेक्षा जास्त होते. 'ब्रिस'मध्ये




> **सध्या जागतिक राजकारणामध्ये प्रचंड उलथापालथ सुरू असून, सातत्याने अनेक विकसनशील देश अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला आव्हान देत आहेत. यामुळे विविध नवीन युत्यांचा आणि संघटनांचा जन्म होत असून, काहींच्या प्रभावामध्ये वाढ होत आहे. 'ब्रिक्स'ही त्यापैकीच एक संघटना. त्यानिमित्ताने बदलत्या या जागतिक परिस्थितीचा हा आढावा...**

नंतर इजिप्त, इथिओपिया इराण, संयुक्त अरब अमिराती आणि इंडोनेशिया यांचा समावेश झाला आणि त्यात आणखी विस्तार करण्याचा विचार सुरू आहे. 'ब्रिक्स'चा वितार हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. 'ब्रिस' आणि 'जी ७' राष्ट्रांमधील दरी आणखी वाढली आहे. सुरुवातीच्या २० टक्क्यांवरून ब्रिस + देश आज जगातिक तेल उत्पादनाचा ४३ टक्के वाटा उचलतात. याव्यतिरिक्त, 'ब्रिस +'ने नवीन विकास बँका आणि इतर संस्थांच्या निर्मितीची योजनाही जाहीर केली आहे.

**जग एकध्रुवीय होण्याऐवजी बहुध्रुवीय का होत चालले आहे?**

अमेरिकन राजकीय अभ्यासक जोसेफ नाय ज्युनियर यांनी त्यांच्या कामात, स्मार्ट पॉवर-हार्ड आणि सॉफ्ट पॉवरला यशस्वी रणनीतीमध्ये एकत्र करण्याची क्षमता ही कल्पना मांडली. लाखो वर्षांपूर्वी गुहांमधून बाहेर पडल्यापासून, एकविसाव्या शतकात मानवता अधिक सुसंस्कृत झाल्याचे मानले जाते. आपल्यातील बहुतेक प्राणीमात्रांचा अविचारीपणा सोडून समकालीन भूराजकीय परिस्थितींना तोंड देण्यासाठी, कठोर शक्तीऐवजी सॉफ्ट पॉवरवर महत्त्वाची मानली गेली आहे. जोसेफ नाय यांचा असा युक्तिवाद आहे की, सॉफ्ट पॉवर ही सक्ती नाही आणि बदल घडवून आणण्यासाठी परराष्ट्र धोरण, राजकीय मूल्ये आणि संस्कृतीचा वापर करता येतो.पण प्रत्यक्षात काही दशके जगावर राज्य केल्यानंतर, अमेरिकेच्या नेतृत्वाखालील स्वार्थी राजकीय शक्ती आणि अधिकारी विकसनशील, लहान, कमकुवत आणि भ्रष्ट राष्ट्रांना त्यांच्या स्वार्थासाठी आणि नियंत्रित करण्यासाठी कठोर शक्तीचा वापर करत आहे. अमेरिकेचे हे धोरण पूर्णपणे निराशाजनक आणि घृणास्पद असेच. प्रत्येक देश किंवा प्रदेशाचा स्वतःचा इतिहास, संस्कृती, श्रद्धा, वैशिष्ट्ये इत्यादी गोष्टी त्यांच्या स्वतःच्या परिस्थिती, विकासाचा वेग, शिक्षणाचा स्तर आणि त्यांच्या स्वतःच्या देशवासीयांच्या संगोपनावर आधारित असतात. त्यामुळेच अमेरिकेने पाश्चात्य राजकीय विचारसरणी इतरांवर लादण्यासाठी बळाचा वापर करणारे त्यांचे गर्विष्ठ, आक्रमक आणि वर्चस्ववादी वर्तन थांबवले पाहिजे. अमेरिकेच्या संकुचित विचारसरणीच्या आणि काही कमकुवत दूरदृष्टी असलेल्या नेत्यांनी, देशाला धोकादायक परिस्थितीत टाकले आहे. दुसर्या आखाती युद्धामुळे आणि अफगाणिस्तानातील अनपेक्षित संघर्षामुळे आज अमेरिका, एका अनियंत्रित बैलासारखी दिसते. जी वेगवेगळ्या भूप्रदेशात त्यांच्या मार्गातील सर्व काही नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. अमेरिकेच्या अफगाणिस्तानातून घाईघाईने बाहेर पडण्याने, अनेक विकसनशील देशांना अमेरिकेच्या शक्तीचे आणि कमकुवत दुव्यांचे मूल्यांकन करणे शक्य झाले. दक्षिण अमेरिकेतील काही देशांना हे समजले आहे की, त्यांना आता अमेरिकेकडून भीती वाटून घेण्याचे काही कारण नाही. शिवाय, अनेक उदयोन्मुख राष्ट्रांनाही आता वाटते की, जगातील सर्वांत शक्तिशाली राष्ट्राच्या अधिकाराला आव्हान दिले जाऊ शकते. दहशतवाद, अमली पदार्थांची तस्करी, मनी लॉण्डरिंग, महासागर आणि जमिनींचे प्रदूषण यांसारख्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या जागतिक समस्यांसोबतच, जागतिकीकरणाने हवामान बदल, सायबर सुरक्षा आणि अंतराळ सुरक्षा यांसारख्या नव्या संकटांनाही जन्म दिला. वरील समस्यांचे निराकरण स्पर्धात्मक नसून, सहकार्यात्मक असले पाहिजे. जर देशांमधील सध्याची दरी कायम राहिली, तर ते या समस्यांचे निराकरण करू शकणार नाहीत. 'न्यू ग्लोबल डायनॅमिस' या बदलांचे परिणाम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था आणि निर्णय घेणाऱ्यांना येणाऱ्या नवीन अडचणी यांचे परीक्षण करते. ते उद्योग, व्यापार आणि वित्त क्षेत्रांतील बदलत्या गतिमानतेचा शोध घेतात आणि हे बदल जागतिक अर्थव्यवस्थेवर, जागतिकीकरणाच्या भविष्यावर, आंतरराष्ट्रीय शक्ती संरचनांवर आणि बाजारातील प्रतिस्पर्ध्यांवर कसा परिणाम करत आहेत ते पाहतात. जागतिक व्यवस्थेतील बदलांवर परिणाम करणाऱ्या मुख्य घटकांपैकी एक म्हणजे, अजूनही महान शक्तींचा उदय आणि र्हास. चीनचा वाढता प्रभाव, जागतिक निर्णयांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागाची मागणी करत आहे. त्याचे हित अधिक व्यापकपणे परिभाषित करत आहे. भारत अनेक राष्ट्रांसोबत मजबूत आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करताना, आपली लष्करी आणि आर्थिक शक्ती वाढवून आपली दृढता दाखवत आहे. आंतरराज्यीय व्यवस्थेत आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी, तुलनेने कमकुवत असलेली अमेरिका मागे हटत आहे. या वेगवेगळ्या देशांच्या परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी कशी केली जाते, यावर ही समीकरणे बदलत आहे. अमेरिकेला त्यांच्या अदूरदर्शी आणि संकुचित विचारसरणीच्या परराष्ट्र अधिकाऱ्यांमुळे, अनिश्चित परिस्थितीत ढकलण्यात आले आहे.

(पान ४ वर)

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# रौद्र हिमालय; निसर्गप्रकोप थांबविण्याचे आव्हान

**निसर्गाचे एक चक्र असते. त्याचे संतुलन महत्त्वाचे असते. त्याच्याशी छेडछाड करण्याचा प्रयत्न केल्यास निसर्ग जोरदार तडाखा देतो. हिमालयात गेल्या काही वर्षांत घडलेल्या ढगफुटी, हिमनद्या वितळणे, मोठे पूर, भूस्खलन अशा घटनांतून निसर्गाने आपले रौद्र रूप दाखवून दिले आहे. केवळ हवामान बदलावर या घटनांचे खापर फोडून मोकळे होता येणार नाही, तर माणसाने नैसर्गिक संतुलन राखण्याचे आव्हान आता तरी पेलले पाहिजे.**

अलिकडेच उत्तराखंड राज्यात घडलेल्या घटनेमुळे निसर्गाचे संतुलन बिघडविण्यास हातभार लावणाऱ्यांनी डोळे उघडायला हवेत. केदारनाथच्या जोशी मठात झालेल्या घटनेची ही पुनरावृत्ती होती. अवघ्या ३७ सेकंदात इकडचे जग तिकडे होते. गावेच्या गावे वाहून जातात. माणसे, इमारती नाहीशा होतात; यामागे काय कारणे आहेत आणि हिमालय किती धोकादायक आहे, याचा अभ्यास करायला हवा. भारतीय शास्त्रज्ञांनी हिमालयातील ५० हिमनदी तलावांना 'अत्यंत धोकादायक' म्हणून संबोधले आहे. २०१३ मध्ये केदारनाथ येथे किंवा गेल्या वर्षी सिक्कीममध्ये घडलेल्या घटनांप्रमाणे मोठ्या प्रमाणात हिमनदी तलाव फुटून पूर येण्याची शक्यता आहे. आता तर अशा आणखी ३२४ तलावांना 'अत्यंत धोकादायक' म्हणून वर्गीकृत केले गेले आहे.

सिक्कीममधील दक्षिण ल्होनाक, हिमाचल प्रदेशातील समदार तापू आणि लडाखमधील काही तलाव हे उच्च ते अत्यंत धोकादायक क्षमतेच्या जलस्रोतांमध्ये आहेत. रोपार येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'तील संशोधकांनी मूळ हिमनदीशी थेट जोडलेले ८५१ हिमनदी तलाव ओळखले, त्यापैकी ५५० हून अधिक मध्यम (१९८), उच्च (३२४) आणि अत्यंत उच्च (५०) धोका निर्माण करतात. ते २३२ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरले आहेत. हे तलाव भारतात तसेच चीन (तिबेट स्वायत्त प्रदेश), भूतान आणि नेपाळसारख्या इतर हिमालयीन देशांमध्ये आहेत. उंच पर्वतीय प्रदेशांमध्ये वाढते तापमान, हिमनद्यांचे विघटन आणि हिमनदी तलावांच्या उद्रेकामुळे येणारे पूर हे चिंतेचे एक प्रमुख कारण बनले आहे.

वाढती लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक विकास उपक्रमांमुळे या नाजूक पर्वतीय वातावरणाला आणखी अस्थिर केले आहे. त्यामुळे हिमनद्यांच्या तलावांचा उद्रेक वाढला आहे. २०१३ मधील चोराबारी तलावाचा उद्रेक किंवा गेल्या वर्षी दक्षिण लोनाक तलावामुळे आलेल्या पुरामुळे गंभीर नुकसान झाले होते. अशा तलावांची असुरक्षितता निश्चित करण्यासाठी रीत कमल तिवारी, अंकित त्यागी आणि दीपाली गायकवाड या त्रिकुटाने त्यांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचे परीक्षण केले. त्यांनी भूतकाळातील अशा पुरांच्या वारंवार समोर येणाऱ्या कारणांचा अभ्यास करून अहवाल दिला. त्यात १२ निष्कर्ष काढले.

विश्लेषणातून दिसून आले की उच्च-धोकादायक तलावांची संख्या भारतात १००, त्यानंतर नेपाळमध्ये ५२ आणि भूतानमध्ये ५० इतकी आहे. 'खूप जास्त धोका' म्हणून वर्गीकृत केलेल्या तलावांमध्ये सामान्यतः सर्वात मोठे तलाव आणि हिमनदी क्षेत्र असते. 'रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन्सः सोसायटी अँड एन्व्हायर्नमेंट' या जर्नलमध्ये त्यांचा हा अहवाल प्रसिद्ध झाला आहे.





मध्य हिमालयात (१५१ तलाव), त्यानंतर पूर्वेकडील (१४८) आणि पश्चिमेकडील प्रदेशामध्ये (७०) उच्च-जोखीम असलेले तलाव मोठ्या प्रमाणात आहेत. अभ्यासानुसार, जम्मू आणि काश्मीर आणि लडाखमध्ये सर्वाधिक (६२) तलाव आहेत. त्यानंतर सिक्कीम (१७) आणि अरुणाचल प्रदेश (१२) आहेत. राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाने केंद्रीय जल आयोगाच्या अहवालाची दखल घेत केंद्र सरकार आणि काही इतर संस्थांना नोटिसा पाठवल्या. त्यात ६७ हिमनदी तलावांच्या क्षेत्रात ४० टक्के विस्तार झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना उच्च जोखीम श्रेणीत टाकण्यात आले आहे तसेच सिक्कीम सरकारने राज्यातील ४० उच्च जोखीम असलेल्या हिमनदी तलावांच्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी त्यांची चौथी आणि शेवटची मोहीम पूर्ण केली.

हिमालयाच्या विविध भागांमध्ये येणारे महापूर मुख्यतः त्या प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये आणि बदलांमुळे प्रत्ययाला येतात तर पश्चिम किनारपट्टीवर आणि मध्य भारतात येणारे महापूर पाण्याच्या प्रवाहावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांमुळे येतात, असा निष्कर्ष भारतीय तंत्रज्ञान संस्थे (आयआयटी) च्या अभ्यासकांनी केलेल्या संशोधनात काढण्यात आला आहे. देशाच्या विविध भागांमध्ये येणाऱ्या महापुरांच्या कारणांचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांनी काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. देशात येणाऱ्या तीन चतुर्थांश महापुरांना अतिरिक्त पावसामुळे आणि अलिकडील काळात जोरदार पावसामुळे जमिनीत निर्माण झालेल्या ओलसर स्थितीमुळे चालना मिळते, असे 'एपीजे नॅचरल हॅजार्डस' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासात म्हटले आहे. उर्वरित एक चतुर्थांश महापूर जास्तीच्या पावसामुळे होतात, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, नैसर्गिक बदलांचा हवामानावर होणारा परिणाम अत्यंत स्थानिक स्वरूपाचा असतो. म्हणजेच तो कमी क्षेत्रफळावर परिणाम करतो. पावसाची सुरुवात होऊन पूर येण्याचा कालावधी फारच कमी, साधारणतः सहा तासांच्या आत असतो.

पूरस्थितीच्या विश्लेषणातील एक महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की, जे खोरे पूर्वी महापुरांसाठी संवेदनशील नव्हते, तिथेही आता अतिरिक्त पावसाच्या घटना अधिक आणि वारंवार घडत आहेत. वातावरणातील उष्णता वाढत असून त्यामुळे भविष्यात महापुराचे नवे 'हॉटस्पॉट' निर्माण होऊ शकतात. अभ्यासात वर्णन केलेल्या नकाशामध्ये सध्या महापुराच्या दृष्टीने कमी संवेदनशील असलेल्या उपखोऱ्यांमध्ये उद्भवणारा धोकादेखील अधोरेखित करण्यात आला आहे. महापुरांचे हॉटस्पॉट मुख्यतः हिमालय, पश्चिम किनारपट्टी आणि मध्य भारतात केंद्रित आहेत. यामध्ये हिमालयात पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या भौतिक वैशिष्ट्ये आणि बदल तर पश्चिम किनाऱ्यावर आणि मध्य भारतात जलवैज्ञानिक घटक हे महापुरांना कारणीभूत ठरतात, असे अभ्यासकांनी नमूद केले. अतिरिक्त पर्जन्य आणि आधीपासूनच ओलसर जमिनीच्या स्थितीच्या एकत्र परिणामामुळे जवळपास तीन चतुर्थांश महापूर उद्भवतात तर उर्वरित सुमारे एक चतुर्थांश महापूर केवळ जास्त पावसामुळे येतात. या अभ्यासात १९८१ ते २०२० दरम्यान भारतीय हवामान विभागाने नोंदविलेल्या तापमानविषयक नोंदी आणि 'इमर्जन्सी इव्हेंट्स डाटाबेस' यासारख्या विविध 'डाटाबेस'मधील महापुरांचे नोंदवलेले घटक आदी गोष्टींचे विश्लेषण केले आहे.

हिमालय हे केवळ पर्वताचे नाव नाही. ही पर्वतरांग समाजाची प्रातिनिधिक एकक आहे. हिमालयात जाणे म्हणजे केवळ गूढता आणि साहसाच्या जगात प्रवेश करणे नाही. हिमालय हे जीवनाच्या गूढतेसारखे एक न सुटलेले कोडे आहे. ते आपल्या जीवनाच्या प्रत्येक वळणावर एका महत्त्वाच्या प्रश्नासारखे उपस्थित आहे. अदम्य आकर्षण, साहस आणि प्रणय हे हिमालयाच्या अनेक गुणांपैकी एक आहेत; परंतु या प्रतिमेच्या पलीकडेही अनेक शीर्षके आहेत. रुडयार्ड किपलिंग म्हणतात त्याप्रमाणे हिमालयाच्या कुशीत जाणे हे आईच्या कुशीत जाण्यासारखे आहे; पण हा हिमालयाचा फक्त एक पैलू आहे. निसर्गाने निर्माण केलेले सौंदर्य आणि मानवाच्या आधुनिक कामगिरीतील सुसंवाद बिघडला आहे. मानव आणि निसर्गातील नाजूक आणि गोड नाते तुटत आहे. प्रदूषणाच्या वेदनेने ओरडणारे पर्वत, बाजाराच्या भीतीने थरथरणारी जंगले, आकुंचन पावणाऱ्या हिम नद्यांमुळे अंतिम श्वास घेणाऱ्या नद्या ही हिमालयाची नवी ओळख बनत आहे.

आपण विकासाच्या साखळ्या हिमालयाला बांधल्या आहेत. त्याची जंगले, नद्या, झाडे, वनस्पती, फुले, फळे, पाने, मुळे, पक्षी, मासे, फुलपाखरे हे सर्व आपल्या बंदिवासात आहेत. आपण नैसर्गिक व्यवस्थेला आव्हान देत आहोत. आपण निसर्गाला एका चाचणी नळीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परिस्थिती अशी आहे की, ढग आणि पाऊस आता वरदान राहिलेले नाही, तर शापासारखे पर्वतांना घाबरवत आहेत. यामुळे हिमालयाचे अस्तित्व डळमळीत होत आहे.

आता आपण विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलनाची मूक भिंतही तोडली आहे. विकासाच्या नवीन परिभाषेत, नदी म्हणजे जलविद्युत प्रकल्प आणि पर्वत म्हणजे पर्यटन असे समीकरण तयार होत आहे. विकासाच्या नावाखाली आपण नद्या आणि पर्वतांचा विस्तार बोगद्यांमध्ये बंद करत आहोत. उत्तराखंडमध्येही असेच घडले, ज्याची बीजे आपण जाणूनबुजून किंवा नकळत पेरली होती. आपण स्वीकारलेले विकासाचे मॉडेल प्रत्यक्षात हिमालयाच्या शोषणाचे मॉडेल आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

# आनंदहेतूच्या मागण्या

दोन्ही घरांमध्ये सहलीला जायचे ठरल्यापासून त्या घरांतील वातावरण बदलून गेले होते. प्रत्येकाची स्वतंत्रपणे तयारी सुरू झाली होती. बॅगा, कपडे, एरवी वापरता न येणारे, परंतु सहलीमध्ये घातले तर चालतील, असे कपडे अशी सारी तयारी सुरू झाली. सोबत खायला काय काय न्यायचे, याची व्यवस्था सुरू झाली. पोरांची तर वेगळीच गंमत होती. समुद्रकिनारी जाणार असल्याने तेथे काय काय धमाल करायची आहे, याची यादी तयार होत होती व त्यानुसार त्यांचे खेळांचे साहित्य सोबत घेणे सुरू होते.

बदलत्या काळानुसार पोरांनी प्रत्येकाची आवड असलेली स्वतंत्र गाण्याची प्ले-लिस्ट बनवून ती गाणी पेन ड्राईव्ह व आईच्या मोबाईलमध्ये टाकून घेतली होती. आईच्या मोबाईलवर तसेही मुलांचा अधिकार असतो. बाबांजवळ त्यांचे लाड चालत नाहीत. या सगळ्या तयारीच्या गर्दीत बाबांचे कोणकोणत्या गावांना जायचे,



कसे जायचे, त्या त्या ठिकाणचे बुकिंग वगैरे सारे बघणे सुरू होते. एकंदरीत प्रवास म्हटला की सारेच ठरवावे लागते व प्रत्येकाने त्यात आपआपले योगदान दिले की, सर्वांनाच त्या सहलीचा आनंद घेता येतो. अशा प्रकारे सहलीला जाण्यासाठी तयार झालेले दोन मित्रांचे परिवार मी बघत होतो. माझा या उन्हाळ्यात सहलीचा खंड असल्याने त्यांच्या तयारीचा आनंद मी घेत होतो. मित्रांना काही बुकिंग वगैरे करून दिलीत. सहलीचा दिवस जवळ आला. हे दोन्ही परिवार जवळपास एकाच दिवशी निघणार होते. त्यामुळे सहलीच्या आधल्या दिवशी मी दोन्ही मित्रांकडे जाऊन त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गेलो.

दोन्ही मित्रांकडे तयारी जवळपास सारखीच होती व दोन्हीही घरांमध्ये उत्साह अक्षरशः ओसंडून वाहत होता. या दोन्ही सहलींमधला एकच ठळक फरक मला जाणवत होता तो म्हणजे एक परिवार आपल्या कारने सहलीला जाणार होता व दुसरा परिवार ट्रेनने. हा फरक सांगितल्यावर मात्र अनेकांच्या मनात दोन चित्रे निर्माण झाली असणार. दोन्ही परिवारांच्या आर्थिक परिस्थितींपासून तर सहलीच्या रचनेपर्यंत सारे काही अचानक बदलून जाते. वयाने मोठे झालेले आपण साऱ्या गोष्टी त्या आर्थिकतेच्या निकषांवर मोजायला लागतो. जसा फरक आपल्याला जाणवतो तसाच मुलांनाही जाणवतो; परंतु त्यांची त्या फरकांकडे बघण्याची दृष्टी आर्थिकसंदर्भात तयार झालेली नसल्याने त्यांचा या फरकाबाबतचा दृष्टिकोन अतिशय निरागस व मनमोहक असतो. सहलीच्या आधल्या दिवशी या दोन्ही घरात गेल्यानंतर माझ्या सवयीनुसार मी घरातल्या पोरांशी जरा गप्पा मारल्या. त्या दोन्ही घरांतील पोरांच्या तोंडून सहजच निघालेली दोन वेगवेगळी वाक्ये मला विचारात टाकून गेली. त्या दोन वेगवेगळ्या वाक्यांनी मला माणसाच्या जीवनात असलेल्या वेगवेगळ्या मागण्यांबाबत विचार करायला बाध्य केले. जीवन जगत असताना माणूस स्वतःचा विकास करीत असतो जो त्याचा स्थायीभावच आहे व त्या अनुरूप विकासाकरिता त्याच्या जीवनाकडून मागण्या असणेदेखील अत्यंत स्वाभाविक आहे. परंतु या मागण्यांचे हेतू काय आहेत, यावरच त्या मागण्यांची यथार्थता ठरते. या मागण्यांमागचे हेतू जर स्वच्छ व निखळ आनंदाचे असतील तर त्या मागण्या असायला व त्यांची पूर्तता करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना एक वेगळी झळाळी प्राप्त होते.

बरेच वेळा मागण्यांमागचे हेतू फार विचित्र व विखारी असतात व त्यामुळे असल्या व्यक्तींच्या आयुष्यात त्या मागण्या पूर्ण जरी झाल्या तरी त्यांस हवी तशी प्रतिष्ठा प्राप्त होत नाही किंवा खरा आनंद त्यामधून प्राप्त होत नाही. निखळ आनंदाकरिता मागण्या कशा असाव्या हे त्या दोन घरातील मुलांनी दिलेल्या दोन वेगवेगळ्या प्रतिक्रियांवरुन सहजच स्पष्ट होते. ट्रेनने सहलीला जाणाऱ्या घरातील मुले मला म्हणाली, ''काका, आम्हा खूपच धमाल करणार आहोत. परंतु आम्ही जर कारने गेलो असतो ना तर किती मजा आली असती. केवळ आम्ही चौघेच, बाबांनी गाडी चालविली असती, आम्हाला मस्त पेन ड्राईव्ह त्या गाडीत लावून केव्हाही आमच्या आवडीची गाणी लावता आली असती. मस्त गाडीतला एसी लावून बढीया थंड थंड जाता आले असते. कोकणात झाडांना खूप आंबे आहेत म्हणे, मस्त कुठेही गाडी थांबवून गाडीवर चढून आंबे तोडता आले असते, मज्जा आली असती अजून खूप.

खरंच काका आम्ही कारमध्येच जायला हवे होते ट्रीपला. ट्रेनमध्ये आपल्याला पाहिजे तेथे थांबता येत नाही, खूप सारे लोक असतात, गोंधळ, गडबड, शिवाय एसी नसतो. कारण बाबांनी स्लीपरची तिकिटे काढलीत, त्यामुळे कार किती छान राहिली असती ना?'' मुलांची मागणी योग्यच होती. त्या मागणीमागचा त्यांचा भरपूर आनंद घेण्यामागचा हेतू स्पष्ट होता व म्हणून मला ती मागणी रास्त वाटत होती. त्यानंतर मी कारने सहलीला जाणाऱ्या मित्राकडे गेलो व तेथेही मुलांशी गप्पा मारताना बाकी सर्व गोष्टी व त्यांची तयारी बघताना त्यांनी दिलेली प्रतिक्रिया फारच सुरेख होती. ती पोरे मला म्हणाली, ''काका, आम्ही छान आठवडाभर धमाल करणार आहोत, पण आम्हाला एकच गोष्ट जरा आवडत नाहीये ती म्हणजे आम्ही कारने जाणार आहोत.'' त्यांचे वाक्य ऐकल्याबरोबर मी जरा सावरून त्यांचे म्हणणे ऐकायला तयार झालो. ती पोरे म्हणाली, ''काका, कारमध्ये काय केवळ आम्ही चौघेच, कंटाळा येतो, कुठे फिरतादेखील येत नाही. ट्रेनमध्ये खिडकी उघडी ठेवली की हवा येते मस्त. त्यासोबतच पाहिजे तेव्हा झोपता येते. समोरासमोर बसून मस्त गाण्याच्या भेंड्या खेळता येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बाबा आमच्या सोबत खेळू शकतात. कार असली की त्यांना गाडी चालवावी लागते व ते काही बोलू शकत नाही फार. ट्रेनमध्ये मस्त काही काही विकणारे येतात, त्यांच्या जवळची भेळ किंवाकाकडी किती बढीया वाटते. खरंच काका, आमची ही ट्रीप ट्रेननेच हवी होती.'' आधीच्या घराप्रमाणे येथेही मी त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. परंतु आता आपल्या आई-बाबांनी आपल्यासाठी मस्त सहल प्लॅन केली आहे. त्यामुळे त्यांना आपण असे बोललो तर वाईट वाटेल म्हणून काहीही न बोलता मस्त सहलीचा आनंद घ्यायचा, असा माझा सल्ला त्यांना दिला. या दोन्ही परिवारांना शुभेच्छा देऊन मी परतलो; पण त्या दोन वेगवेगळ्या व परस्परभिन्न मागण्या मात्र मला जगण्याचा एक नवा आयाम सांगून गेल्या. त्या दोन्हीही मागण्या आपापल्या जागी योग्यच होत्या.

(पान ६ वर)

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

# अन्नसंस्कार - नोमतोम

कोणतीही वस्तू अधिकाधिक उपयोगी व्हावी, त्यातून वापर करणाऱ्याला सर्वात जास्त फायदा व्हावा म्हणून करण्याच्या प्रक्रियेला संस्कार म्हणतात. त्यातूनच शब्द सिद्ध झाला अन्नसंस्कार. मानवी उत्क्रांतीची पहिली लाट शेतीच्या शोधाची होती.

जमिनीच्या एका तुकड्यावर वाळलेल्या लाकडानं काहीसं खोल छिद्र करून त्यात बीज पेरलं की ते अंकुरतं. त्याची नीट जोपासना केली की काही काळानंतर ते फुलावर येतं. त्याला फळं धरतात आणि त्यातून असंख्य नवीन बिया मिळतात, हे स्त्रीवर्गाला उमजणं ही शेतीची प्राथमिक अवस्था. अशाप्रकारे अनेक वर्षांपर्यंत चाललेल्या विविध प्रयोगांतून वनस्पती माणसाळवण्यात (डोमेस्टिकेशन) माणसाला यश मिळालं. त्यातूनच पुढे शेती हे माणसाची भूक भागवण्याचं मुख्य साधन झालं. रानावनात पशू-पक्ष्यांचा पाठलाग करून शिकार करण्यापेक्षा त्यांना पाळून त्यांच्या पाशवी शक्तीचा वापर विविध कामांत करून घेतल्यानंतर तर सगळं चित्रच पालटलं. हा सगळाच काळ मानवानं निसर्गसृष्टीला समजावून घेण्याचा, तिच्याशी योग्य तो ताळमेळ जुळवत स्वत:च्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा होता.

जीभेचे चोचले पुरवणारं जंक फूड



त्यामुळे वातावरणात होणारे बदल, त्याचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम, त्यातून उद्भवणाऱ्या व्याधी आणि समस्या, त्यांच्यावरचे उपाय हा सगळाच विचार त्यात करणं आवश्यक होतं. पृथ्वीच्या पाठीवर वेगवेगळ्या नद्यांच्या काठी उदयाला आलेल्या सर्वच प्राचीन संस्कृतीत खानपानाचे नियम निश्चित असतीलच; पण काळाच्या ओघात त्या सगळ्याच नामशेष झाल्यामुळे त्यांचा थांग लागत नाही.

आपल्याकडे मात्र अगदी विसाव्या शतकापर्यंत अनेक सहस्रकांपासून आहार विहाराचे नियम काटेकोरपणे पाळणाऱ्या पिढ्यान्‌पिढ्या गुण्यागोविंदानं नांदल्या. पण औद्योगिकीकरणाच्या रेट्यात कृषी संस्कृतीला हादरे बसू लागलेत. मोठ्या प्रमाणात उत्पादन (मास प्रोडक्शन) करण्याच्या नादात निसर्गाशी जोडलेली नाळ तुटू लागली. तोल ढळलेली जीवनशैली अनेक प्रकारचे विकार देऊ करती झाली. त्यांनाच आजकाल 'लाईफ स्टाईल डिसिजेस' म्हणून जोजवण्यात येतं. त्यांच्यावर उपचार करायचे तर त्याचे स्वतंत्र दुष्परिणाम (साईड इफेक्ट्स) होतात. त्यासाठी वेगळे इलाज करावे लागतात. एकातून दुसरा आणि दुसऱ्यातून तिसरा आजार उद्भवत जातो.

या सगळ्या परिस्थितीची उकल केल्यानंतर समोर जे काही जळजळीत वास्तव उभं आहे ते असं. त्याची सुरुवात झालेली दिसते ती अरबी टोळ्यांच्या आक्रमणांनंतर. 'जो पैसे कमवतो तो खाविंद (मालक), त्याच्याच ताबेदारीत राहायचं' हा अरबी नियम इथेही लावण्यात येऊ लागला. त्यामुळे स्त्रियांच्या विशेषत: गृहिणींच्या अधिकारांचा संकोच झाला.

ब्रिटिश राजवटीतही हे अंधारयुग तसंच होतं. तरीही भारतीय स्वातंत्र्य संग्रामात स्त्रीशक्तीनं हिरिरीनं भाग घेतला. त्यानंतर मात्र वामपंथी टोळ्यांनी एकच गदारोळ उठवला. बाईनं काय फक्त चूल आणि मूल करतच जगायचं का? रांधा वाढा उष्टी काढा हेच बाईचं आयुष्य आहे का? तिचं स्वत:चं असं अस्तित्व आहे की नाही? असे प्रश्न पुन्हा पुन्हा विचारणारा आशय असलेले, 'पुरोगामी' म्हणवले जाणारे विचार विविध माध्यमांतून प्रसृत झालेत. 'जस्ट अ हाऊस वाईफ' या चार शब्दांत कुटुंबव्यवस्थेचा कणा असलेल्या 'गृहिणी' या पदाला हिणवण्यात येऊ लागलं. त्यातून गेल्या साठेक वर्षांत 'बाईनं घर सांभाळणं, घरची कामं करणं, अन्न घरात शिजवणं हे वेळ वाया घालवणारं एक तद्दन फालतू काम आहे' हा विचार समस्त स्त्रीवर्गात जाणीवपूर्वक रुजवण्यात आला. त्या आधीच्या ज्या स्त्रियांनी उत्तम गृहिणी होण्यात आपलं संपूर्ण आयुष्य गुंतवलं त्यांच्याही मनात एक अपराधी भावना निर्माण करण्यात आली. त्यांच्या उत्तर आयुष्यात त्यांची कृतार्थता हिरावून घेण्यात आली, आपल्या आयुष्यात आपण काहीच केलं नाही हे शल्य त्यांच्या उरात शेवटपर्यंत राहिलं, हे सर्वात मोठं दुर्दैव आहे. त्याचीच पुढची पायरी म्हणजे दोन मिनिटांत खाण्यासाठी तयार होणारे किंवा तत्काळ खाण्यास तयार असे भरपूर प्रिझर्वेटिव्ह घातलेल्या पाकीटबंद पदार्थांनी भरभरून वाहणारी दुकानं गल्लोगल्ली उघडली गेली.

बाहेर कुठेतरी कोणीतरी तयार केलेले खाद्य पदार्थ घरी आणून खाणं आणि स्वयंपाकासाठी लागणारा वेळ स्वत:साठी खर्च करणं ही नवीन पद्धत रूढ झाली.

८० च्या दशकापासून भारतभर पसरलेल्या दूरदर्शन या सरकारी दूरचित्रवाणी (टीव्ही) वाहिनीवर दिसणाऱ्या खाण्यापिण्याच्या प्रभाव पाडणाऱ्या जाहिराती हा त्यातला सर्वात महत्त्वाचा मुद्दा. नंतर आलेल्या खाजगी वाहिन्यांत खाद्यपदार्थांना वाहिलेले विविध कार्यक्रम ते संपूर्णपणे 'व्यंजन' तयार करणं शिकवण्याला वाहिलेल्या वाहिन्यांपर्यंत ही मजल गेली.

पाश्चात्त्य देशांतल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांनी आपल्या पोटात कधी ठाण मांडलं, हे समजलंच नाही. त्यांच्या देशातल्या वातावरणाला आवश्यक असलेले पदार्थ भारतीय वातावरणाशी विसंगत असूनही विविध क्लुप्त्या वापरून भारतीय ग्राहकांच्या गळ्याखाली उतरवण्यात आलेत. पिझ्झा-बर्गर-पास्त्यासारखे पदार्थ हॉटेलच्या चवीसारखे घरी बनवण्याच्या नादात स्वयंपाक घराला 'किचन' म्हटलं जाऊ लागलं.

(पान ६ वर)

वेध

दत्तात्रय आंबुलकर

# भारतातील मंदिरे व त्यांचे अर्थकारण

भारतात प्राचीन काळापासून मंदिरे अस्तित्वात आहेत. ती बांधताना कोणतीही मशिनरी, सिमेंट वा लोखंड उपलब्ध नव्हते. ही मंदिरे भारताच्या परंपरा, प्रथा व भारतीय संस्कृतीचे प्रतीक होत. भारतातील भव्य मोठ्या विशाल अशा जुन्या नव्या मंदिरांमुळे स्थानिक अर्थकारणाला चालना मिळाली. वेगवेगळ्या मंदिरांतर्फे शैक्षणिक संस्था, मेडिकल कॉलेज, सांस्कृतिक वारसा जपणारी केंद्रे सुरू झाली. भारतात जवळपास मंदिराचे अर्थकारण हे ३.०२ लाख कोटी रुपयांचे आहे व जीडीपीच्या २.३२ प्रतिशत आहे. भारतात सुमारे ६,४९,००० पेक्षा जास्त मंदिरे आहेत.

भारतातील आकाराने सर्वात मोठ्या व प्राचीन मंदिरांचा अभ्यास केला असता पहिली १० मंदिरे त्यांची वैशिष्ट्ये व क्षेत्रफळ. भारतातील मंदिरे ही केवळ हिंदू भाविकांची प्रार्थना स्थळे असूनसुद्धा अर्थकारणाला वळण देणारी संस्थानेही आहेत. येणारे भाविक यांची संख्या, त्यांची उत्पन्ने देणग्या, नोकरवर्ग, शैक्षणिक व हॉस्पिटल यांना होत असलेली मदत लक्षात घेता खालील तक्त्यामध्ये सर्वात मोठी १० मंदिरे दर्शविली आहेत.

### तिरुमला व्यंकटेश्वर मंदिर

आंध्रप्रदेश रोज सरासरी ७५००० भाविक येथे दर्शन घेतात. दरवर्षी २४ दशलक्ष भाविक दर्शन घेतात. या मंदिराचे वार्षिक उत्पन्न रुपये ५१४१.७४ कोटी आहे. १६००० लोकांना



रोजगार प्रत्यक्ष मिळतो. भक्त देवाला केस अर्पण करतात व त्याच्या लिलावातून ३९ कोटी रुपये वार्षिक उभे राहतात. या मंदिरात ५२ टन सोने आहे त्याची किंमत रुपये ८४७६ कोटी एवढी आहे. १.५ लाख लाडू रोज विकून त्यातून वर्षाला १.१० कोटी रुपये जमतात. हे मंदिर अनेक शैक्षणिक संस्था व आरोग्य संस्था चालवते, ज्यात श्री व्यंकटेश्वरा विद्यापीठ व मेडिकल इन्स्टिट्यूट यांचा समावेश आहे.

### वैष्णोदेवी मंदिर, जम्मू- काश्मीर

रोज सरासरी ३७००० ते ४४००० भाविक दर्शनाला येतात. वार्षिक ९५ लाखांपेक्षा जास्त भाविक दर्शनास येतात. मंदिराचे वार्षिक उत्पन्न सुमारे १६ दशलक्ष डॉलर्स आहे. ३००० पेक्षा जास्त कर्मचारी वर्ग येथे काम करतो. यात पुजारी, देखरेख करणारे कर्मचारी व बाकी कर्मचारी येतात. या मंदिरातर्फे शैक्षणिक संस्था व आरोग्य संस्था चालविल्या जातात; ज्यात श्री माता वैष्णोदेवी विद्यापीठ व श्री माता वैष्णोदेवी नारायण सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांचा समावेश आहे.

### जगन्नाथ मंदिर, पुरी ओडिशा

हे जगन्नाथाचे मंदिर लोकप्रिय आहे. येथे दररोज ५०००० पेक्षा जास्त भाविक दर्शनाला येतात. वार्षिक १.१५ कोटी भाविक दर्शनाला येतात. भेटी व देणगीच्या रुपात रुपये ५०० कोटी जमा होतात. मंदिराचा कर्मचारी वर्ग ६००० आहे. ज्यात पुजारी, देखरेख करणारे व इतर कर्मचारी येतात. हे मंदिर शैक्षणिक व आरोग्य संस्थान पैसे पुरवते ज्यात जगन्नाथ संस्कृत विद्यापीठ व जगन्नाथ कर्क रुग्णालयांचा समावेश आहे.

### सिद्धिविनायक मंदिर, मुंबई

हे मंदिर भाविकांना प्रिय असून रोज सुमारे ७५००० ते ९०००० भाविक दर्शनाला येतात. या मंदिरात देणगी व भेटीच्या स्वरूपात नगदी, दागदागिने व इतर मौल्यवान वस्तू समाविष्ट आहेत. भेटी व देणग्या सुमारे रुपये १५० दशलक्ष जमा होतात. कर्मचारी वर्गात पुजारी, देखरेख करणारे व बाकी व्यवस्था पाहणारे असे दोन हजार कर्मचारी आहेत. शैक्षणिक व आरोग्य संस्थांना हे मंदिर पैसे पुरवते त्यात सिद्धिविनायक इंजिनीअरिंग कॉलेज व सिद्धिविनायक हॉस्पिटल यांचा समावेश आहे.

### काशी विश्वनाथ मंदिर, उत्तरप्रदेश

वाराणसी या पवित्र शहरात हे काशी विश्वनाथ मंदिर आहे. रोज ३००० पेक्षा जास्त भाविक दर्शनाला येतात. हीच संख्या वार्षिक तीन दशलक्ष आहे. देणग्या व भेटी स्वरूपात दरवर्षी या मंदिरात रुपये १०० कोटी जमा होतात. ३०० कर्मचारी येथील व्यवस्था पाहतात. २०२३-२४ या आर्थिक वर्षात मंदिराचे उत्पन्न रु. ८३.३४ कोटी रुपये होते.

### स्वर्ण मंदिर, पंजाब

या मंदिराला श्री हरमंदिर साहेब असेही नाव आहे व हे अमृतसर येथे बांधले आहे. १५००० पेक्षा जास्त भाविक येथे रोज येतात तर दरवर्षी सुमारे २० दशलक्ष भाविकांची येथे गर्दी असते. देणग्या व भेटवस्तू या रूपात दरवर्षी ९०० कोटी रुपये जमतात. या मंदिरातर्फे अनेक शैक्षणिक व आरोग्य संस्था चालविल्या जातात. श्री गुरु रामदास मेडिकल सायन्सेस व रिसर्च ही संस्था हे मंदिर चालवते. मंदिराचे वार्षिक उत्पन्न ५०० कोटी रुपये इतके आहे.

### सोमनाथ मंदिर, गुजरात

हे मंदिर बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. गजनीच्या महमुदाने हे मंदिर सतरा वेळा आक्रमण करून लुटले. हे भगवान शिवाचे लोकप्रिय मंदिर आहे. रोज ७.६ लाख भाविक येतात व वर्षाला ही संख्या सुमारे एक कोटी एवढी आहे. भेटवस्तू व देणगी स्वरूपात या मंदिरात रुपये ६० कोटी जमा होतात. सोमनाथ संस्कृत विद्यापीठ व इतर शैक्षणिक व आरोग्य संस्था हे मंदिर चालवते.

### मीनाक्षी अम्मा मंदिर, मदुराई

येथे रोज २० ते ३० हजार भाविक दर्शन घेतात व ६० कोटी हे मंदिराचे उत्पन्न आहे. या मंदिरात ३३००० शिल्पे असून १४ गोपुरे आहेत व यांची उंची ४५ ते ५० मीटर आहे. नगदी, दागदागिने व इतर मौल्यवान वस्तू मिळतात. ५००० कर्मचारी काम करतात. शैक्षणिक व आरोग्य संस्थांना हे मंदिर सहाय्य करते.

### श्रीराम मंदिर अयोध्या, उत्तरप्रदेश



भारतातील सर्वात जास्त चर्चेत असणारे हे मंदिर आहे. सुमारे एक लाख भाविकांना दररोज दर्शन घेण्यासाठी या मंदिरात व्यवस्था करणे सुरू आहे. रुपये १०० कोटी एवढ्या किमतीच्या भेटवस्तू व देणग्या येथे मिळण्याचा अंदाज आहे. थोडक्यात हे मंदिर अर्थव्यवस्थेला वळण देणारे व राज्याचा विकास करणारे ठरेल.

### शिर्डी साईबाबा मंदिर, महाराष्ट्र

हे मंदिर १९ व्या शतकात झालेल्या श्री साईबाबा यांना समर्पित आहे. रोज सुमारे २५ ते ३० हजार भाविक दर्शनासाठी येतात व सुमारे ८ दशलक्ष भाविक वर्षभरात गर्दी करतात. रुपये ३५० कोटी किमतीच्या देणग्या व भेटवस्तू दरवर्षी मंदिराला मिळतात. श्री साईबाबा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, साई इन्स्टिट्यूट ऑफ हायर लर्निंग व साई हॉस्पिटल या व इतर संस्थांना हे मंदिर आर्थिक सहाय्य करते. मंदिरांची अर्थव्यवस्थेला असलेली मदत ही निर्विवाद आहे. या मंदिरांना दर्शन घेण्याच्या भाविकांच्या इच्छेमुळे पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे. आतिथ्य मंदिर व्यवस्थापन, सोयी-सुविधा पुरवणे यामुळे स्थानिक जनतेला नोकरी व कामधंदा मिळतो. (पान ४ वर)

### भारतातील मोठी आणि प्राचीन १० मंदिरे

| मंदिरांचे नाव | स्थळ, वैशिष्ट्य | मंदिराचे क्षेत्रफळ |
|---|---|---|
| रंगनाथ स्वामी मंदिर | तिरुचिरापल्ली, तामिळनाडू, प्रमुख तीर्थस्थान, ९५३ खांब | ६,३१००० चौ. फूट |
| श्रीराम मंदिर | अयोध्या, उत्तरप्रदेश १७१ फूट उंच, २४ प्रवेशद्वारे २२१ खांब, एक वेळ १०००० लोक दर्शन घेऊ शकतील | २,७४,००० चौ. फूट |
| छत्तरपूर मंदिर दिल्ली | दुर्गा माता मंदिर पांढरे संगमरवरी दगडाने बनले आहे. दक्षिण भारत शैलीतील मंदिर | २,६०,००० चौ. फूट |
| अक्षरधाम मंदिर | दिल्ली, स्वामीनारायण यांच्या पुण्यस्मृतीचे मंदिर | २,३९,६८७ चौ. फूट |
| बृहदेश्वर मंदिर | तंदूर तामिळनाडू संपूर्ण ग्रॅनाईटने बनलेले पहिले एकमेव मंदिर युनेस्कोने जागतिक वारसा स्थळून घोषित | १,०२,४०० चौ. फूट |
| अन्नमल्लयार मंदिर | शिवमंदिर तिरुवनमलाई तामिळनाडू, २००० वर्षांपूर्वी बांधलेले मंदिर चौल राजाने बांधले आहे. | १,०१,२०० चौ. फूट |
| दक्षिणेश्वर काली मंदिर | कोलकाता पश्चिम बंगाल देवीच्या उजव्या पायाला चार बोटे नाहीत. रक्तरंजीत जीभ व नरमुंड हार घातलेला आहे. | १,०१,१७१ चौ. फूट |
| श्री विद्या राजगोपाल स्वामी मंदिर | मुन्नारबुटी, तामिळनाडू दहाव्या शतकात बांधलेले व दक्षिणेतील हिंदू प्रवेशद्वार | ९३,००० चौ.फूट |
| एकंबरनाथ मंदिर | कांचीपुरम, तामिळनाडू शिवमंदिर येथील प्राचीन आंब्याच्या झाडाच्या फांदीवर वेगवेगळ्या रंगाचे व चवीचे आंबे लागतात | ९३,८६० चौ. फूट |
| वदुकानाथन मंदिर | त्रिचूर केरळ, प्राचीन व पहिले सर्वात मोठे शिवमंदिर परशुरामाने बांधले तुपाने अभिषेक केला जे उन्हाळ्यातही वितळत नाही. | ८१,००० चौ. फूट |

| मंदिराचे नाव | वर्षात येणारे भाविक | कर्मचारी | एकूण उत्पन्न रु. | देणगी किंवा बेटी |
|---|---|---|---|---|
| तिरुमला व्यंकटेश मंदिर, आंध्रप्रदेश | २४ दशलक्ष | १६,००० | ५,१४१.७५ | ३९ कोटी |
| वैष्णोदेवी मंदिर, जम्मू-काश्मीर | ९५ दशलक्ष | ३,००० | १६ दशलक्ष | ५०० कोटी |
| जगन्नाथ मंदिर, पुरी ओडिशा | १.१५ कोटी | ६,००० | १०६ कोटी | ५०० कोटी |
| सिद्धिविनायक मंदिर, मुंबई | २२ दशलक्ष | २,००० | १२,५०० कोटी | १५० कोटी |
| काशी विश्वनाथ मंदिर, उत्तरप्रदेश | ३ दशलक्ष | ३०० | ८३.३४ कोटी | १०० कोटी |
| सुवर्ण मंदिर अमृतसर, पंजाब | २० दशलक्ष | २,८०० | ५०० कोटी | ९०० कोटी |
| सोमनाथ मंदिर गुजरात | १ कोटी | २०० | ३३ कोटी | ६० कोटी |
| मीनाक्षी अम्मा मंदिर, मदुराई | २.०९ कोटी | ५,००० | ६० दशलक्ष | १.२८ कोटी |
| श्रीराम मंदिर, अयोध्या, उत्तरप्रदेश | १.७९ कोटी | १,६०० | २५,००० कोटी | १०० कोटी |
| शिर्डी साईबाबा मंदिर, नगर | ८ दशलक्ष | ३,००० | ९०० कोटी | ३५० कोटी |



## करतो सांभाळ । पांडुरंग ।।

कुणाच्या कारणे । वेदना कुणाला ।।
उगाच जीवाला । तळमळ ।।१।।

असे सदाचार । ज्याचा नित्य नेम ।।
यातनाच ठाम । त्याचे भाळी ।।२।।

सात्विकाचे जिने । बोचते का जना? ।।
दांभिक सज्जना । छळतसे ।।३।।

ज्याच्या मना नाही । विकारांचा दंश ।।
जाण तोचि वंश । ज्ञाना-तुका ।।४।।

रामकृष्ण हरि । भजे सर्वकाळ ।।
करतो सांभाळ । पांडुरंग ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## गणेश गीत

ओत गं गणपतये नमः
लंबोदरा ध्रूाक्षा पहले वंदन तुज ईशा।।
पाना फुलांनी सजविले मखरा।
झगमगती दीपमाळा।।
विराजमान होण्याला ।
यावे यावे शुभंकरा।।
दुर्वांकुरांनी आरासिले आसन।
मोदक, लाडू नैवेद्या।।
ग्रहण करा स्वानंदे।
यावे यावे सर्वेशा।।
ऋद्धी-सिद्धीसह पावा दीन जना।
मूषक वाहनी बैसोनी या।।
निरांजनांच्या पंचारत्या।
ओवाळितो प्रथमेशा।।

रेखा भिवगडे

## गणेशोत्सव

अवलोकूनी बाप्पा भूवर आले निघूनी
स्वस्वरूप मूर्ती अनंत येथे आनंदाने कसे गेले हरखूनी !
सुंदर ते रूप नटलेले देखणे अलंकृत सजलेले
विविध वेषात, विविध पोषाख
रंगीबिरंगी मूर्ती रूपात असलेले !
मातेची तीव्र आठवण आली अवती भवती भासू लागली !
स्वप्राणाने प्राण फुंकूनी पुतळ्यांची सजीव निर्मिती केली....
असाच पुतळ्यातून जन्म असाच हा अवतार अवतरला !
येथे सुंदर मूर्ती, शिल्प, पुतळे कलाकारांनी जीव ओतला !
देवपण भक्तांनी बहाल केले
उल्हास उत्साहास उधाण आले !
बाप्पाचे मन आले भरूनडोळे अलगद ओलावले !

मीना खोंड

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# शकुनी मामा

## एक समज - गैरसमज



महाभारतातील द्युतपटावर महर्षी व्यासांनी भारतीय इतिहासातील सर्वात भीषण असे महायुद्ध लिहिले आहे आणि त्यामुळेच या द्युताच्या विजयाचा शिल्पकार शकुनीमामा महाभारतातील दुर्लक्षित पण अतिशय महत्त्वाचे पात्र आहे. हस्तिनापूरच्या वायव्येतील डोंगराळ प्रदेशाला म्हणजेच आजच्या काळातल्या मुलतान, काबुल, कंदाहारच्या भागाला त्या काळात गांधार म्हणत असावेत. याच गांधार प्रदेशातला सुबल राजाचा पुत्र म्हणजे शकुनी. महाभारतात शकुनीचे निश्चित असे स्थान आहे, पण त्याच्याबद्दल बरेचसे समज-गैरसमजही आहेत.

राजपुत्र धृतराष्ट्रासाठी भीष्माने वधुसंशोधन सुरू केले, तेव्हा तो फार सावध होता. अपत्यहीन महाराणीमुळे राजसिंहासनासमोर प्रचंड समस्या उभ्या ठाकतात, हे त्याने अनुभवले होते. त्यामुळे शंभर पुत्रांची माता होण्याचे वरदान व्यासांकडून लाभलेली गांधार राज्याची राजकुमारी गांधारी भीष्मांच्या लगेच नजरेत भरली.

गांधारीचे लग्न लावून देण्यासाठी सुबल राजाने तिचा भाऊ शकुनीला हस्तिनापूरला पाठवले. आपला पती अंध आहे हे कळताच गांधारीने डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली. ती पट्टी आयुष्यभर तिच्यासोबत राहिली. शकुनी आपल्या बहिणीला घेऊन हस्तिनापूरला आला आणि लग्नसोहळा आटोपल्यानंतर गांधारला परत गेला, असा उल्लेख महाभारतात आहे. त्यानंतर शकुनीचे दर्शन द्रौपदी स्वयंवराच्या वेळी होते. पांडवांना द्रुपद राजाची व कृष्णाच्या रूपाने यादवांची मदत मिळेल यामुळे द्रौपदी स्वयंवराच्या वेळीच पांडवांचा पराभव केला पाहिजे, असे शकुनीने सुचवून त्याच्या दूरदृष्टीचे दर्शन घडविले आहे. या अगोदर भीमाला मारून टाकण्यासाठी दुर्योधनाने अनेक कटकारस्थाने रचली. वारणावताला लाक्षागृह बांधून पांडवांना जाळून टाकण्याचा कट केला गेला, पण या कटकारस्थानांमध्ये शकुनीचा हात नव्हता.

द्युतसभेमुळे शकुनीमामा महाभारताच्या केंद्रस्थानी आले. द्युताचा विचार पहिल्यांदा त्यांनीच केला. पण त्यालाही पांडवांच्या राजसूय यज्ञाची पृष्ठभूमी होती. पांडवांचा राजसूय यज्ञ पार पाडल्यावर दुर्योधनाची बेचैनी वाढली. दुर्योधनाच्या मनाचा तोल ढळला. पांडवांचे वैभव बघण्यापेक्षा अन्नत्याग करेल, अशी भाषा करणाऱ्या दुर्योधनाला शकुनी मामाने खूप समजावून सांगितलं. पण असं दिसतं की, दुर्योधनाने आत्महत्येची धमकी दिल्यावर मात्र शकुनीची भाच्याप्रती ममता उचंबळून आली. पांडवांना युद्धात हरवणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे पांडवांना नामोहरम करायला त्याने द्युताचा पर्याय सुचवला.

शकुनी द्युतात अतिशय प्रवीण होता आणि युधिष्ठिरालादेखील द्युताची खूप आवड होती. व्यासांच्या मूळ महाभारतात उल्लेख आहे की, शकुनीला सोंगटीचे हृदय कळायचे. त्यानेच दुर्योधनाला सांगितले की, सोंगटीचे हृदय जाणण्याची कला तो जाणतो. अशीही लोककथा आहे की, गांधारीला मंगळ असल्याने तिचे लग्न बकऱ्याबरोबर लावून दिले होते. धृतराष्ट्राला जेव्हा कळते की, आपली पत्नी अगोदर विवाहित होती तेव्हा क्रोधित होऊन त्यांनी गांधारच्या राजा सुबलसह सर्व राजपुत्रांना कैदेत ठेवले. दररोज मूठभर तांदूळ सर्वांना देण्यात यायचे. सर्वांनी ठरवले की, एकट्या शकुनीला हे अन्न देऊन जिवंत ठेवायचे. कौरव वंशाचा सूड घेण्याचा हाच एकमेव मार्ग होता आणि पुढे लोक महाभारतात उल्लेख आहे की, त्याच्या वडिलांच्या हाडापासून शकुनीने सोंगट्या निर्माण केल्या. वडिलांचा आत्मा त्या सोंगटीतून बोलायचा त्यामुळे शकुनीचा डाव नेहमीच यशस्वी व्हायचा. द्युत म्हणजे नियतीचा संधिप्रकाशी लपंडाव. वैदिक काळापासून द्युत म्हणजे देवदेवतांचा खेळ समजला जाई. एकदा शिवपार्वतीने सृष्टीच्या चौपाऱ्यावर डाव मांडला. पार्वतीने आपले सर्व दागिने पणाला लावले होते तर शिवाने त्रिशूल, त्याचा लाडका नाग याच्यावरही पण लावला होता. पहिला डाव पार्वतीने जिंकला आणि शिव कफल्लक झाला. पण विष्णूने मध्यस्थी केली आणि पुन्हा एक डाव खेळायला लावला. आता सगळेच फासे विष्णूच्या मनासारखे पडत होते. दुसऱ्या डावात शिवाने गमावलेले सर्व काही मिळविले.

पूर्वीच्या काळी द्युत म्हणजे फक्त मनोरंजन नव्हते. तंत्र-मंत्र- यंत्र शक्तींचा जागृत पहारा या खेळावर असल्याचे उल्लेख अनेक पुराणग्रंथांमध्ये आढळतात. द्युत म्हणजे तंत्र- मंत्राने प्रभावित असलेले नियतीचे दान होते. शकुनीला द्युत- विद्या अवगत होती, याचा अर्थ त्याला मंत्रविद्या येत होती का? किंवा कोणा यक्ष-यक्षिणीवर त्याचे नियंत्रण होते का? या पृष्ठभूमीवर युधिष्ठिर विदुर संवादातील एक वाक्य लक्ष वेधून घेते. युधिष्ठिर विदुराला म्हणतो, "मला माहीत आहे की, माया शक्तीने प्रभावित होऊन द्युताचा डाव खेळला जाईल. मला अशा दुष्ट खेळात सहभागी व्हायचे नाही. पण जर मला आव्हान दिले आहे तर ते मी स्वीकारणारच. शेवटी मनुष्य असतो नियतीच्या हातातील खेळणेच!"

शकुनीला निश्चित माहीत होते की, धर्मराजाला द्युत खेळ अतिशय प्रिय होता; पण कसे खेळायचे याबाबत अज्ञानी होता. जर त्याला आव्हान दिले गेले, तर क्षात्र धर्माला अनुसरून तो नाही म्हणणार नाही. शकुनीला सोंगटीमधील बापाचे हृदय माहीत होते. एके ठिकाणी शकुनी म्हणतो, "द्युतपट म्हणजे माझा रथ आहे आणि फासा म्हणजे धनुष्यबाण." त्याकाळी प्रतिपक्षाने केलेले आव्हान नाकारणे म्हणजे राजाचा पळकुटेपणा समजला जात असे. युधिष्ठिराला शकुनीच्या कपटाची चाहूल अगोदरच लागलेली होती. पण शकुनी त्याला सांगतो, "आकड्यांचे ज्ञान असेल तर त्याला फसवणूक समजत नाही. मला आकड्यांचे ज्ञान आहे." आणि त्यावर धर्मराज म्हणतो, "कोणी आव्हान दिले तर मी नाकारणार नाही. ही माझी प्रतिज्ञा आहे."

शकुनीचे युधिष्ठिराबद्दलचे सर्व अंदाज खरे ठरले आहेत. युधिष्ठिर द्युत खेळायला एकदा नव्हे तर दोनदा तयार झाला. त्याला कोणी द्युतवेडा म्हणेलही; एकदा वनवासात भीम आणि द्रौपदीसमोर त्याने द्युत खेळण्यामागचे एक गूढ रहस्य सांगितले आहे. तो म्हणतो, "द्युतकलेत मी पारंगत आहे अशी खात्री असल्याने युद्धाविनाच दुर्योधनाकडून हस्तिनापूरचे राज्य सहज हस्तगत करता येईल, असे मला वाटत होते."

द्युतामागची जी कोणती कारणमीमांसा असेल, पण मुत्सद्देगिरीत शकुनी सरस ठरलेला दिसतो. दुर्योधनांच्यावतीने शकुनी फासे टाकेल, अशी विचित्र अटही युधिष्ठिराने स्वेच्छेने स्वीकारली. शकुनीला नेहमी कपटी म्हटले जाते. स्वार्थी म्हटले जाते. पण प्रत्यक्ष द्युत खेळण्याच्या वेळेस त्याने कुठलेही कपट केलेले दिसत नाही. फासे फेकण्यात तो पटाईत आहे. प्रत्येक डाव तो कौशल्याने जिंकत गेला. त्याने रडीचा डाव खेळलेला कधी दिसत नाही. प्रत्येक वेळेस शकुनीने फासा फेकला आणि तो म्हणत गेला 'मी जिंकलो.' अर्थातच पांडव द्युत खेळात हरावेत हीच इच्छा शकुनीची होती. प्रामुख्याने दुर्योधनाचे हित त्याच्या मनात होते. द्युतसभेचे आयोजन करण्यासाठी त्याने धृतराष्ट्राचा उपयोग केला.

कोणाही चाणाक्ष राजनीती तज्ज्ञाने हेच केले असते. पांडवांचा शत्रू म्हणून त्याने भूमिका स्वीकारली आणि शेवटपर्यंत ती कायम ठेवली. घोषयात्रा आणि विराट नगरीतील गोहरणाच्या वेळी त्याची दुर्योधनाच्याप्रती निष्ठाच दिसून येते. युद्ध करण्याच्या निर्णयावर तो नेहमीच कौरवांच्या बाजूने ठाम राहिला आणि सहदेवाच्या हातून त्याने मरण पत्करले. त्याला त्याच्या पराभवाची पूर्ण कल्पना होती. पांडवांचे सामर्थ्य त्याला माहीत होते. रणांगणावर अनेकदा तो पराजित झाला. एकदा निश्चय झाल्यावर त्याने कधी रणांगणाला पाठ दाखवली नाही. पण काही घटनांमध्ये मात्र शकुनीचा तोल ढळलेला दिसतो. शिष्टाईसाठी श्रीकृष्ण हस्तिनापुरी आले होते. श्रीकृष्णाला कैद करण्याचे दुर्योधनाचे कारस्थान होते. खरे तर शकुनी मामा अतिशय धूर्त आणि मुत्सद्दी. वेळप्रसंगी खरे बोलणारा चतुरस्र राजकारणी. त्याने कृष्ण कैदेच्या बाबतीत दुर्योधनाची दुर्दैवी साथ देण्याचे ठरवले आणि महाभारताला वेगळेच वळण लागले. त्याच्या या निर्णयामागे ना दूरदृष्टी होती ना कोणती यशस्वी योजना होती.

खरं तर गांधार राज्य महाबलाढ्य होते. त्यामुळे साहजिकच मनात प्रश्न येतो की, स्वतःजवळ एवढे ऐश्वर्य असूनही पिता सुबल राजाच्या मृत्यूनंतर शकुनी गांधार राज्य सांभाळायला परत का नाही गेला? उत्तर आयुष्यातही हस्तिनापूरच्या कटकटी सांभाळत आपले राज्य सोडून शकुनी बहिणीच्या सासरी राहिला. गांधारचा स्वतंत्र राजा म्हणून त्याला कधीच नावलौकिक कमावता आला नाही. धृतराष्ट्राने बहिणीवर केलेल्या अन्यायामुळे त्याच्या मनात सल होती की, आपल्या भाच्यांवरच्या अतिप्रेमामुळे हस्तिनापुरातून त्याचा पाय निघाला नाही, काळच जाणे. एक शक्यता अशीही असू शकते की, गांधारीच्या दुर्दैवी आयुष्याचा सूड त्याला कौरवांच्या पराभवातून बघायचा असेल.

महाभारतात अनेक पर्व आहेत. हजारो घटना आहेत. शेकडो पराक्रमी पुरुष आहेत. पण शेवटी महाभारत हे एका सोंगटीचेच महाभारत आहे आणि या सोंगटीचे नाव नियती असे आहे. ती ज्या शौर्यवानाकडे पाहून हसली तो धर्मराज सरतेशेवटी व्यासांनी उभारलेल्या भव्य मंचावर यशाचा शिल्पकार झाला. ती ज्या शौर्यवानाकडे पाहून अखेरीस रुसली, तो शकुनी कपटी मामा म्हणून ओळखला जाऊ लागला. नियती त्या शौर्यवानाकडे पाहूनच हसते ज्याचा हेतू शुद्ध असतो.

महाभारत हे एक गूढरम्य अरण्य आहे. या अरण्यात फक्त मोठे वृक्ष बोलत नाहीत तर पायाखालचे तृणही आपल्याला काहीतरी सांगत असते. प्रत्येक व्यक्तिरेखेमध्ये काहीतरी मर्म आहे. ती व्यक्तिरेखा कोणतातरी संदेश आपल्याला देत आहे. ते 'काहीतरी' उमजून घेण्यासाठी काही क्षण त्या व्यक्तिरेखेजवळ थांबावं. तिच्याशी गुजगोष्टी कराव्या. तिच्या सुखात हसावं आणि दुःखात अश्रूंना वाट करून द्यावी. धर्मराज युधिष्ठिर समजून घ्यायचा असेल तर शकुनीला आकळणं गरजेचं असतं. समज-गैरसमजांच्या क्षितिजापल्याड उभा असलेला शकुनी आपल्याला हळूच खुणावत असतो.

# कबूतर जा जा जा...



उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

सर्वोच्च न्यायालयाने कबुतरांना खाद्य टाकण्यास मनाई केल्याचं वृत्त आणि त्यावरून चाललेला वाद, त्याला दिलेला धार्मिक रंग आणि त्यावरून चालणारं राजकारण आपण सगळ्यांनी वर्तमानपत्रातून वाचलं असेल आणि टीव्हीवर बातम्यातून पाहिलं असेल. खरंच एखाद्या गोष्टीचं राजकारण करून किती विचका करतो आपण! मुंबईच काय पण जवळपास सगळ्याच शहरातून कबुतर नावाच्या पक्ष्यानं ज्याला कपोत, पारवा वगैरे सारखी आकर्षक नावं दिली गेली, त्यानं नाकी नऊ आणलेत. जिकडे पाहावं तिकडे कबुतरं दृष्टीस पडतात.' समुंदर समुंदर यहांसे वहांतक...' असं एक गाणं आहे. त्या चालीवर 'कबुतर कबुतर यहांसे वहांतक...' असं गमतीनं म्हणावसं वाटतं.

एकीकडे कबुतरांचा त्रास होतो म्हणून दारे, खिडक्या, गॅलरीला जाळ्या बसवायच्या आणि दुसरीकडे त्यांना खाद्य द्यायचा पण हट्ट धरायचा अशा तऱ्हेची दुटप्पी भूमिका आपणच घेऊ शकतो.

रस्त्यावरून चालताना एखाद्या चौकात शेकडो कबुतरं दाण्याच्या शोधात पंख फडफडवत एकदम उडाली की वाटतं जणू निळ्या आकाशात पांढऱ्या-राखाडी ढगांचा जल्लोष उठला आहे. डोळ्यांना सुखावणारा तो देखावा, पण आरोग्याच्या दृष्टीने मात्र गंभीर संकटाचा इशारा देणारा आहे. निसर्गाने या पक्ष्यांना उडण्यासाठी पंख दिले, आपलं अन्न स्वतः शोधण्याची प्रेरणा आणि शक्ती दिली आहे. जगण्यासाठी स्वातंत्र्य दिलं आहे. पण आपणच त्यांना आयतं अन्न पाणी देऊन परावलंबी बनवतो आहोत. निसर्गाच्या विरुद्ध जाऊन आपण हा एक मोठाच अपराध करतो असंच म्हणावसं वाटतं. कधी काळी आपल्या पूर्वजांनी कबुतरं पाळली ती संदेशवाहक म्हणून. युद्धात, संकटात ते धावून यायचे. आज मोबाईलच्या युगात त्यांची गरज नाही, शहरातल्या कबूतरखान्यांत आणि विविध चौकात कबुतरं मोफत मिळणाऱ्या अन्नावर जगतात. परिणामी त्यांची संख्या अनियंत्रित वाढली आणि त्यांच्यामागे आजारांची सावली पसरली. कबुतरांच्या पिसांमधून आणि विष्ठेतून सूक्ष्म जीवाणू हवेत तरंगतात. दिसायला निरागस असलेले हे पक्षी फुफ्फुसांवर आक्रमण करणारे अनेक आजार माणसापर्यंत पोहोचवतात. दमा, अलर्जी, डोळ्यांचे विकार वाढतात. आपण ज्यांना शांतीचं प्रतीक मानतो, तीच कबुतरं नकळत अस्वस्थतेचं कारण ठरतात. आज त्यामुळेच कबुतर जा जा जा असं म्हणण्याची वेळ आली आहे.

इमारतींच्या गॅलऱ्या, टेरेस, पाईपलाईन यांसारख्या जागांवर कबूतर- पारव्यांची घरटी आणि त्यांची विष्ठा साचत असल्याने दुर्मिळ, पण जीवघेणे फुफ्फुसाचे आजार वाढीस लागले आहेत. या आजारांमध्ये छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास, खोकला, ताप असे लक्षणे दिसून येतात आणि उपचारांअभावी हा त्रास गंभीर स्वरूप धारण करू शकतो. केवळ वृद्ध, लहान मुले किंवा ॲलर्जिक व्यक्तींनाच नव्हे तर मधुमेह, कर्करोग, एड्स यांसारख्या रोगांनी पीडितांसाठीही हे आजार प्राणघातक ठरू शकतात.

श्वसनरोग तज्ज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार, कबूतर-पारव्यांच्या सान्निध्यात राहणाऱ्यांमध्ये अशा आजारांचा धोका ४० टक्क्यांनी वाढतो. असे असूनही अनेक ठिकाणी लोक श्रद्धेने, सवयीने किंवा करुणेने कबुतरांना अन्न घालताना दिसतात. अनेक ठिकाणी तर कबूतरखाने उभारले गेले आहेत. दादर कबूतरखाना बंद करण्याच्या निर्णयावरून विरोध झाला. यासाठी काहींनी आंदोलनही केले. सध्या भटक्या किंवा बेवारस कुत्र्यांचा विषय पण असाच ऐरणीवर आला आहे. अनेक लहान मुलांना किंवा वृद्ध माणसांना या कुत्र्यांनी जखमी केले आहे. त्यांच्या हल्ल्यामुळे काही मुले, लोक मृत्यूमुखी देखील पडले आहेत. तरी देखील काही



प्राणीप्रेमींना या भटक्या कुत्र्यांचा कळवळा येतो आणि त्यांना ते अन्नपाणी देतात. पण आरोग्याचा विषय असताना भावनिक दृष्टिकोनाला कितपत प्राधान्य द्यावे, याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. माणसाला पाळीव प्राण्यांविना राहवत नाही. एकटे राहणाऱ्या माणसांना कुत्रा, मांजर, पोपट यांच्यासारखे प्राणी सोबत करतात. त्यांचे सखे सोबती बनतात. ही माणसाच्या जीवनातील पोकळी भरून काढतात. त्यांना जीव लावतात पण त्याचबरोबर हे प्राणी आपल्यासोबत आजारांचा धोका घेऊन येतात. कुत्र्यांपासून रेबीज, मांजरांपासून टॉक्सोप्लाझ्मोसिस, सशांपासून रिंगवर्म, तर पक्ष्यांपासून फुफ्फुसांना बाधणारे आजार होऊ शकतात. माया ठेवणं चुकीचं नाही, पण ती जबाबदारीशिवाय धोकादायक ठरते.

आपण पाळलेला प्राणी लसीकरणाशिवाय, स्वच्छतेशिवाय राहिला तर त्याची माया एका संकटाची सुरुवात बनते. त्याची सुरुवात आपल्यापासून होऊ शकते. अनेकांना कबुतरांना दाणे टाकणं ही पुण्याई वाटते. चौकातल्या कबूतरखान्याभोवती गर्दी करून लोक दाणे टाकतात आणि समाधान मानतात की आपण 'धर्मकार्य' केलं. पण प्रत्यक्षात आपण त्यांना स्वावलंबनापेक्षा परावलंबनाची सवय लावतो. जंगलातला पक्षी स्वतः अन्न शोधतो, भूतदया करता करता ही महत्वाची गोष्ट आपण विसरून गेलो आहोत.

आपला धर्म सांगतो प्राणिमात्रांवर प्रेम करा, पण विज्ञान सांगतं - त्या प्रेमात जबाबदारी सुद्धा असली पाहिजे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला निर्णय हा धार्मिकतेवर गदा आणणारा नसून, नागरिकांच्या आरोग्याचं रक्षण करणारा आहे असं मला वाटतं कारण सर्वात महत्वाचं आहे ते आपलं आरोग्य. या प्राणिमात्रांवर माया करण्याच्या आपल्या वृत्तीला एक नवीन विधायक



वळण आपल्याला देता येईल. त्याचा आपण कधी विचार केला आहे का ? मोकळे चौक, मोकळी मैदाने पक्ष्यांना दाणे टिपताना पाहण्यापेक्षा ती हिरवीगार झालेली पाहणं कोणाला आवडणार नाही ? जंगल तोड करण्याऐवजी जंगलं हिरवीगार करणं, जंगल लागवडीचं दिवसेंदिवस आक्रसत चाललेलं क्षेत्र वाढवणं कोणाला आवडणार नाही? मग पक्ष्यांना त्यांचं खाद्य जंगलात मिळेल. त्यांचा मधुर किलबिलाट ऐकायला मिळेल. त्यांचं सहजीवन अनुभवायला मिळेल.

चिमण्या, कावळे, पोपट, मैना सर्वच पक्षी आनंदी होतील. वाघ, हरणं, माकड, गवे यासारखे प्राणी मानवी वस्तीत येणारच नाहीत. तेव्हा कबुतरांचा कळवळा येणारांनी झाडं लावण्याचा वसा घ्यावा. आणि केवळ कबुतरच नाहीत तर सर्वच पक्ष्यांना त्यांना नैसर्गिक अधिवास उपलब्ध करून द्यावा.

न्यायालयाचा निर्णय म्हणजे एखाद्या आरशात आपलं खरं रूप पाहिल्यासारखं आहे. आरोग्याच्या रक्षणासाठी तो अपरिहार्य आहे. श्रद्धा आणि माया या भावना टिकल्या पाहिजेत, पण त्या विज्ञानाच्या प्रकाशात आणि जबाबदारीच्या छायेत. कबुतरांच्या उडीतलं सौंदर्य आपल्याला पाहायचंच आहे, पण त्यामागे लपलेली आजारांची काळी छायाही नजरेआड करून चालणार नाही.

पान १ वरून

## नेतृत्वविकासाची कार्यशाळा

थोडक्यात, गणपती उत्सवाच्या निमित्ताने समाजातील तरुणाई एकत्र येते आणि खूप मोठी शक्ती विधायक कामांना आकार देऊ शकते. म्हणूनच तिला योग्य दिशेने नेण्याचे, प्रवाहित करण्याचे काम होणे गरजेचे आहे. ते साधले तर खूप मोठी कामे पूर्णत्वास जाऊ शकतील आणि यातूनच संपूर्ण समाजाला सकारात्मक वातावरण अनुभवण्याची संधी मिळेल, यात शंका नाही.

## जागतिक शक्ती समीकरणांची नवी केंद्रे

परराष्ट्रमंत्री एस जयशंकर म्हणाले की, 'काही राष्ट्रे आणि व्यवसाय जुन्या जागतिक व्यवस्थेला अनुकूल आहेत. भारतीयांना ती व्यवस्था नको आहे. आर्थिक जागतिकीकरणाच्या शक्तींपासून फायदा मिळवणार्या भारतासाठी, त्या गतिशीलतेची पुनर्रचना करणे नेहमीच वाईट नसेल.' एक नवीन चौकट उदयास येताच, भारत अधिक संतुलित दृष्टिकोनाचा पुरस्कार करत असल्याचे ठळकपणे दिसते. यामध्ये फायदे केवळ काही निवडक लोकांना होण्याऐवजी, समुदायांमध्ये आणि देशांमध्ये अधिक निष्पक्षपणे वितरित केले जातात. काही मूलभूत फरक असलेल्या राष्ट्रांचा गट एकत्र कसा राहू शकता? हा प्रश्न आज अनेकांनी सतावत आहे.

तथापि, जर या संस्था विकसित झाल्या आणि त्यांचा प्रभाव वाढला, तर ते पश्चिमेला एक प्रतिसंतुलन प्रदान करू शकतात. दुर्दैवाने, अलीकडच्या वर्षांत वाढत्या एकतर्फी कृती आणि शून्य-सम व्यवहार राजकारणामुळे, बहुपक्षीयता एक संकल्पना आणि प्रथा म्हणून कमकुवत झाली आहे. यामुळेच जागतिक व्यापार संघटनेसारख्या बहुपक्षीय संघटनांवर अविश्वास वाढत आहे. जग पुन्हा एकदा एकध्रुवीय ते बहुध्रुवीय होत आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय परिदृश्यात असंख्य प्रादेशिक शक्तींचा उदय होत असून, जटिल परस्परावलंबनाने त्याची जागा घेतली आहे. परिणामी, पूर्वीचे शत्रू आता युती करत आहेत.

विविध क्षेत्रांमध्ये चीन, भारत आणि इतर विकसनशील देशांचा शांततापूर्ण उदय, अमेरिकेच्या वर्चस्वाचा अंत आणि एकध्रुवीय ते बहुध्रुवीय शक्ती संरचनेत बदल या जागतिक, राजकीय आणि आर्थिक घडामोडींचा दृष्टिकोन दर्शविते की, आशिया जागतिक सत्तेचे नवीन केंद्र बनले आहे. चीन, भारत, दक्षिण कोरिया आणि इंडोनेशियासारख्या राष्ट्रांच्या आर्थिक पुनर्प्राप्तीद्वारे अंदाजांची पुष्टी होते. आशिया जागतिक घडामोडींमध्ये केंद्रस्थानी येईल. अमेरिका आणि चीनमधील स्पर्धा, भूराजकीय आणि आर्थिक क्षेत्रात अमेरिकेचे वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठीचा संघर्ष आणि आशियातील महाशक्ती होण्याची चीनची महत्त्वाकांक्षा दर्शवते.

अमेरिकेचे सतत वर्चस्व असूनही, बदलाचे स्पष्ट गतिमान आहेत. चीन आणि भारताच्या सारख्या नवीन शक्तींचा उदय, जागतिक राजकारणाची गुंतागुंत आणि उत्क्रांती दर्शविती. कालांतराने, अमेरिका एकविसाव्या शतकात जागतिक राजकीय परिदृश्याला आव्हान देण्यासाठी वर्चस्व राखत राहील की, नवीन शक्ती समोर येतील हा प्रश्न अधिकाधिक कठीण होत चालला आहे. अशाप्रकारे, जागतिक राजकारणातील गतिमानता विकसित होत असताना आणि नवीन आव्हाने निर्माण होत असताना, सत्तेचे संतुलन आणि आंतरराष्ट्रीय संबंधांच्या भविष्यातील वाटचालींचा अर्थ लावण्यासाठी एक नवीन आदर्श निर्माण होतो आहे. अनेक कारणांमुळे अमेरिकेचे वर्चस्व कमी होत असल्याचे दिसून येते. दक्षिण चीन समुद्र आणि युक्रेनमधील सध्याच्या परिस्थितीने अमेरिकेला पूर्वीपेक्षा जास्त वेढलेले आहे. जग बहुध्रुवीय बनले आहे.

**निष्कर्ष** - भारताची सध्याची परिस्थिती आव्हानात्मक वाटत असली, तरी मजबूत आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्यासाठी आणि अर्थव्यवस्था वेगाने वाढविण्यासाठी अधिक योग्य निर्णय घेण्याची आता वेळ आहे. प्रशासन आणि अर्थव्यवस्थेला कमकुवत करण्याच्या प्रयत्नात, विरोधी नेत्यांनी पसरवलेल्या खोट्या कथनांना आपल्या अद्भुत देशाच्या नागरिकांनी बळी पडणे टाळले पाहिजे. भविष्यात एक समृद्ध भारत पाहण्यासाठी, फक्त एकत्र उभे राहून सध्याच्या सरकारला पाठिंबा देऊया.

पान ३ वरून

## भारतातील मंदिरे व त्यांचे अर्थकारण

यामुळे हॉटेल्स, रेस्टॉरंट, वाहतूक, विक्रीची दुकाने यांना मोठे उत्पन्न मिळते. भाविकांच्या सततच्या गर्दीमुळे ही मंदिरे अर्थकारणाला भरीव मदत करतात. नवीन मोठ्या मंदिरांची उभारणी सुरू आहे.

मंदिरांच्या अर्थकारणामुळे आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिघा बीचवर जगन्नाथ मंदिर कोट्यवधी रुपये खर्च करून उभारले आहे. त्याचे उद्घाटन झाले व ते जनतेच्या दर्शनासाठी खुले झाले आहे. तसेच जम्मू-काश्मीरमध्ये प्रति तिरुपती बालाजी मंदिराची उभारणी सुरू आहे. हे मंदिर तिरुपती बालाजी मंदिर ट्रस्ट आंध्रप्रदेश याच्यातर्फे बांधले जात आहे.

**जीएसटी भरणारी मंदिरे -** सर्व मोठी मंदिरे जीएसटी भरतात. तिरुपतीमंदिराने आर्थिक वर्ष २०१७मध्ये १४.७कोटी रुपये, २०२२ मध्ये १५.५८ रु., २०२३ मध्ये ३२.१५ कोटी रु. व २०२४ मध्ये ३२.९५ कोटी रु. जीएसटी भरला आहे. कर्नाटक सरकार मंदिराच्या उत्पन्नाच्या १० टक्के महसूल घेते. श्रीराम मंदिराने रुपये २७० कोटी जीएसटी व इतर कर पाच वर्षात भरला आहे. बहुतेक सर्व मोठी हिंदू मंदिरे सरकारच्या ताब्यात आहेत, पण बाकी धर्मीयांची प्रार्थना स्थळे उदाहरणार्थ मशिदी, गुरुद्वारा व चर्चेस इत्यादीवर सरकारचा ताबा नाही.

**निष्कर्ष-** १) दक्षिण देशाच्या अर्थव्यवस्थेला विकसित



करण्यात व रोजगार निर्मितीत या मंदिरांचा मोठा वाटा आहे. २) देशाच्या जीडीपीला भरीव योगदान ही मंदिरे करतात. ३) आध्यात्मिक व व्यावसायिक केंद्रे मंदिरामुळे उभी राहतात, ज्यामुळे स्थानिक व राष्ट्रीय अर्थकारण प्रभावित होते.
४) स्थानिक जनतेची आर्थिक विवंचना दूर होते. ५) मंदिरांमुळे हिंदू संस्कृती व हिंदू धर्म याविषयी जनतेत जागृती होते. ६) मंदिरांमुळे पर्यटनाला चालना मिळाली आहे.

## आईची माया

कथा
मो. बा. देशपांडे



सर्जेराव पाटील आणि सारजा यांच्या संसारवेलीवर आज अनेक वर्षांनी फूल उमलले. विंजेवाही गावात सगळ्यांच्या तोंडी आज तोच विषय होता. पुत्रप्राप्तीच्या आनंदात सर्जेरावांनी घरोघरी जाऊन सर्वांचे तोंड गोड केले. उरलेल्या लोकांनी अभिनंदनाच्या बहाण्याने सर्जेरावांच्या घरी जाऊन स्वतःचे तोंड गोड करून घेतले. एका जमान्यात विंजेवाही गावात सर्जेराव पाटलांच्या पाटीलकीचा कोण रुबाब होता. पण कालौघात पाटीलकी जाऊन फक्त पाटी तेवढी राहिली होती. तरी बेतास बात चांगली ४० एकरात धानाची कास्तकारी जोमात होती. कोपऱ्यावरील त्यांचे बागायतीने वेढलेले टुमदार कौलारू घर बघून अनेकांना हेवा वाटायचा.

आजवर वारस नसल्याने जे आयुष्यावर मळभ आलं होते तेही आता पुत्ररत्नाच्या प्राप्तीने पार निवळलं होतं. श्रीहरी दिसामासाने वाढू लागला. बाललीलांचे कोडकौतुक करण्यात दोघांनाही दिवस अपुरा पडे. या सुखी संसाराला का कुणास ठाऊक, पण दृष्ट लागली म्हणतात तसे झाले. एक दिवस सांजेच्या पारी शेतात सर्पदंशाने सर्जेरावांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सारजाबाई आणि श्रीहरीवर आपत्तीची जणू कुऱ्हाड कोसळली. आता चार वर्षाचा श्रीहरी हेच सारजाबाईच्या जीवनाचे एकमेव उद्दिष्ट होते. कधी प्रेमाने तर कधी धपाटा घालून आईने बाळाला सुसंस्कारित केले.

सारजाबाईंनी सर्व आघाड्यांवर हिमतीने आणि अंगभूत कौशल्याने कास्तकारी सुरू ठेवली. श्रीहरी भावनाशील आणि बुद्धीने हुशार होता. मॅट्रिकनंतर पुढील उच्च शिक्षणासाठी त्याला लगतच्या शहरात पाठवणे क्रमप्राप्त झाले होते. व्यवस्थित सुरू असलेली कास्तकारी सोडून शहरात जाणे सारजाबाईला शक्य नव्हते त्यामुळे श्रीहरीचे कॉलेजचं शिक्षण होस्टेलवर सुरू झाले. तारुण्यसुलभ दिवसात श्रीहरीचे कॉलेजातील रुपालीशी प्रेम जुळले. पदवीधर होताच दोघांनाही जॉब मिळाला. सुंदर आणि हुशार रुपालीला श्रीहरीपेक्षाही अधिक मोठ्या पगाराची नोकरी होती. श्रीहरी प्रेमविवाह करणार हे ऐकून तर सारजाबाईलाही खूप आनंद झाला.

''रूपाली, आपण लग्न कधी करायचे?'' ''होय, यावर कधीतरी विचार करावाच लागणार होता. पण मी स्पष्टच सांगते, मला तुमच्या त्या विंजेवाही गावात राहण्याची अजिबात इच्छा नाही तसेच आपल्या राजाराणीच्या संसारात तिसरी व्यक्ती म्हणून तुमची ती अडाणी आई पण मला अजिबात खपणार नाही.'' ''रुपाली, याच विंजेवाही गावकुसात मी लहानाचा मोठा झालो. गावाशी माझे भावनिक अनुबंध जुळलेले आहेत. ठीक आहे, आपल्या जॉबसाठी शहरातच राहावे लागणार. मग मी आपल्या सोबत आईला शहरात का आणू नये? माझी वृद्ध आई ही तिसरी व्यक्ती नाही. मी तिचाच अंश आहे. मीच तर तिचा आधार आहे. आजवर तिने माझ्याकरिता खूप खस्ता खाल्ल्या. आता या वयात तिला अन्य कोणाचाही सहारा आणि आसरा नाही. तिला सुखात ठेवण्याचे कर्तव्य माझे आहे. विंजेवाही हे गाव लहान असल्यामुळे आता शेतीवाडी ठेक्याने देऊन आईला आपल्या सोबत आणण्याचे माझ्या मनात फार आहे.''

''छेऽ छेऽऽ मला नाही पटायचं ते.'' रूपाली दोन्ही हात हलवीत ठामपणे म्हणाली. ''अगं रूपाली, आईला काय वाटेल? माझ्या आईची माया काय आहे हे तुला कळायचं नाही.'' रूपाली आपल्या कथनावर ठाम होती. आपण आपल्या कर्तव्याला चुकत आहोत ही बोच श्रीहरीला सतत लागून राहिली होती. या द्विधा मन:स्थितीतून मार्ग काढण्यासाठी काय करावे सुचेना; कारण तो रुपालीच्या प्रेमात पार बुडालेला होता... शेवटी लग्न झालं. मनावर दगड ठेवून श्रीहरीने आईला आपला निर्णय कळवला. सुनेच्या राज्यात चार दिवस सुखाचे येतील हे सारजाबाईचे स्वप्न भंगले. इकडे श्रीहरी आणि रूपालीचा राजा-राणीचा संसार सुरू झाला आणि सारजाबाई विंजेवाहीला जाऊन स्वाभिमानाने आपली पिढीजात कास्तकारी करू लागल्या. संसार सरिता वाहत होती. श्रीहरी रुपालीच्या संसारवेलीवर फूल उमजले. लहानग्या शंभूच्या कोडकौतुकात आईच्या एकटेपणाचे श्रीहरीला वाटणारे दुःख बाजूला पडले. नातवाचं तोंड बघायला म्हणून सारजाबाई शहरात आल्या, पण त्याच दिवशी माघारी विंजेवाहीला परत गेल्या. त्यांना एक दिवस तरी मुक्कामाला थांबा, असेही सुनेने म्हटले नाही. बघता बघता दिसामासांनी शंभू आता पाच वर्षाचा झाला होता. तो रुपालीसारखाच दिसायला सुंदर आणि श्रीहरीसारखा हुशार होता. एकदा गावात भली मोठी जत्रा आली. त्यात खूप सारी दुकाने, आकाश पाळणे आणि विविध मनोरंजनाची साधने होती. त्यादिवशी रविवारची सुट्टी म्हणून शंभूला आकाश पाळण्यात बसवावे म्हणून श्रीहरी आणि रुपाली दोघेही छान तयार होऊन निघाले. आकाश पाळण्यात बसून छोटा शंभू अत्यानंदाने टाळ्या पिटत होता. त्यानंतर विविध ठिकाणी गमतीची दृश्ये बघताना सारे रंगून गेले होते. जत्रेत चिक्कार गर्दी होती आणि नकळत त्या गर्दीत शंभूचा हात सुटला. जरा वेळाने लक्षात आले तेव्हा शंभू कुठे दिसेना. रुपालीचा जीव क्षणात वेडापिसा झाला. दोघेही इकडे तिकडे बघत विचारपूस करू लागले, पण शंभू कुठेच दिसत नव्हता. कुठे गेला असेल शंभू? कुणी पळवून तर नेला नसेल? या विचाराने दोघेही कावरेबावरे झाले. जत्रेच्या संचालकांकडून मुलगा हरवला म्हणून उद्घोषणा करण्यात आली. बराच वेळ झाला तरी शंभूचा पत्ता लागेना तेव्हा मात्र रुपालीच्या तोंडचे पाणी पळाले. शंभू तिचा जीव की प्राण होता. संपूर्ण जत्रा पुन्हा पुन्हा शोधून झाली, पण शंभू सापडला नाही. ''मी शंभूशिवाय क्षणभर जिवंत राहू शकणार नाही. तुम्ही उगाच जत्रेला जायचा बेत केला. शंभूला आताच्या आत्ता शोधून आणा,'' असं म्हणून ती ओक्साबोक्शी रडू लागली. ''रुपाली रडू नकोस. कुठे जाणार आहे. सापडेल, धीर धर.'' श्रीहरी रुपालीची समजूत काढत होता. आता मात्र रुपाली खूप चिडून म्हणाली, ''एका आईचं मन काय असते, ते तुम्हाला समजणार नाही'' असं रुपालीने निक्षूण सांगितले तेव्हा श्रीहरीला तिच्यातील आईची माया दिसून आली. लोकांच्या सूचनेवरून दोघेही घाबरेघुबरे चेहरे घेऊन पोलिस ठाण्यात पोहोचले. ''माझा शंभू मिळेल ना हो! कुठे गेला असेल?'' रुपाली अगतिकतेने विचारात होती. ठाणेदार साहेबांनी दोन्ही हाताचे पंजे नाचवत शांत राहण्याची खूण केली आणि कागद ओढून लिहायला सुरुवात केली... 'नाव काय? वय सांगा. वर्ण कसा होता? कोणत्या रंगाचे कपडे घातले होते. त्याला तुम्ही रागावले किंवा मारले होते काय? याआधी कधी तो पळून गेला होता काय? तुमचा कुणावर संशय आहे काय?' एक ना दोन, ठाणेदार साहेबांच्या प्रश्नांनी रुपाली अधिकच घाबरली. ''नाही नाही हो ठाणेदार साहेब, हे काय बोलताय. आमच्या या एकुलत्या एक पोराला आम्ही कधीच मारत वगैरे नाही. त्याला एकटे कुठे जाऊ देत नाही. आज जत्रेत त्याला गंमत वाटेल म्हणून आम्ही घेऊन आलो होतो. आणि तिथेच तो हरवला हो..'' असं म्हणून तोंडाला पदर लावून रुपाली पुन्हा मुसमुसून रडू लागली.

''तुम्ही अगोदर आवरा बरं बाईला'' असे ठाणेदार तुटकपणे बोलले. आता श्रीहरी तिला शांत करत होता. पण रुपाली काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हती. तेवढ्यात बाहेर चाहूल लागली. एक शिपाई जत्रेत सापडलेला मुलगा आणला म्हणून सांगू लागला. श्रीहरी आणि रुपाली धावतच बघायला गेले. तो शंभू होता. सारखा रडत होता. रुपालीने धावत जाऊन त्याला उचलून पोटाशी धरले. तेव्हा कुठे दोघांच्याही जिवात जीव आला. ''माझं लेकरू गं. मला सोडून तू कुठे गेला होतास रे बाळा! मला तुझं विरह एक क्षणही सहन होऊ शकत नाही...'' असे म्हणून तिघेही तेथून बाहेर पडले. ''चल लवकर, बस मिळायला हवीय!'' असं म्हणून शंभूला कडेवर घेऊन श्रीहरी भराभर पाऊले टाकू लागला. ''अहो, कुठे निघालात? आपल्याला तर घरी जायचंय ना? मग बस कशाला हवीय?'' रुपाली विचारत होती.

''मी आता घरी न जाता थेट विंजेवाहीला जाऊन आईला घेऊन येणार! मुलगा जर डोळ्यांआड झाला तर आईची माया कशी असते, हे तुलाही अनुभवाने कळले असेलच. माझ्याविना आईची कशी स्थिती झाली असेल, हे मी समजू शकतो. आता मी कुणाचे हे ऐकणार नाही आणि झालेली चूक लगेच दुरुस्त करणार म्हणजे करणार!''रुपाली विचारमग्न झाली.

(पान ६ वर)

# म्हणोनि माझां स्वरुपीं, मनबुद्धि इयें निक्षेपीं



प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

'श्रीमद्‌भागवत' या ग्रंथात भक्तश्रेष्ठ प्रल्हादाने परमेश्वराची भक्ती किती प्रकारांनी करता येते, या संबंधाने एक सुभाषित सांगितलेले आहे.

**'श्रवणं कीर्तनं विष्णो: स्मरणं पादसेवनं।**
**अर्चनं वंदनं दास्यां सख्यमात्मनिवेदनं।।'**

यालाच आपण 'नवविधाभक्ती' असे म्हणतो. परमेश्वराला भक्तीच्या माध्यमातून प्राप्त करण्याच्या या नऊ विधा आहेत. या नऊपैकी कोणत्याही प्रकाराने भक्ती केली, तरी, त्या मागे आपली दृढ श्रद्धा असायला हवी. ही नवविधा भक्ती म्हणजे भक्तीच्या, चढत्या श्रेणीतील पायऱ्या आहेत, असेही काही अभ्यासकांचे मत आहे. प्रत्यक्ष शास्त्रात भक्तीची निरनिराळी लक्षणे सांगितलेली आहेत. देवर्षी नारदांनी भक्तीची १२ सूत्रे सांगितलेली आहेत.

भक्तीचे काही सिद्धांतही आहेत. भक्तीचे अनुसरण करून परमेश्वराला प्राप्त करून घेण्याचे मार्ग जरी भिन्न असले, तरी त्यांचा शेवट एकाच ठिकाणी होतो आणि तो म्हणजे त्याच्या चरणांपाशी. अशा भक्तीचा अवलंब करायचा असेल, तर आपले मन श्रद्धेने भगवंतावर ठेवणे आणि बुद्धी त्याच्या ठायी स्थिर ठेवणे; याशिवाय दुसरा पर्याय नसतो. गीतेच्या १२ व्या अध्यायाच्या प्रारंभी अर्जुन भगवंताला विचारतो-

**'तरी तुजलागीं कर्म। तूंचि जयांचें परम।**
**भक्तीसी मनोधर्म। विकोनि घातला।।**
**इत्यादि सर्वींपरीं। जे भक्त तूंतें हरी।**
**बांधोनियां जिव्हारीं। उपासिती।।**
**आणि प्रणवापैलीकडे।**
**वैखरीयेसि जें कानडें।**
**कायिसयाहि सांगडें। नव्हें जें वस्तु।।**
**तें अक्षर जी अव्यक्त। निर्देश देशरहित।**
**सो डहंभावे उपासित। ज्ञानिये जे।।**
**तयां आणि जी भक्तां।**
**येरयेरांमाजीं अनंता।**
**कवणें योगु तत्वता। जाणितला सांगा।।'**

अर्जुनाच्या या प्रश्नावर उत्तर देताना भगवंताने अनेक बाबी स्पष्ट केल्या आहेत. अत्यंत विस्ताराने पार्थाच्या समस्येचे समाधान करताना भगवान म्हणतात...

**'उचललेया प्राणासरिसीं।**
**इंद्रियेंही निगती जैसी।**
**तैसा मनोबुद्धिपाशीं। अहंकारु ये।।**
**म्हणोनि माझां स्वरुपीं।**
**मनबुद्धि इयें निक्षेपीं।**
**येतुलेनि सर्वव्यापी। मीचि होसी।।**
**यया बोला कांहीं। अनारिसें नाही।**
**आपली आण पाही। वाहतु असे गा।।'**

प्राण शरीराला सोडून चालला की, सर्व इंद्रियेही त्याच्या मागोमाग निघत असतात, देहाचे सर्व व्यापार आपोआप थांबतात. त्याचप्रमाणे मन आणि बुद्धी ईश्वराच्या ठायी स्थिर केली की, अहंकार आपोआप विसर्जित होतो.

आपण परमेश्वराशी तदाकार होतो. त्याचे आणि आपले रूप स्वतंत्र राहत नाही. असे घडले तर आपल्या मनात परमेश्वराचे स्थान पक्के होते. अगदी थोडा वेळ का होईना, परमेश्वराचे रूप डोळ्यासमोर आणावे. केवळ योग्य किंवा तत्सम साधने यानेच परमेश्वर मिळतो असे नाही.

**'मोटकें निमिषभरी। देतु जाय।।'**

असे माउलीनेच सांगून ठेवलेले आहे. यासाठी चित्त स्थिर करणे हाच एकमेव महत्त्वाचा उपाय आहे. परमेश्वरावर चित्त स्थिर करण्यात, किती आनंद मिळतो हे, तसे करणाऱ्यालाच ठाऊक असते. '**हळू हळू पांडुसुता। मीचि होईल**' अशी अवस्था येते. ईश्वराविषयी जे परम उत्कट प्रेम आहे, तेच अमृत असते. तीच खरी भक्ती असते. भक्तीचा खरा अर्थ सेवा हाच आहे. 'भज सेवायां' या धातूंपासूनच भक्तीच्या योगे सद्‌गुण आणि सदाचार हे आपोआपच येतात.

ईश्वरभक्तीला वयाचे, रूपाचे, धनाचे, विद्येचे, जातीचे कशाचेही बंधन नसते. परमेश्वराला भक्ती एवढी प्रिय आहे की, तो भक्ताच्या दुर्गुणांकडेच काय, सद्‌गुणांकडेही लक्ष देत नाही. तो केवळ एकच गोष्ट बघतो की, या भक्ताची आपल्याप्रती किती निर्व्याज आणि निष्काम प्रीती आहे! या ठिकाणी एक श्लोक आठवतो-

**'व्याधस्यांचरणं ध्रुवस्यच वयो विद्या गजेंद्रस्य का का जातिर्विदुरस्य यादवपतेरुग्रस्य किं पौरुषं। कुब्जाया: कमानीयरूपमधिकं किं तत्सुदाम्नो धनं भक्त्या तुष्यति केवलं न च गुणैर्भक्तिप्रियो माधवा:।।'**

अर्थ असा की, 'व्याधाचे असे कोणते चांगले आचरण होते? ध्रुवाचे वय काय होते? गजेंद्राजवळ कोणती विद्या होती?

विदुराची कुठली उत्तम जात होती? यादवपती उग्रसेनाचा कुठला पुरुषार्थ होता? कुब्जेचे असे कोणते सुंदर रूप होते? सुदाम्याजवळ कुठले धन होते? भक्तिप्रिय माधव फक्त एका भक्तीनेच संतुष्ट होतात, गुणांनी नव्हे!' भक्तीचेही दोन प्रकार आहेत. एक साधनरूपी आणि दुसरी साध्यरूपी. यात सेवा हे साधन आहे आणि प्रेम हे साध्य आहे. सर्व संतांची हीच शिकवण आहे. त्यासाठीच त्यांनी निर्मळ भक्तीचा मार्ग दाखवला. यातूनच ज्ञानप्राप्ती होते.

ज्ञानप्राप्तीसाठी श्रवण, मनन, चिंतन आणि विवेक ही चतु:सूत्री महत्त्वाची आहे. यासाठी संतांची सांगत लाभणे महत्त्वाचे आहे. या विभूतींकडूनच अध्यात्मशास्त्राच्या एकेका पायरीची ओळख होते. समर्थ म्हणतात-

**'सत्संग आणि सच्छास्त्रश्रवण।**
**अखंड होतसे विवरण।**
**नाना सत्संग आणि उत्तम गुण।**
**परोपकाराचे।।**
**जे सत्कीर्तीचे पुरुष। ते परमेश्वराचे अंश।**
**धर्मस्थापनेचा हव्यास। तेथेचि वसे।'**

भगवंताच्या चरणाचा आश्रय घेतल्याने, त्याचे सतत स्मरण केल्याने आपल्या मनातील दु:खाचा निरास होतो. भगवंताचे नाम, रूप, गुण, प्रभाव, लीला, तत्त्व आणि रहस्य यांचे प्रेममग्न होऊन स्मरण केल्याने आपण त्याच्यात तल्लीन होतो.

गीतेमध्ये विश्वरूप दर्शनाच्या पुढच्या अध्यायात भक्तीचा विषय आला आहे. या अध्यायाचा समारोप करताना श्रीकृष्णाने म्हटले आहे की, 'अनन्य अशा भक्तीच्या योगे मला बघणे आणि माझे स्वरूप जाणून घेणे आणि माझ्या ठायी प्रवेश करणे सहज शक्य आहे. माझ्या साठी कर्मे करणारा, साऱ्या आसक्तीपासून दूर झालेला, कुणाबद्दलही वैरभाव मनात न धरणारा असाच माझा परमभक्त असेल तर, तो मला येऊन पोहोचतो.' ११ व्या अध्यायाच्या अखेरचा हाच धागा पकडून १२ व्या अध्यायाच्या प्रारंभी अर्जुन विचारतो आहे, 'सतत युक्त असे तुझे भक्त आणि अव्यक्त अक्षराचे उपासक या दोहोंमध्ये अधिक जाणते कोण?'' यावर भगवंताने दिलेले उत्तर प्रारंभी वर आलेलेच आहे. अशा निश्चयी भक्ताविषयी भगवंत म्हणतात-

**'अपि चेत्सदुराचारो भजते**
**मामनन्यभाक।**
**साधुरेव स मन्तव्य:**
**सम्यग्व्यसितो हि स:।।**
**क्षिप्रम भवति धर्मात्मा**
**शश्वच्छान्तिम निगच्छति।**
**कौंतेय प्रति जानीहि**
**न मे भक्त: प्रणश्यति।।'**

'जरी कुणी अतिशय दुराचारीसुद्धा अनन्य भावाने माझा भक्त होऊन माझे भजन करील, तर त्याला साधू मानणे योग्य आहे. कारण तो दृढनिश्चयी आहे.

त्याने निश्चय केला आहे की, देवाच्या भक्तीशिवाय दुसरे काहीही नाही. म्हणून तो लवकर धर्मात्मा होतो आणि शाश्वत अशी परमशांती प्राप्त करतो. हे अर्जुना, तू निश्चयपूर्वक सत्य समज की, माझा भक्त नष्ट होत नाही.'

# टिळक आणि वेदकालनिर्णय

प्रबंधाची बीजे
श्रीरंग हिर्लेकर



वेद ही प्रत्यक्ष कोणा एकाची रचना नाही. वेद अपौरुषेय आहेत. 'ऋषयो मंत्र द्रष्टारा:' असे म्हणतात. याचा अर्थ ऋषींना मंत्र दिसतात. त्यांच्या प्रातिभ अवस्थेत ज्या वैश्विक सत्याची जाणीव झाली ती ऋचा अथवा मंत्र रूपात त्या त्या ऋषींच्या नावे सूक्ते म्हणून प्रचलित झाली. या सर्वांचे व्यवस्थित संकलन आणि विषयानुरूप विभागणी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या पद्धतीने महर्षी व्यासांनी केली म्हणून त्यांना गौरवाने वेदव्यास असे म्हणतात. पण या प्राचीन ऋषींनी जी दिव्य सूक्ते सांगितली त्यांचा नेमका रचनाकाळ अज्ञात आहे. तो ठरवणे म्हणजे वेदकालनिर्णय.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना अनेक जण केवळ देशभक्त, केसरीचे संपादक आणि फार तर गीतारहस्यकार म्हणून ओळखतात. गीतारहस्यात कर्मयोगाचा पुरस्कार करणाऱ्याने ज्योतिषावर काही लिहावे, याचे आश्चर्य वाटू शकते. मात्र टिळकांनी जे लिहिले ते फलज्योतिषासंबंधी नसून अवकाशीय ग्रहगोल आणि त्यांच्या भ्रमणकालासंबंधी केलेल्या गणितांच्या अभ्यासावर लिहिले. टिळक थोर गणिती, खगोलशास्त्री, संस्कृत आणि वेदवाङ्‌मयाचे विद्वान पंडित होते हे अनेकांना माहीत नसेल. त्यांनी गीतारहस्याव्यतिरिक्त २ ग्रंथ लिहिले. एक म्हणजे 'आर्टिक होम इन द वेदाज्.' यात वेदांतील अनेक संदर्भांचा योग्य अन्वय लावून सिद्ध केले की, हिमयुगापूर्वी आर्यांची मूळ वसाहत उत्तर ध्रुवावर होती. वेदांतील काही ऋचांतील दीर्घकालीन रात्र व दिवसाचे संदर्भ ध्रुवप्रदेशाशी जुळतात, हे सर्वांनाच माहीत आहे. त्यांचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'द ओरिएन ऑर रिसर्चेस इनटू द अँटीक्यूटीज ऑफ द वेदाज्' हा असून त्याची रचना इ. स. १८९३ मध्ये केली होती. त्याचे मराठी सारभूत असे अवतरण म्हणजे के. रा. ओगले यांनी इ. स. १९०८ मध्ये लिहिलेले 'वेदकालनिर्णय' हे पुस्तक. या गोष्टीला आता ११७ वर्षे उलटून गेली आहेत. माझ्या दुर्मिळ ग्रंथसंपत्तीत हे पुस्तक जीर्णावस्थेत आहे. त्याचे वैचारिक आणि सामाजिक मूल्य ओळखून मी त्याची एक प्रत तयार केली. शब्दरचनेतही काही बदल केले.

दोनही पुस्तकांत वैदिक ऋचांचा नेमका अर्थ, अवकाशीय हालचालींची गणिते, भौगोलिक स्थानांविषयी अनुमान यावरून मूळ इतिहासावर प्रकाश पडतो. टिळकांच्या पुस्तकांचे हे संक्षिप्त मराठी स्पष्टीकरण पूर्वी ज्या स्वाभिमानी हेतूने प्रसिद्ध झाले त्याच हेतूची आज पुन: गरज निर्माण झाली आहे आणि म्हणून या पुस्तकाचा परिचय आणि पुनर्मुद्रण होणे अगत्याचे आहे. ते व्हावे ही श्रीवेदपुरुषाप्रति प्रार्थना आहे. याशिवाय भांडारकर संस्थेच्या उद्‌घाटनावेळेस अनेकांनी काही प्रबंधात्मक लेखन केले. त्यात टिळकांनी चाल्डियन अँड इंडियन वेदाज्' नावाचा निबंध लिहून आपली अभ्यासपूर्ण मते मांडली. हे संशोधन पुढे टिळकांच्या चिरंजीवांनी 'वेदिक क्रोनोलॉजी' या ग्रंथात समाविष्ट केले. सामाजिक मूल्य असे जे वर म्हटले ते अशाकरिता की, लोकमान्यांच्या मूळ पुस्तकापूर्वी मेकॉले, मॅक्समुल्लर इत्यादी पंडितांनी अत्यंत पद्धतशीरपणे काही धोरणे योजिली होती. ती म्हणजे जगातील सर्व ज्ञानाची गंगोत्री पाश्चात्त्यांकडेच आहे, ज्ञानाची मक्तेदारी त्यांचीच, हिंदूंचे वेद, ज्ञान इत्यादी अत्यंत अप्रगत देशाचे, नंतरचे व म्हणून टाकावू. आपली जगावरील पकड अबाधित ठेवण्याकरिता अपप्रचार करणे राज्यकर्त्यांना नेहमीच उपयोगाचे असते. मात्र राष्ट्रभक्त, खगोलशास्त्री, संस्कृत तसेच वेदविद्येचे जाणकार अशा टिळकांनी आपल्या अभ्यासाने वेदांचा रचनाकाळ शोधून काढला आणि हिंदू संस्कृती ही सर्वात प्राचीन, जिज्ञासू, अभ्यासू, विद्वान तसेच सुसंस्कृत व प्रगत असल्याचे अत्यंत स्पष्ट आणि निर्विवादपणे सिद्ध केले. पाश्चात्त्यांनी वेदांचा रचनाकाळ इ. स. पूर्व ८०० ते १२०० वर्षे इतका पुढे ओढला. हे सांगण्यात मॅक्समुल्लर, डॉ. हौ, बेंटले, अलबिरुणी आणि अजूनही काही विद्वान अग्रेसर होते. त्यांची मते वर म्हटल्याप्रमाणे राजकीय उद्देशाने प्रेरित, पूर्वग्रहदूषित आणि काही अंशी अज्ञानामुळे होती. टिळकांनी त्या सर्वांचे निर्विवादपणे खंडन करून वेदनिर्मिती ही इ. स. पूर्व ६००० ते २१००० वर्षे पुरातन असल्याचे सिद्ध केले. असे होण्याचे कारण म्हणजे वर उल्लेखित पाश्चात्त्य विद्वांनाची काही गृहीतके ही चुकीच्या आणि कमकुवत पायावर होती. त्यातील एक म्हणजे भाषेचा चुकीचा आधार घेणे. वेदांचे चार प्राथमिक कालविभाग म्हणजे छंदकाल, मंत्रकाल, ब्राह्मणग्रंथकाल आणि सूत्रकाल. प्रत्येक विभागाकरिता त्यांनी २०० वर्षांचे अंतर गृहीत धरले आणि म्हणून इ. स. पूर्व ८०० या उत्तरावर ते थांबले. मात्र असे करताना त्यांच्यातच एकवाक्यता नव्हती. कोणी एकेक विभागाला २०० तर कोणी ३०० ते कोणी ५०० वर्षे दिली. दुसरी एक पद्धत म्हणजे वेद, ब्राह्मणग्रंथ आणि सूत्रे यातील आलेले अवकाशीय ग्रहनक्षत्रांच्या स्थितीसंबंधीचे उल्लेख. खरे म्हणजे हीच पद्धत जास्तीत जास्त निर्दोष म्हणता येईल. पण यातही

भारतीय आणि ग्रीक ज्योतिषांच्या उपलब्ध ग्रंथ व त्यातील गणितात एकमत नव्हते. प्रत्येकाच्या कालमापन पद्धतीतच मुळात वाद होते. वेदातील अनेक संज्ञांचे चुकीचे अर्थ लावणे, तात्कालिक वैदिक व्याकरणाविषयी अज्ञान, अनेक पौराणिक कथा आणि दंतकथातील सूचक अर्थ समजावून न घेता व त्यांना काल्पनिक पुराणकथा म्हणून उडवून लावणे असे झाले. सुदैवाने आपल्या भारतीय ज्योतिषाचा इतिहास या विद्वत्तापूर्ण ग्रंथाचे रचयिता शं. बा. दीक्षित, दप्तरी, गोडबोले, केतकर अशा काही थोर ज्योतिर्विदांनी या दृष्टीने पावले टाकली, पण दुर्दैवाने त्यांचा आवाज क्षीण ठरला. टिळकांनी मात्र त्याच दिशेने प्रयत्न करत आपले सिद्धांत मांडले.

ग्रीक ज्योतिषशास्त्रातील 'ओरायन' नावांचा तारा म्हणजेच आपले मृग नक्षत्र असून वेदांतील त्याचा उल्लेख 'अग्रहायण' असा असल्याचे त्यांनी व्याकरण, अमरकोश इत्यादींच्या आधारे प्रतिपादन केले आणि हे सर्व सांगतांना गीतारहस्यकार टिळक श्रीमद्‌भगवत्‌गीतेतील

'मासानां मार्गशिर्षोऽहम् ऋतुनां कुसूमाकर:' (विभूतियोग १०-३५) हे वचन कसे विसरणार? म्हणजे- मी मार्गशीर्ष मासांत, ऋतूंत फुलला ऋतु। हल्ली वर्षारंभ चैत्र महिन्यात केला जातो. मात्र त्याकाळी नवीन वर्ष मार्गशीर्षात सुरू होत असे व वसंत ऋतूही तेव्हाच येत असे. मृग नक्षत्र हे वेदकालीन वर्षाचे प्रारंभिक नक्षत्र होते. वार्षिक यज्ञ-यागांचा आरंभ त्या मुहूर्तावर केला जाई. म्हणून मार्गशीर्ष हा सर्वात उत्तम व पवित्र महिना समजला जात असे. सूर्य, सौरमंडळ आणि नक्षत्रे यांच्या गती-स्थितीची गणिते मांडून त्यांनी वेदांतील उल्लेखांशी त्यांचे संबंध जोडून वेदरचनाकाल निश्चित केला. याचबरोबर पंचांग गणितांत सुधारणा करून नवीन पंचांग तयार केले. हेच (पान ६ वर)

# झिम्माड पावसाच्या वेल्हाळ आठवणींच कोंदण

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

वारीमधल्या वारकऱ्यांच्या भजना कीर्तनावर खुश होऊन फक्त वारी भिजवण्यापुरते पावसाने येऊ नये कारण आम्ही सुद्धा शेतामध्ये पेरणी करत असताना हरी विठ्ठल असा जप करत असतो याचे भान ठेवून आम्ही पेरणी केलेल्या बियाण्यावर पावसाच्या रूपाने विठ्ठलाची कृपा व्हावी अशी भोळी आणि आणि भाबडी अपेक्षा महाराष्ट्रातील शेतकरी विठ्ठलाकडून ठेवत असतो. ही अपेक्षा नेहमी पूर्ण होते असे नाही. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ शेतकऱ्यांच्या मागे सातत्याने लागलेला असतो आणि अशात एखादा शेतकरी बांधव दुर्दैवाने आत्महत्या करतो. त्यावेळी त्या शेतकऱ्याला इतर शेतकरी काय सांगत असतील... आता गेलासच तर कर्ज देवाला माग दुसर काही नाही पाण्याचे नक्षत्र माग, म्हणजे तुझ्यामागे लागणार नाही आत्महत्या करणारांची रांग, देवाला अवतार कास्तकाराचा घेऊन यायला एकदा सांग...

मेल्यावर देवाकडे गेल्यावर देवालाही कर्ज मागायचं आहे. मात्र त्या कर्जरूपाने पाण्याचे चार नक्षत्र शिल्लक मागावे. भरपूर पाऊस पडला ते आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची रांग लागणार नाही. या शेतकऱ्यांचे दु:ख समजून घेण्यासाठी देवाला कष्टकराचा अवतार घेऊन जन्म घेणे किती गरजेचे आहे. हे सुद्धा या ठिकाणी सांगावसे वाटते, कारण तापलेल्या मातीसाठी आणि हिरव्या पानासाठी आभाळाचे भरून येणे गरजेचे आहे. मात्र ते भरून येते का हा प्रश्न उरतोच? जर पाऊस नाही आला तर शेतामध्ये लावलेला सोन्यासारखं बियाणं फेकून देता येत नाही. कारण अनेकदा ते बियाणे विकत घेण्यासाठी लेकरांच्या चोचीतले दोन दाणे कमी करून ते मातीत पेरलेले असतात. तापलेल्या रानासाठी अन् हिरव्या पानासाठी येईना हे आभाळ भरून? राख झाली सोन्याची दयावी कशी कोरड्या नदीत फेकून असं असताना दुबार पेरणीची वेळ आली की शेतात पहिल्यांदा पेरलेली बियाणे मातीमोल होऊन जाते. असे असले तरी पाऊस सर्वांना हवा असतो. फक्त चातकालाच नव्हे तर ओसाड उजाड वाड्यालाही पावसाबद्दलची आतुरता असते कारण हा पाऊस जर भरभरून कोसळला तर मातीत राबणाऱ्या शेतकऱ्याच्या अंगावरच्या घामातून नवीन अंकुर फुलवत नवीन आशा अपेक्षेचा दान पदरात टाकतो म्हणूनच म्हणावे वाटते, ओसाड उजाड वाड्याला चातकाची सर देऊन गेला. घाम भिजल्या काळीत नव अंकुर रूजवून गेला; चैतन्याच्या पालविला नवा फुलोरा देऊन गेला. पाऊस असा आज तो अंगणात खेळून गेला; अमृत शिंपडून अस्तित्वास संजीवनी देऊन गेला. अशा रीतीने चराचराच्या अस्तित्वास संजीवनी देणार तर कोणी असेल? तर तो पाऊस असतो. असा हा पाऊस लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचा आपला असतो.

पावसाची संस्कृती ही एक मनात जपावी अशी संस्कृती आहे. जगाला मोहनजोदडो आणि हडप्पा संस्कृतीबद्दल खूप अप्रूप आहे. मात्र, मला सर्वात जास्त आवडते ती पावसाची संस्कृती, कधी पहिला पाऊस पडल्यानंतर मातीला कस्तुरीचा गंध आल्याचा आनंद वेगळा असतो. तर कधी मिरगाचा किडा म्हणून मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यानंतर घरात निघणाऱ्या काळसर किड्याला कुंकू लावून आबादानीची बरकत मागणारी आजी आठवते. चिंब पावसात भिजत असते तरी स्वत:च्या तालात टाळ चिपळ्या घेऊन ज्ञानोबा माऊलीचा जयघोष करणारे वारकरी आठवतात. पडत्या पाण्यात



कधी रिमझिम कधी झिम्माड पाऊस, उघडतो मनाचे कवाड, मनाच्या कप्प्यात इंद्रधनुचे रंग, मन ओथंबलेले जरी कोरडे अंग, देतो चिंब भिजलेले क्षण काही, पावसा जवळ दुसरे धन नाही... पावसाच्या आठवणी आणि पावसाचे संदर्भ आठवले की मन पाहता पाहता जीवनातील अनेक आठवणीच्या संदर्भाचा पाठलाग सुरू करत.

श्रावणाचे झोके.... त्या झोक्यावर बसून आकाश जिंकण्यासाठी उंच चढवणाऱ्या अल्लड आणि निरागस मुली आठवतात, नागोबा पुजण्यासाठी वारुळा भोवती जमलेल्या आयाबाया दिसू लागतात. वाऱ्याच्या वेगाने सैरावैरा धावणाऱ्या काळसर ढगाकडे पाहत उद्याच्या पावसाचा विचार करून रक्षाबंधनासाठी भाऊ येणार की नाही? याची काळजी करणारी बहीण दिसते. बैलाची शिंग भिजवण्यासाठी का होईना... पण चार थेंब पाऊस घेऊन येणारा पोळा दिसतो. गणपती आणि गौरी विसर्जनासाठी कुठे न्यावे असा विचार करताच गावा शेजारची नदी, विहिरी डोह कसे पाण्याने तुडुंब भरलेली असायचे हेही आठवते. पाऊस खरे म्हणजे पोळ्यानंतर भोळा व्हायचा. मात्र त्याच्या अस्तित्वाच्या खुणा होळीतील रंग खेळल्यानंतर एखाद्या नदी नाल्याच्या डोहामध्ये साचलेल्या आणि मुलांना पोहता येईल इतक्या पाण्यामध्ये उरलेले असायच्या.

रंग खेळून आल्यावर घरात पाणी नाही म्हणून पोहायला जाणाऱ्या मुलांपैकी दोन मुलं एका डोहात बुडून मेल्याचा प्रसंग अजूनही मनात ताजा आहे. शहराच्या नळात पाणी नाही आणि शहराच्या आजूबाजूला डोहात पाणी होते असा तो काळ होता.

आज ही पावसाची संस्कृती सुद्धा बदलली की काय असा प्रश्न पडतो. मिरगाच्या किड्याची जागा विजेच्या दिव्या भोवती घाणेरडा वास सोडणार्या आणि अंगावर पुरळ उठवणार्या घातक किड्यांनी घेतली. ह्या किड्यासोबत घरातील मुंगीसुद्धा मरावी इतक्या निष्ठुरतेने घराला पेस्ट कंट्रोल करून घेण्याची पद्धत अस्तित्वात आली आहे. चिमणीला तर घरामध्ये खोपा करायला आम्ही जागाच ठेवली नाही. कस्तुरीचा सुगंध यावा, अशी माती सिमेंटच्या थराखाली झाकली गेली. नागपंचमी नावाचा काही सण असतो हे शहरातील मुलांना सांगूनही समजत नाही आणि पटतही नाही. पोळ्याच्या दिवशी ट्रॅक्टरचा पोळा भरून वृषभ राजाचा होणारा अपमान आपण याच डोळ्याने पाहत आहोत. रक्षाबंधन मात्र आजही उत्साहात साजरे होते मात्र ते व्हाट्सअप वर स्टेटस म्हणून भावा बहिणीचा लहानपण चा फोटो ठेवून....

एकंदर काळ बदलला तसे माणसे बदलते, माणसं बदलली तसे माणसाची वृत्ती बदलली. या बदललेल्या माणसाची निसर्गाशी असलेली ओढ बदलली. ऋतुचक्राशी असलेले नाते बदलते. मग पाहता पाहता ऋतूसुद्धा बदलले.

ऋतूंचं स्वभाव बदलून वागणं सृष्टीच्या हिताचं कधीच नव्हतं. मात्र हे समजून घेताना माणसाने बराच उशीर केला आहे. असे म्हणावे तर निसर्गापासून फारकत घेतल्यामुळे आपण किती अडचणीत आलो आहोत याची परिपूर्ण जाणीव सुद्धा असून माणसाला झालेली नाही हेही तेवढेच खरं आहे. मात्र, जेव्हा मनुष्य त्राही त्राही करू लागतो. तेव्हा त्याच्या जगण्याचा आणि जीवनाचा आणि मनाचा दहा मिटवण्यासाठी पाऊस धावून येतो. हा पाऊस धरतीचा आणि आपला दाह मिटवण्यासाठी कायमस्वरूपी तत्पर आहे म्हणूनच म्हणावसं वाटते,

धरतीच्या तापासाठी टोचाव्यात पावसाच्या हजारो सुया बरसला की ढेकळात विरघळते मनामनातली असुया चिंब भिजलेले उरावेत काही थेंब मनात पावसाचे भिजल्या क्षणांनी मिटवावे दु:ख नकोशा दिवसांचे (उत्तरार्ध)



# ग्रहसंकेत

## (रविवार, २४ ऑगस्ट ते शनिवार, ३० ऑगस्ट २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, २४ ऑगस्ट** - मौनव्रतारंभ, चंद्रदर्शन (१९: ५० पर्यंत), क्रांतिवीर राजगुरू जयंती, महादेवगिरी महाराज पुण्यतिथी कुंडल (ता. पलूस), भारतीय भाद्रपद मासारंभ, बालमुकुंद बालावधूत जयंती कोल्हापूर * **सोमवार, २५ ऑगस्ट** - तृत्तीया श्राध्द, चक्रधरस्वामी जयंती, शरण शिवलिंगेश्वर अडुपल्लकी माधन हिप्परगा (ता. आळंद) * **मंगळवार, २६ ऑगस्ट**- हरितालिका तृतीया, स्वर्णगौरी व्रत, सामश्रावणी, मन्वादि, चतुर्थी श्राध्द, रामतनुमाता समाधी दिन तुर्भेगाव, पांडूरंग सुतारमहाराज पुण्यतिथी करंजखोळ (ता.महाड) * **बुधवार, २७ ऑगस्ट**- श्री गणेश चतुर्थी, चंद्रदर्शन निषेध (चंद्रास्त २१:२८), जैन संवत्सरी (चतुर्थी पक्ष), श्रीपाद श्रीवल्लभ जयंती पीठापूर, सीतारामबाबा पुण्यतिथी खर्डा (ता. जामखेड) * **गुरुवार, २८ ऑगस्ट**- श्री गजानन महाराज पुण्यतिथी शेगांव, ऋषि पंचमी, मच्छिंद्रनाथ जयंती, कलावतीदेवी जयंती बेळगाव, श्री गणपती रथोत्सव तासगाव, जैन संवत्सरी (पंचमी पक्ष), पर्युषण पर्वारंभ (दिंगबर), श्री आत्मगजानन भद्रोत्सव, अंगापूर वंदन जि. सातारा * **शुक्रवार, २९ ऑगस्ट**- सूर्यषष्ठी, श्री बलराम जयंती, कार्तिकेय दर्शनाने पापनाश, राष्ट्रीय क्रीडा दिन, संत बापूदास महाराज पुण्यतिथी फलटण, संत बागडेबाबा पुण्यतिथी, तपोवन भुयार व बावची ता. मंगळवेढा * **शनिवार, ३० ऑगस्ट**- मुक्ता भरणव्रत, पुर्वा रवि (वाहन म्हैस), राष्ट्रीय लघुउद्योग दिन, स्वामी रामानंद सरस्वती पुण्यतिथी चिंचगाव टेकडी ता. माढा (कुर्डूवाडी)

**मुहूर्तः-** * **साखरपुडा**- २४, २५ ऑगस्ट * **डोहाळ जेवण**- २६ ऑगस्ट * **बारसे**- २५, २८ ऑगस्ट (१८ पर्यंत) * **जावळ**-२८, २९ ऑगस्ट (१२ पर्यंत) * **गृहप्रवेश**-२५, २८, २९ ऑगस्ट (१२ पर्यंत)

### मेष :- सणवार आनंदात

ज्यांचे आपण चांगले केलेले असते, तेच आपली निंदाही करतात. शनिच्या प्रतियोगात मंगळ त्यामुळे चांगले राहूनही त्रासच संभवतो. आगामी सणवार आनंदात साजरे होतील. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. कला- गुणांचा विकास होईल. नव्या कामांना गती मिळेल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. शुभ ता. २४, २६, २८

### वृषभः- श्री गणेशाची उपासना करावी

आयुष्यभर राज्य करण्यासाठी मनाचा मोठेपणा व नीतिमत्ता निर्मळ लागते. राशीतील हर्शल मृगजळा मागे धावायला लावणार आहे. जय- पराजयाचा विचार न करता कार्य करीत रहा. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. फार दगदग करू नका. अडचणी निवारणार्थ श्री गणेशाची उपासना करावी. शुभ ता. २६, २७

### मिथुनः- वेळीच मार्ग निघेल

सप्ताहात सात वार असतात. आठवा वार परिवार असतो. परिवार ठिक असेल तर सा-तही वार सुखद असतात. चौथा मंगळ शनिच्या समोर त्यामुळे घरातील वातावरण शांती, समाधानाचेच ठेवावे. आर्थिक चिंता करू नका. वेळीच मार्ग निघत जाईल. नव्या कामांना गती देता येईल. अडचणींची चिंता नको. सर्व मना सारखे घडेल. शुभ ता.२४, २६

### कर्कः- प्रतिकुलतेवर मात

समुद्रात कितीही मोठे वादळ आले तरी समुद्र आपली शांतता मर्यादा सोडत नाही. राशीतील बुध- शुक्रामुळे कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. धार्मिक, सामाजीक कार्यात पुढाकार घ्याल. नोकरी, व्यवसायात अनुकूलता राहील. सरकारी कामे करून घ्यावीत. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान लाभेल. महत्त्वाचे व्यवहार विचारपूर्वक करावेत. प्रतिकुलतेवर मात कराल. शुभ ता. २६, २८

### सिंहः-मार्ग चांगलाच रहावा

दोन - चार निंदक असल्याशिवाय आपल्या जीवनाचा विकास होत नाही. राशीतील राशीस्वामी रविच्या जोडीला बुधही येत आहे. त्यामुळे आठव्या शनिची चिंता नको. आपला मार्ग चांगलाच कसा राहिल. याचा सदैव विचार करावा. अनावश्यक खर्च टाळावेत. ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्रात अनुकूलता राहील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २६, २७

### कन्याः- उतावीळपणा टाळावा

आपले जसे विचार तसेच आपण करतो. कोणी पक्ष्यांना मारण्यासाठी बंदूक ठवतो तर कोणी पक्षांसाठी पाणी. राशीतील मंगळामुळे उताविळपणा टाळायलाच हवा. कुटूंबातील वातावरण चांगलेच कसे राहिल, याकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. कला- गुणांचा विकास होईल. कार्यक्षेत्राबाबत चिंता नको. अपेक्षित फलप्राप्ती मिळेल. उष्णतेपासून त्रास संभवतो. शुभ ता. २६

### तुलाः- परिश्रमातून प्रगती

दुसर्यांच्या मनाप्रमाणे आपण वा-गतो, तो पर्यंतच आपण त्यांना चांगले असतो. कर्मस्थानी बुध, शुक्र आहेत. त्यामुळे कार्यक्षेत्रात अपेक्षित घटना घडतील. अनावश्यक खर्च टाळावेत. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या संधी लाभतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. परिश्रमातून प्रगती साधता येईल. शुभ ता. २४, २६

### वृश्चिकः- वादाचे प्रसंग टाळावेत

माणूस घरे बदलतो, मित्र, कपडेही बदलतो पण तो दुःखीच असतो कारण तो स्वताः बदल नाही. सुखस्थ राहूमुळे कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे अस्वास्थ राहिल. सामंजस्याने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २४, २६, २८

### धनुः- अडचणीतून मार्ग निघेल

कोणतेही स्वप्न नवसाने पूर्ण होत नाही. त्यासाठी परिश्रमाचा डोंगर उचलावा लागतो. कर्मस्थ मंगळामुळे कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. छोटी पणोती असल्याने सर्वबाबतीत विचाराने रहावे. स्थावर प्रश्न विचाराने सोडवावेत. महत्त्वाची कामे विचारपूर्वक करावीत. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक सौख्य लाभेल. शुभ ता २६, २८

### मकरः- सुख स्वास्थ लाभेल

आपल्याबरोबर राहूनही जो कटकारस्थान करतो, त्यापेक्षा दुसरा मोठा शत्रू नाही. कौटुंबिक सुख स्वास्थ लाभेल. महत्त्वाची कामे सप्ता-हात पूर्वाधात करावीत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सुसंधी लाभतील. नव्या कामांना गती मिळेल. स्पर्धामध्ये यश मिळेल. अनुकूलता वाढत जाईल. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. फार चिंता करू नका. शुभ ता. २६

### कुंभः- विचाराने मार्गक्रमण करावे

जीवन वस्तुस्थिती व स्वप्न या दोन रस्त्यांवरून चालत असते. वस्तुस्थितीचा रस्ता चालणे अवघड असते. धनात शनि तर अष्टमात मंगळ त्यामुळे विचाराने मार्गक्रमण करावे. महत्त्वाची कामे विलंबाने होतील. कला- गुणांचा विकास होईल. गुंतवणूक विचाराने करावी. संतती संबंधात शुभ घटना घडतील. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. २६, २७

### मीनः- सौख्यदायी घटना

मेहनत कराल तर धन, धीर धराल तर काम होईल. इज्जत ठेवाल तर नाव होईल. पंचमातील बुध, शुक्रामुळे सौख्यदायी घटना घडतील. आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. सरकारी कामे करून घ्यावीत. भागीदारीच्या व्यवसायात विचाराने रहावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार चिंता करू नका. श्री गणेशाची उपासना करावी. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २४, २६

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## आनंदहेतूच्या मागण्या

ती त्या मागण्यांच्या मागची निरागसता व आनंद मिळविण्याचा सद्हेतू. सहलीला जायचे म्हणून ती पोरे आनंदीच होती; पण त्यांना त्यांच्या मागण्यांनी तो आनंद द्विगुणीत करायचा होता. मुलांच्या ठायी असलेली ही मागण्यांमागची निरागसता, वय व अनुभव वाढल्यानंतर लोप पावताना दिसते. नंतर त्या मागण्यांचे हेतू वेगवेगळ्या स्वार्थांनी लिप्त होताना दिसतात. म्हणूनच त्या मागण्यांची पूर्तता करताना भ्रष्टाचार केला जातो व हे सारे घडले की, त्या सर्व मागण्यांच्या पूर्ततेतील निखळ आनंद लोपतो. मग या स्वार्थी मागण्यांची यादी घेऊन लोक मंदिरांमध्येही जातात, तेथे वेगवेगळे नवस बोलून देवालाही वेठीस धरतात. मुलांसारखे निरागस मन व निखळ आनंदाची प्रवृत्ती असेल तर त्या भावनेतून उत्पन्न झालेल्या सर्व मागण्या पूर्ण करताना परमेश्वरदेखील भरभरून आनंद देतो व अशा माणसाला मिळणारा आनंद शाश्वत असतो, ती त्याची प्रवृत्ती बनते. तो खराखुरा आनंदयात्री होतो. संदीप खरे लिहितो त्या प्रमाणे, 'मी आस्तिक मोजत पुण्याईची खोली, नवसांची ठेऊन लाच लावतो बोली, तो मुळात येतो इच्छा अर्पून साऱ्या, अन् धन्यवाद देवाचे घेऊन जातो!!'

पान २ वरून

## अन्नसंस्कार - नोमतोम

त्यात नवनव्या यंत्रांची आणि भांड्यांची भर पडत गेली. पूर्वी फक्त ऋतूनुसारच उपलब्ध होणाऱ्या खाद्यवस्तू बाराही महिने मिळू लागल्या. रेफ्रिजरेटर नावाच्या यंत्रानं तर अन्नपदार्थ महिनोन्महिने जतन करण्याची सोयच करून ठेवली. शरीर या सगळ्याला चटावलं. २१ व्या शतकात मोबाईल फोन आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी वेठीला धरलेल्या आयुष्यात जेवण हे स्वतंत्र काम न राहता इतर कामं करता करता उरकण्याइतकं बिन महत्त्वाचं झालं. विविध माध्यमांतून काय खावं पेक्षा काय खाऊ नये सांगणाऱ्या आहारतज्ज्ञांचा एक स्वतंत्र व्यवसायच बहरला. सोबतच कॉर्पोरेट तत्त्वावर चालवली जाणारी रुग्णालयं, वेगवेगळ्या वैद्यकीय चाचण्यांची केंद्रं, रुग्णाईत आणि त्यांच्या काळजीनं



ग्रस्त नातेवाईकांच्या लांबच लांब रांगा हे दृश्य आता सार्वत्रिक आहे. या सगळ्यावर चालणारे अधिकचे दोन व्यवसाय म्हणजे औषध कंपन्या आणि वैद्यकीय विमा. हा चक्रव्यूह भेदायचा तर औषधांच्या गोळ्या जेवणासारख्या न खाता आपलं रोजचं जेवण औषध म्हणून घ्यायला हवं. त्यासाठीच आपल्याला आपले अन्न संस्कार जाणून घ्यायला हवेत. म्हणून हा सगळा खटाटोप!

# इंद्राई





दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

सुरगणा ते चांदवडपर्यंत पसरलेल्या अजिंठा सतमाळ डोंगररांगेत चांदवड तालुक्यात चार किल्ले आहेत, चांदवड, इंद्राई, राज-धेर, कोळधेर! सातमाळ डोंगररांगेत वसलेले हे किल्ले निसर्गतः दुर्गम आणि कठीण आहेत. इंद्राई किल्ला चढताना आपल्याला याचा अनुभव येतो. सह्याद्रीच्या कुशीतील या अवाढव्य, अजस्त्र डोंगररांगा बघितल्यावर कवी यशवंतांच्या खालील ओळी आठवतात-

**'डोंगरांनो का उभे? सांगाल का काही मला?**
**तीनशे वर्षांचिया जो मागला तो मामला !**

इंद्राई हा सातमाळ डोंगररांगेतील अप्रतिम दुर्ग आहे. किल्ल्याची उंची ४४९० फूट आहे. धोडप हा या डोंगररांगेतील प्रथम क्रमांकाचा उंच किल्ला आहे आणि इंद्राई हा दुसऱ्या क्रमांकाचा उंच किल्ला आहे. नाशिक शहरापासून साधारण ६७ किलोमीटर अंतरावर असलेला इंद्राई किल्ला गिर्यारोहकांचा आवडता आहे. नाशिकवरून चांदवडपर्यंत पोहोचल्यावर किल्ल्यावर जायला तीन मार्ग आहेत. सर्वात सोयीचा व प्रचलित मार्ग वडबारे गावातून जातो. या मार्गाने किल्ला चढणे सोयीचे आहे. दुसरा रस्ता इंद्राईवाडी या गावातून जातो. इंद्राईवाडी हे गाव राजदेरवाडी गावाच्या जवळ आहे. किल्ल्याच्या दक्षिणेकडून कोंबडवाडीमार्गे किल्ल्यावर जाणारा तिसरा मार्ग वरील दोन्ही रस्त्यांपेक्षा जरा अवघड आहे. पायथ्याच्या वस्तीतून सोबतीला घेतल्यास या मार्गाने किल्ल्यावर जाणे सोयीचे होते. किल्ल्याच्या दक्षिण बाजूला कातळात कोरलेल्या पायऱ्या तिसऱ्या मार्गाने किल्ला चढल्यास बघता येतात. पहिल्या दोन रस्त्यांनी किल्ल्यावर गेल्यास या पायऱ्या दिसत नाही. इंद्राई किल्ल्याचा विस्तार खूप मोठा आहे. इंद्राई हा इंद्रगड, इंद्रगिरी या नावानेदेखील प्रसिद्ध आहे. इंद्राई आपल्या अवाढव्य आकारासोबत कातळकोरीव स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहे.

किल्ल्यावर खोदीव मार्ग, पायऱ्या, पाण्याची टाके, गुहा, मंदिरे, दोन तलाव असून हे सर्व स्थापत्य अवशेष पाहताना लक्षात येते की, येथे खोदकाम मोठ्या प्रमाणात झाले आहे. वडबारे गावातून किल्ला चढताना प्रथम एक कातळ भिंत आडवी येते. येथे दोन गुहा व पाण्याचे टाके आहे. कातळात खोदलेल्या ५० पायऱ्या पार केल्यावर रस्ता काटकोनात वळतो. कातळखिंडीतून पायऱ्या चढत गडाच्या प्रवेशद्वाराकडे जाताना दरवाज्याच्या अलिकडे फारसी भाषेत नऊ ओळीत शिलालेख कोरला आहे. मोगल सेनापती अलीवर्दीखान याने सातमाळा डोंगररांगेतील किल्ले निजामशाहीशी युद्ध करून जिंकले. या घटनेचा उल्लेख या शिलालेखात आहे. पायथ्यापासून साधारण दोन तास चढून गेल्यावर आपल्याला बालेकिल्ल्यावर जाण्याचा खोदीव पायऱ्यांचा हा मार्ग दिसतो. हा मार्ग पाहून आपला उत्साह वाढतो आणि त्या काळातील स्थापत्यकारांचा अभिमान वाटतो. गडप्रवेश झाल्यावर उजवीकडे काही गुहा आहेत. या ठिकाणी तीन वाटा फुटतात. येथून उजवीकडे गेल्या कातळकोरीव गुहांची रांगच दिसते. किल्ल्याच्या सर्व बाजूंचे कडे दुर्गम असल्याने या किल्ल्याला तटबंदी बांधली नसावी. किल्ल्याच्या कातळकोरीव पायऱ्या चढून गेल्यावर एक प्रवेशद्वार आहे. या दारातून प्रवेश झाल्यावर आपण विस्तीर्ण अशा बालेकिल्ल्यात पोहोचतो. समोरच काही उद्ध्वस्त इमारतींचे अवशेष दृष्टीस पडतात. सह्याद्रीत प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे पूर्वी किल्ल्यावर धान्य तसेच दारूगोळा साठविण्यासाठी, सुरक्षित निवाऱ्यासाठी जागा असावी म्हणून कातळात गुहा खोदल्या जायच्या. इंद्राई किल्ल्यावरदेखील अशा गुहा आहेत व त्या गुहांना कोरीव खांबांचा आधार दिला आहे.

सध्या या गुहा सुस्थितीत नाहीत. येथे काही पाण्याची टाके आणि कातळात खोदलेल्या पायऱ्या दिसतात. दक्षिण दिशेला किल्ल्याचा सर्वात उंच भाग आहे. आपल्याला या रस्त्यात एक तलाव दिसतो. किल्ल्यांवर पाणी नियोजन अगदी उत्तम केल्याचे आढळते. किल्ल्यावर दक्षिणेला भगवा झेंडा लावला आहे. येथून कांचना, राजधेर, कोळधेर, अशा अनेक किल्ल्यांचे दर्शन घडते. पूर्वेकडील किल्ले जसे चांदवड, अंकाई, टंकाई, गोरखगडही दृष्टीस पडतात. इंद्राईवर दोन मोठे तलाव असून एका तलावाजवळ पुरातन शिवमंदिर आहे. या तलावांची निर्मिती पेशवेकाळात झाली, असे इतिहास अभ्यासक सांगतात. पुढे कातळात खोदलेल्या २१ ते २२ गुहा दिसतात. या गुहांना खांबांचा आधार असून यातील काही खांब अष्टकोनी व नक्षीदार आहेत. प्रत्येक गुहेला स्वतंत्र प्रवेशद्वार असले, तरी गुहा आतून जोडलेल्या आहेत. त्याच्या शेजारी पाण्याचे टाके तसेच गोल आकाराचे अनेक छिद्र आपले लक्ष वेधून घेतात. साधारणतः तीन तासात आपली गडफेरी पूर्ण होते. किल्ल्याच्या पूर्वेला 'साडेतीन रोडग्या' नावाचा डोंगर आहे. या डोंगराला वडबाऱ्याचा किल्ला असेही म्हणतात. स्थानिक लोक असे म्हणतात की, प्राचीन काळात चांदवड येथे अगस्ती ऋषींचे वास्तव्य होते. त्यांनी एकदा चार रोडगे बनविले. त्यातील अर्धा रोडगा गायीला खाऊ घातला. उरलेल्या साडेतीन रोडग्यांवर त्यांना तूप घालून खायचे होते. त्यांनी चांदवडच्या घरात तुपाची भिक्षा मागितली, परंतु त्यांना तूप मिळाले नाही. अगस्ती ऋषी क्रोधीत झाले. त्यांनी चांदवडला चांडाळनगरी असा शाप दिला व ते अंकाई किल्ल्यावर निघून गेले. जाताना त्यांनी साडेतीन रोडगे जिथे फेकले तिथे मोठा डोंगर निर्माण झाला, म्हणून या डोंगराला 'साडेतीन रोडग्या डोंगर' असे नाव पडले. या डोंगरावर तीन पूर्ण उंचवटे व एक अर्धा उंचवटा आहे.

इंद्राई किल्ला सातवाहनकालीन असून किल्ल्यावर राष्ट्रकूट आणि नंतर यादवांची सत्ता होती. पुढे इस्लामी आक्रमण झाले व बहमनी सत्तेचे महाराष्ट्रात वर्चस्व निर्माण झाले. सातमाळा परिसर याच सत्तेने काबीज केला. कालांतराने बहमनी सत्तेचीही पाच शकले झाली. पाच स्वतंत्र राजवटी निर्माण झाल्या. सातमाळ परिसर अहमदनगरच्या निजामशाहीच्या अधिपत्याखाली होता. १६ व्या शतकात मोगल सुल-तान शहाजहान याने निजामशाहीविरुद्ध मोठी मोहीम आखली. त्यावेळी शहाजीराजे निजामशाहीची चाकरी करीत होते. त्यांनी निजामशाहीचे रक्षण करण्यास मोगलांविरुद्ध मोठा लढा दिला. मात्र शहाजहानच्या अवाढव्य सेनेपुढे त्यांचा निभाव लागला नाही, अपयश पदरी पडले. पुढे अलिवर्दीखान याने सातमाळा परिसरातील किल्ले जिंकण्याचा धडाकाच सुरू केला. चांदवडचा किल्ला जिंकल्यावर त्याने इंद्राईच्या तत्कालीन किल्लेदार गंभीररावाशी हातमिळवणी करून किल्ला ताब्यात घेतला. या परिसरातील किल्ले जिंकण्यास गंभीररावाने अलिवर्दीखानाची मदत केली व मोगलांकडून भरघोस बक्षीस मिळविले. स्वराज्यात असे काही फितूर असल्याने अनेक वेळा आपल्याला मोठे नुकसान सहन करावे लागले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ. स. १६७० च्या शेवटी सातमाळा डोंगररांगेतील बरेच किल्ले मोगलांकडून जिंकून घेतले. त्यावेळी इंद्राई मात्र मोगलांच्या ताब्यातच राहिला. त्यामुळे शिवरायांचा जास्त सहवास या किल्ल्याला मिळाला नाही. मोगलांकडून किल्ला हैदराबादच्या निजामशाहीकडे गेला; मात्र पेशव्यांच्या काळात झालेल्या भालकीच्या तहात इंद्राई स्वराज्यात सामील झाला. भालकीच्या तहात सातमाळा पर्वतरांगेतील बहुतांश किल्ले मराठ्यांच्या ताब्यात आले. पुढे हे किल्ले निजामाच्या ताब्यात जाणे व परत मराठ्यांच्या ताब्यात येणे हे सत्र सुरूच राहिले.

इंग्रजांनी १८१८ मध्ये इंद्राई किल्ल्यावर तोफांचा मारा करून किल्ला ताब्यात घेतला. या परिसरातील किल्ल्यांवर तैनात सैनिकांनी इंग्रजांना मदत केली त्यामुळे इंद्राईसह अनेक बुलंद किल्ले इंग्रजांच्या ताब्यात गेले. इंद्राई व इतर किल्ले बुलंदहोते. त्यांनी अनेक दिवस शत्रूशी लढा दिला असता मात्र किल्लेदार तसेच सैनिकांच्या फितुरीमुळे इंग्रजांना हे किल्ले जिंकणे शक्य झाले. इंग्रजांनी किल्ल्यांचे अतोनात नुकसान केले. कारण त्यांना हिंदुस्थानाचा गौरवशाली इतिहास मिटवायचा होता. मात्र हेच गडकिल्ले, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू आपली प्रेरणास्थाने आहेत. त्यांचे संवर्धन आणि जतन करणे आपले कर्तव्य आहे.

पान ४ वरून

## आईची माया



तिला श्रीहरीचे विचार पटले. तिघेही अचानक विंजेवाहीला आल्याचे बघून सारजाबाईंना आश्चर्य वाटले. त्यांनी तुकडा-पाणी ओवाळून सुनेचे स्वागत केले. नातवाच्या मुखाचे अवघ्राण केले. ''आई, चल बघू. तुझी बॅग भर. आपल्याला माझ्या घरी शहरात जायचे आहे. आजवर तुझे कष्ट बहु झाले. आता तू आमच्याकडेच आरामात राहा! शेतीवाडी आपण सारे अधेमधे येथे येऊन बघत जाऊ. तू आता अजिबात काळजी करू नकोस.'' रुपालीनेही हसून होकार दर्शवला. ''आई, आजवर झालेल्या आमच्या चुकीला क्षमा करा. आता आपण सारे एकत्र गुण्यागोविंदाने राहू! आईची माया ही वेगळीच असते.'' रुपालीमध्ये झालेला हा लक्षणीय बदल बघून सारजाबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले आणि त्या आनंदाने आपली बॅग भरू लागल्या. मुलांना जे वाटले ते कुणालाही वाटू शकते, परंतु मला जी भावली

पान ५ वरून

## टिळक आणि वेदकालनिर्णय


ते टिळक पंचांग. हे मानावे किंवा नाही यासंबंधी विद्वानात मतांतरे असली, तरी अनेक घरी हे वापरतात. त्यानुसार १४ जानेवारीला येणारी मकर संक्रांत १० जानेवारीला येते, हे अनेकांना ठाऊक असेल. उदगयन फाल्गुनी पौर्णिमेला मान्य केल्यास पितृपक्ष भाद्रपदातच का करावा, याचेही उत्तर टिळकांच्या या ग्रंथामुळे समजते.

टिळकांनी आपले सिद्धांत सांगताना आपल्या वकिली कौशल्याचा पुरेपूर उपयोग केला. आरंभी त्यांनी या विषयाचे महत्त्व, विविध पंडितांची मते सांगत त्यांचे तर्कशुद्ध खंडन केले. नंतर वैदिककालीन पंचांगाविषयी माहिती देत दीर्घकाल चालणाऱ्या यज्ञसत्रांचे काळ आणि त्याला आवश्यक अशा वर्षारंभाविषयी विवेचन केले. पूर्वी वसंतसंपात कृत्तिका नक्षत्रात असल्याचे सप्रमाण सिद्ध केले.



कृतिकेच्या आधी रोहिणीत वसंतसंपात असे या करता प्रजापती आणि रोहिणीची कथा सांगितली. त्याही पूर्वी मृगशीर्षातील वसंतसंपात यावर भाष्य करताना मृगशीर्ष म्हणजेच ग्रीकांचा ओरायन असे सांगत ओरायनची व्युत्पत्ती आग्रहायन अशी सिद्ध करत तेच वेदकालीन वर्षारंभीचे नक्षत्र असेही सांगितले. त्यामागे प्रदीर्घ कालातील संपातबिंदूचे सरकणे हे कारण सांगून मृगाच्या शीर्षाविषयी वेद, ब्राह्मणग्रंथ, आपल्या आणि ग्रीकांच्या पुराणातील नक्षत्रकथांचे संदर्भ व स्पष्टीकरण मांडले. समर्थनार्थ ऋग्वेदातील पुढील संदर्भ पुरावा म्हणून दिला. 'सुषुप्वासं ऋभवस्तदपृच्छतागोह्य क इंदनो अवृबुधत। श्वानं बस्तो बोधयितारमब्रवीत्संवत्सर इदमद्या व्यख्यत।।' याठिकाणी टिळक आणि काही भारतीय ज्योतिर्विदात मतभेद होते. मात्र वर्षारंभ वसंताबरोबर न धरता उदगयनासोबत होता, हे टिळकांचे मतच अधिक ग्राह्य दिसते. दोघांपैकी कोणीही बरोबर असले तरी त्याचा परिणाम वेदकालनिश्चितीच्या पुरातनत्त्वावर होत नाही. म्हणून वेदनिर्मिती ही इसनापूर्वी कमीत कमी ६००० ते २१००० वर्षे आधी होती हे निश्चित. पाश्चात्त्य सांगतात तितकी आधुनिक अजिबात नव्हती. मी या विषयाचा फारच त्रोटक परिचय करून दिला आहे. टिळकांच्या या दोनही ग्रंथांतील विषय अत्यंत क्लिष्ट आणि दीर्घ आहेत. मात्र ज्योतिष अभ्यासकांनी हे समजून घेतल्याशिवाय राहू नये. या ग्रंथात आजही संशोधनाच्या कित्येक संधी आहेत. अर्थात त्यासाठी वैदिक ग्रंथ, व्याकरण आणि ज्योतिषगणिताचा सखोल अभ्यास आवश्यक आहे.

# मन नांवाचे तळघर




सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

न्यूरो-लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग (एनएलपी ) हे तंत्र आपल्याला आपल्या विचारांच्या आणि भाषेच्या मदतीने आपल्या वर्तनावर आणि भावनांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. हे आपल्याला आपल्या ध्येयांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि क्षमता विकसित करण्यास मदत करते. यानुसार आपण जन्मल्यापासून आठ वर्षांचे होईपर्यंत सुमारे सत्तर हजार नकारात्मक विचार आपल्या कानी पडत असतात.

प्रायः पालक, घरातील वडीलधारे, शिक्षक यासाठी हातभार लावत असतात. परिणामस्वरूप बरंच काहीबाही, भयावह मेंदूत साचून राहते. त्याचा योग्य वेळी, योग्य मार्गाने निचरा झाला नाही तर सगळं तळघर भरून जाते आणि साफसफाईला खूप मेहनत घ्यावी लागते. लहानपणीचे डंख जिव्हारी लागलेले असतात-

(१) मी काहीतरी करून दाखविल्याशिवाय माझ्यावर कोणी प्रेम करणार नाही, माझ्याकडे कोणाचे लक्ष जाणार नाही.
(२) मी कायम धीरोदात्त, बळकट, ताकदवरच वाटलो पाहिजे. दुबळ्यांना कोणी भीक घालत नाही.
(३) नकार वाट्याला येऊ नयेत म्हणून मी स्वतःचे खरे रूप दडविले पाहिजे.
(४) काय वाट्टेल ते झाले तरी मी वादविवाद टाळले पाहिजेत.
(५) मी परिपूर्ण असलो तरच लोक माझा स्वीकार करतील.

एलिसाबेथ कुब्लेर- रॉस या स्वीस- अमेरिकन मानसशास्त्रज्ञ महिलेने असह्य दुःख आणि जीवघेणे आजार यांच्याशी माणसे कशी जुळवून घेतात यावर खूप संशोधन केले.

१९६९ साली तिचे डेथ अँड डायिंग हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यामध्ये तिने मृत्युशय्येवर असलेले रुग्ण जशा असह्य वेदना भोगत असतात त्यांचे पाच टप्प्यांमध्ये वर्गीकरण केले.

तिच्या मते आघातांना मानवी भावनांचा सहज प्रतिसाद असा असतो-

(१) नकार- सत्य पटवून घेण्यात होणारी दमछाक
(२) क्रोध- निराशा आणि चिडचिड
(३)सौदेबाजी- अपरिहार्यता शक्य तितकी पुढे ढकलणे, वाटाघाटींचे निष्फळ प्रयत्न करणे
(४) खिन्नमनस्कता- खोलवर रुतून बसलेली उदासी, हताशा आणि हातून काहीतरी मौल्यवान निसटून गेल्याची भावना
(५) स्वीकार- परिस्थितीवर मात करता येत नाही म्हणून आहे ते स्वीकारणे आणि पुढे वाटचाल सुरु ठेवणे

या संशोधनाने दुःख, वेदनांकडे बघण्याच्या पारंपारिक दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला. ही केवळ एक भावनांची लाट नसते तर क्लिष्ट, उत्क्रांत होत जाणाऱ्या मानवी प्रक्रियेला समजूतदारपणे सामोरे जाणे असते, याचा त्यामुळे उलगडा झाला. आपण काही गमावणे स्वाभाविक असते आणि जखमांवर खपली हळूहळू भरली जात असते व त्यादरम्यान स्वीकार आणि विकास यांच्यासाठी अवकाश असतो हेही उलगडले.

**या प्रक्रियेत एक चमत्कारिक द्वैत अध्याहृत असते.**

(१) एकीकडे गमावण्याच्या घटनेने रुदन सुरु असते तर त्याचवेळी दुसरीकडे हायसे वाटत असते.

उदा. वेदनेने तळमळणाऱ्या स्वजनांच्या देहावसनाने पोकळी तर निर्माण होतेच, पण यातनांमधून सुटली ती व्यक्ती, तिचे हाल बघवत नव्हते असं विचित्र संवेदनही मनात येतं.

(२) एका बाजूला अवरोध तर दुसरीकडे अवकाश निर्माण करण्याची धडपडही सुरु असते.

(३) पूर्वस्मृती चाळून बघाव्याश्या वाटत असतात तर त्यांच्यापासून दूरही जावेसे वाटत असते.

आघात एक पूर्णवेळ व्यापणारा सहचर असतो, ज्याच्यासाठी आपण अजिबात सज्ज नसतो. तो आपसूक शोषण करीत असतो. बाह्यतः आपण बिल भरत असतो, मुलांच्या शाळेच्या गडबडीत असतो किंवा हातातील कामे उरकत असतो पण अंतर्यामी दुःखाच्या लाटा, उद्वेगाचे प्रपात, अनाकलनीय अश्रू आणि पूर्ण बधीरतेचे क्षणही जगत असतो. आणि केवळ ते एकच श्रम खरे असतात. म्हणून येणारा थकवा, मागे लागलेली दमछाक आणि त्यातूनही तरून जाण्याची असोशी हे अवाढव्य असतं आणि ते पेलल्याबद्दल कधीतरी पाठीवर शाबासकीची थापही देणे गरजेचे असते.

हे सारं व्यवस्थित हाताळलं नाही तर स्मृतिभ्रंश (मानसिक ऱ्हास) आणि आत्मरोग (रोगप्रतिकारशक्तीने निरोगी पेशींना परदेशी समजून त्यांच्यावर हल्ला करणे) असे दीर्घकालीन विकार संभवतात. मनाने कितीही दमन केलं तरी सर्व काही लक्षात ठेवण्याचा गुणधर्म शरीरात असतो.

आपण टाळल्याने दुःख, वेदना अदृश्य होत नाहीत, त्या शरीरातील स्नायूंमध्ये, अंतःस्रावांमध्ये, मज्जासंस्थेत दडून बसतात आणि योग्य वेळ आली की दबा धरून राहिलेलं सगळं दुप्पट वेगाने उसळी मारून बाहेर पडतं.

मनाच्या तळघरातील बेचैन करणाऱ्या या वेदनांना आपण तीन **प्रकारे पण बहुधा अजाणतेपणे तोंड देत असतो-**

**१) गरजेपेक्षा अधिक भरपाई-** या श्वापदांविरुद्धच्या लढ्यात विचार, संवेदना आणि वर्तन टोकाचे ठेवणे

**२) टाळाटाळ-** दडून राहिलेल्या आघातांनी निद्रिस्तच राहावे आणि त्यानुसार आपल्या जीवनाची आखणी करावी.

**३) शरण जाणे-** लढा अथवा टाळणे या मार्गाने न जाता त्या दुखऱ्या भागांना शरण जाणे हे प्रतिसाद एकदा ठरले की पुढच्या वाटचालीचे नियोजन करता येते.

ही प्रक्रिया घिसाडघाईने पूर्ण करायची नसते, न शरमता नवं शिकणं आत्मसात करण्याची असते.

या तपासण्यांमध्ये काय समाविष्ट असते आणि त्यांतून काय अभिप्रेत असते? सुरुवातीला तर रुग्णाच्या समस्यांचे स्पष्ट चित्र हवे असते आणि उपचारांमागची मनोभूमिका (रुग्णाची आणि त्याच्या स्वजनांची) माहिती असणे आवश्यक असते. या उपचारांमधून काय हाती लागेल आणि निदान झाल्यावर बरे होण्याची शक्यता कितपत हेही तपासून बघायचे असते.

**पुढाचा टप्पा-**

आयुष्याच्या इतिहासातून विकारांचे साचे उलगडून बघायचे असतात. बरेचदा हे साचे स्वयंपोषित आणि आत्मघातकी असतात. मूलभूत भावनिक गरजांची पूर्तताही त्यामुळे होत नाही. नात्यांमधील तणाव, असमाधान आणि परिणामी कामही प्रभावित होत असते.

अशावेळी प्रश्नावलीचा वापर करून, गृहपाठ देऊन उपचार सुरु केले जातात.

अज्ञात आणि बंदिस्त घटनांची नोंदवही-

(१) उत्प्रेरक घटना
(२) तत्क्षणी उदभवलेली भावना
(३) विचार
(४) प्रत्यक्ष वर्तन
(५) त्रासदायक, असह्य वेदना
(६) निरामय दृष्टिकोन
(७) वास्तववादी पर्याय
(८) प्रतिक्रिया
(९) सुधारलेले निरामय वर्तन

या श्वापदांवर मात कशी करायची?

**सहा मार्ग आहेत मदतीला-**

१) विकृतीची तोंडओळख आणि त्याचा साचा
२) मागील लेखात वर्णन केलेले इएमएस शोधून काढायचे आणि त्यांना उत्प्रेरणा देणाऱ्या घटना जाणून घ्यायच्या.
३) बालवयातील आघातांचे स्रोत कुटुंबियांशी चर्चा करून शोधून काढायचे.
४) या साऱ्यांशी जुळवून घेण्याचे डावपेच, रणनीती आखायची. मिळणारे प्रतिसाद तपासून बघायचे.
५) उक्ती आणि कृती यातून अभिव्यक्त होणारा स्वभाव शोधायचा.
६) या साऱ्या संशोधनातून एक घटना -अध्ययन विकसित करायचे.

**निष्कर्ष-उपाय आधारित वर्तन उपचार पद्धती:-**

या संरचनेत काही गृहीतके मनात ठेवून रुग्णावर हळुवार उपचार केले जातात

(अ) बदल अपरिहार्य असतो
(ब) जे बदलता येऊ शकते त्याच वर्तनावर भर देणे
(क) रुग्णाला बदलाची गरज आणि महत्व पटायला हवे.
(ड) रुग्णाने स्वतःच्या जीवनहेतूंची निर्मिती करायला हवी.
(इ) रुग्णाकडे सर्व संसाधने आणि इच्छाशक्ती आहे.
(ई) उपचारांचा अवधी किमान असतो.

सगळे लक्ष भविष्यकेंद्री असावे, समुपदेशनाच्या शब्दकोशात एका मर्यादेपलीकडे रुग्णाच्या इतिहासाला फारसे स्थान नसते.

**वरील गृहीतकांवर विसंबून या संरचनेत उपचारकर्ता खालील टप्पे पार करतो-**

१) तयार उत्तरे विकण्यापेक्षा प्रश्न विचारणे
२) सकारात्मक गुणविशेष, संसाधने, बलस्थाने आणि सर्वसाधारण क्षमतांवर काम करून रुग्णाला बरे करणे
३) काय शक्य आहे याला महत्व देणे, काय जमणार नाही याचा विचार न करणे
४) साहाय्यकारी आणि प्रभावी वर्तनाची नोंद ठेवणे आणि त्याचा योग्य वेळी वापर करणे
५) उपायांची विस्तृत मांडणी करणे, समस्या दुर्लक्षित करणे
६) कृती योजना तयार करणे

बहुधा कल्पनाचित्र हे तंत्र वापरून तळघरात साचलेलं, डांबलेलं **हळूहळू बाहेर काढले जाते. त्यांमधून हाती लागू शकते-**

अज्ञात साच्यांचा परिचय आणि तोंडओळख स्रोतांचा सुगावा

स्व-घातकी मार्गांचा अवलंब होण्याची शक्यता स्वतः निवडलेली हाताळण्याची पद्धत बालवयातील अव्यक्त समस्या (कुटुंबातील मोठ्या व्यक्तीकडून अत्याचार वगैरे) त्या समस्यांचे सध्याच्या जीवनातील प्रतिबिंब आणि परिणाम या अंधारकोठडीबरोबर जगण्याचे शोधून काढलेले मार्ग हे उपचारतंत्र प्रभावी आहे यात शंकाच नाही कारण मानसिक समस्यांची विस्तृत श्रेणी ते हाताळू शकते.

सुस्पष्ट आणि आखीव दृष्टिकोन अधिक संयम हे सोबतीला असले तर व्यक्ती नक्कीच परतून येते आणि तळघर कायमचे बंद करता येते. हे निदान आणि नेमके उपचार कसे करावे लागतात, हे पुढील भागात बघू या...

---

**बाळाला जन्म देणे हा एका आईच्या आयुष्यातील सर्वांत अद्वितीय आणि भावनिक अनुभव असतो. गर्भधारणेच्या क्षणापासून ते बाळाच्या पहिल्या रडण्यापर्यंतची ही वाटचाल आईसाठी आनंद, आशा, प्रेम आणि वेदना यांचा संगम. आईच्या पोटात वाढणाऱ्या बाळाची प्रत्येक हालचाल, प्रत्येक ठोका, प्रत्येक स्पर्श तिच्या आत्म्याला स्पर्शून जात असतो. ती बाळाला पाहण्याची, मिठीत घेण्याची स्वप्ने पाहते आणि तेच तिच्या सहनशक्तीचे बळ ठरते.**

# आविष्कार की संस्कार?


वेधक
ओंकार मुळ्ये

थोड्यात सांगायचे, तर बाळाला जन्म देणे म्हणजे आईच्या डोळ्यांतून ओघळणारा आनंदाश्रू, हृदयात उसळणारे निस्वार्थ प्रेम आणि आत्म्याला मिळणारी एक विलक्षण पूर्ती असते. म्हणूनच तर मातृत्व हे एक वरदान मानले जाते. पण, आता विज्ञान एवढ्या प्रगतीच्या टप्प्यावर येऊन पोहोचले आहे की, येत्या काळात बाळाच्या जन्मासाठी स्त्रीच्या गर्भाशयाची गरजच भासणार नाही, असे काहीसे चित्र आता तयार झाले आहे. होय, कारण आता ही जबाबदारी चक्क एक रोबोट पार पाडणार आहे. ऐकायला जरी हे अगदी विचित्र आणि तितकेच अजब वाटत असले, तरी सत्य हेच की, येत्या काळात चीन या दिशेने झपाट्याने तयारी करत आहे आणि लवकरच तिथे माणसांऐवजी रोबोटच्या मदतीने कदाचित बाळ जन्माला येऊ शकते.

आज विज्ञान इतके पुढारले आहे की, बाळाला जन्म देण्यासाठी आईच्या गर्भाशयाची गरजच उरणार नाही, असे भविष्य आपल्या दाराशी येऊन उभे ठाकले आहे. चीनमधील 'कैवा टेक्नोलॉजी'चे संस्थापक डॉ. झांग किफेंग यांनी नुकतेच 'वर्ल्ड रोबोट कॉन्फरन्स'मध्ये सांगितले की, ते 'ह्यूमनॉईड प्रेग्नन्सी रोबोट' तयार करत आहेत, ज्यामध्ये कृत्रिम गर्भाशय असेल. या रोबोटच्या गर्भाशयात अगदी आईच्या पोटी होणार्या बाळासारखेच बाळ वाढेल. त्यासाठी कृत्रिम ॲम्नियोटिक फ्लूईड आणि पोषणद्रव्यांची खास व्यवस्था असेल, जी गर्भधारणेपासून बाळ जन्मेपर्यंत त्याच्या वाढीला मदत करेल. २०२६ साली या तंत्रज्ञानाचा पहिला नमुना (प्रोटोटाईप) बाजारात येणार असून, त्याची किंमत सुमारे १२ लाख रुपये असणार आहे. यामुळे सरोगेसीपेक्षा खूप कमी खर्चात आणि कायदेशीर अडचणींशिवाय बाळ जन्माला येऊ शकेल. ही संधी नैसर्गिकरित्या गर्भधारणा न करू शकणार्या लाखो जोडप्यांसाठी आशेचा किरण ठरू शकते, हे मात्र खरेच आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून हा जरी आविष्कार असला, तरी मातृत्वाच्या दृष्टिकोनातून हा तितकाच गंभीर विषय आहे. कारण, भारतीय संस्कृतीनुसार गर्भसंस्कार म्हणजे आईच्या विचारांचा, भावना, आहार आणि जीवनशैलीचा परिणाम बाळावर होतो. आई जे ऐकते, बोलते, वागते त्याचा थेट प्रभाव बाळाच्या मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासावर पडतो. त्यामुळे गर्भाशय हे फक्त जैविक वाढीसाठी नाही, तर संस्कारांच्या पाळण्यातल्या पहिल्या शाळेसारखे असते.

'ह्यूमनॉईड प्रेग्नन्सी रोबोट'मध्ये बाळाची शारीरिक वाढ एकवेळ विज्ञानाच्या मदतीने व्यवस्थित होऊ शकेलही; परंतु त्या काळात बाळाला मिळणारा मानसिक, सांस्कृतिक, संवेदनशील स्पर्श ते कृत्रिम गर्भाशय कधीच देऊ शकणार नाही. म्हणजे विज्ञान बाळ जन्माला घालू शकते. पण, आईच्या गर्भातले संस्कार आणि भावनिक नाते हे तंत्रज्ञानाने निर्माण करता येणे सर्वस्वी अवघडच! कदाचित भविष्यकाळात संशोधक बाळावर ध्वनी, प्रकाश, वाचन, संगीत अशा माध्यमांतून कृत्रिम गर्भात काही 'संस्कार' आयते पेरण्याचाही प्रयत्न करतील. पण, आईच्या अंतःकरणातून येणारा प्रेमस्पर्श, ममत्वभाव हा कुठल्याही तंत्रज्ञानाने कधीही नक्कल करता येणारा नाही, हे देखील समजून घ्यायला हवे. बाळाचे शरीर जरी विज्ञान घडवू शकत असले, तरी मन आणि आत्मा मात्र आईच घडवते. चीनचा हा प्रयोग विज्ञानाचा चमत्कार असला, तरी भविष्यात मानवी समाजासाठी एक मोठा कौटुंबिक, सामाजिक प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे एकीकडे अकल्पित प्रगतीचा स्वीकार करताना, दुसरीकडे संस्कार आणि संस्कृतीची वीण कायमची उसवली जाणार नाही, याची काळजी घेणे, हेच खरे मानवजातीसमोरील आव्हान!

---



# पुतिन यांची मुत्सद्देगिरीने ट्रम्प यांची केलेली पंचाईत!



परराष्ट्रकारण
प्रसन्न आठवले
भ्र.९०४९३५३८०९

दोन बलाढ्य देशांचे राष्ट्राध्यक्ष काल अलास्कामध्ये भेटले त्यांच्या युकरियन बाबत थोडक्यात संबंधी चर्चा झाली त्यानंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी सात- आठ मिनिटांचं छोटं ब्रीफिंग उपस्थित मीडियासमोर केलं. त्यामध्ये त्यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. पण या सर्व कुशनमध्ये त्यांनी मुख्य मुद्दा एका पॅरेग्राफमध्ये मांडला, जो मी खाली इंग्रजीत उद्धृत करत आहे.

at the same time, we're convinced that in order to, to make the settlement lasting and long term, we need to eliminate all the primary roots, the primary causes of that conflict, and we've said it multiple times, to consider all legitimate concerns of Russia and to reinstate a just balance of security in Europe and in the world on the whole.

यातून निर्माण होणारे मुद्दे, आपल्याला पुतीन यांना exactly काय म्हणायचं आहे ते सांगतील.

1. What are primary roots and primary causes of conflict, he is referring.

-. Primary roots / primary causes of the conflict

पुतीन इथे युक्रेन युद्धाच्या मूळ कारणांकडे निर्देश करत आहेत. त्यांच्या दृष्टिकोनातील मूळ कारणं अशी आहेत की-

N-TO चा विस्तार: रशियाला सर्वात मोठा धोका वाटतो की N-TO हळूहळू पूर्व युरोपमध्ये वाढत गेलं आणि युक्रेनलाही N-TO मध्ये सामील करून घेण्याचे संकेत दिले गेले.

**युक्रेनमधील पश्चिम समर्थक सरकार**: २०१४ मधील Maidan revolution नंतर युक्रेनमध्ये पश्चिमाभिमुख सरकार आलं, जे रशियाच्या मते अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे घडलं. (२०१३- २०१४ मध्ये युक्रेनमध्ये अरब स्प्रिंगसारखं आंदोलन झालं आणि सत्ता रशिया धार्जिण्या सरकारकडून युरोप अमेरिका प्रणित सरकारकडे आली.)

**रशियन-भाषिक लोकांची स्थिती:** युक्रेनच्या पूर्व भागात (डोनबास, लुहान्स्क) आणि क्रिमियामध्ये रशियन वंशाचे/ रशियन भाषिक लोक आहेत. त्यांच्यावर अन्याय, भेदभाव किंवा हल्ले झाले, असा रशियाचा दावा आहे.

**सुरक्षा व लष्करी दबाव:** युक्रेनमधील अमेरिकन व पाश्चात्य शस्त्रसाठा आणि लष्करी तळ हे रशियासाठी थेट सुरक्षा धोका आहेत. म्हणजे पुतीन म्हणतात की फक्त युद्ध थांबवणं म्हणजे तोडगा नाही, तर या मूळ कारणांचं निराकरण हे झालंच पाहिजे. तरच त्यांना युद्ध थांबवण्यात रस असेल.

२. What are all legitimate concerns of Russia

B. -ll legitimate concerns of Russia

रशियाच्या दृष्टीने योग्य चिंता (legitimate concerns) म्हणजे:

N-TO **विस्तार थांबवणं:** युक्रेनला N-TO सदस्य बनू न देणे. २००४ मधील मोठ्या विस्तारात नाटो ने रोमानिया, बल्गेरिया, स्लोवाकिया, स्लोव्हेनिया या पूर्व कम्युनिस्ट आणि एस्टोनिया, लॅटिव्हिया आणि लिथुआनिया या पूर्व USSR सदस्यांना नाटोमध्ये सामील करून घेण्यात आले. हा पुतीन यांना पहिला धक्का होता.

**सुरक्षा हमी:** रशियाच्या सीमेवर कोणतेही N-TO शस्त्र/ क्षेपणास्त्र/ सैनिकी तळ नकोत. विस्तारित नाटोच्या पूर्व युरोपीय भागात प्रशिक्षण, कवायती या नावाने या आधीच नाटोने शस्त्र, सैनिक तळ, क्षेपणास्त्रे, इत्यादींची जमवाजमव केली आहे. त्यात आता युक्रेनमध्ये नाटो आली की, US- व नाटोचा धोका रशियाच्या दारात येणार, हे सांगायला ज्योतिषाची आवश्यकता नाही.

**रशियन भाषिक नागरिकांचे हक्क:** युक्रेनमधील रशियन लोकांना सांस्कृतिक, भाषिक, राजकीय अधिकार देणे. त्यांच्यावर युक्रेनमध्ये अन्याय व अत्याचार होतात असा पुतीन यांचा दावा आहे.

**क्रिमियाची मान्यता:** क्रिमिया २०१४ मध्ये रशियाने जोडून घेतला. रशियाला हवं आहे की जग व युक्रेन यांनी हे मान्य करावं. युरोपमधील सुरक्षा व्यवस्था पुन्हा तयार करणे: म्हणजे अमेरिकेचा एकतर्फी प्रभाव कमी होऊन रशियालाही समान शक्ती मिळावी. नाटोचा विस्तार सिमित करून रशियाचा स्व संरक्षण हक्क मान्य व्हावा.

३. What he meant by just balance of security in Europe and the world on the whole.

C. Just balance of security in Europe and the world

**पुतीन यांच्या दृष्टीने याचा अर्थ:** आजचा सुरक्षा व्यवस्थेचा ढाचा (Security -rchitecture) अमेरिकाकेंद्रित आहे. N-TO, युरोपियन युनियन, पाश्चिमात्य गठबंधन यांच्या हातात नियंत्रण आहे. रशियाला वाटतं की हे असंतुलित आहे. कारण त्यात रशियाच्या सुरक्षेचा विचार होत नाही. किंबहुना रशियाला या व्यवस्थेचा धोका जास्त आहे. या चिंतेचा विचार व्हायलाच हवा. म्हणजेच नाटोने आता अधिक विस्ताराची आपली भूमिका सोडून द्यावेत.

Just balance म्हणजे - अमेरिका/नाटो, युरोप आणि रशिया यांच्या सुरक्षेच्या चिंता समानपणे मान्य होणे. रशियाचा स्व संरक्षण हक्क मान्य व्हावा. जागतिक स्तरावर- आशिया, मध्यपूर्व, आफ्रिका या ठिकाणीही अमेरिकेचा एकतर्फी हस्तक्षेप कमी होऊन बहुध्रुवीय विश्वव्यवस्था (Multipolar world order) यायला हवी. मोदी पुतीन आणि BRICS चा तोच प्रयत्न आणि उद्देश आहे की, एकदेशीय सत्ता केंद्र बदलून बहुद्देशीय, बहुधृवीय विश्वव्यवस्था असावी. यातून एक गोष्ट जाणवते ती म्हणजे मोदींप्रमाणे पुतीन सुद्धा खूप पुढील विचार करतात.

पाक, तुर्कस्थानमध्ये आपली आण्विक अस्त्र पार्क करून रशियाच्या जवळ उभ्या असलेल्या धोक्याला, युरोपातून अजून पुढे नेऊ इच्छिणारा नाटो गट, रशियाला अजून एका बाजूने घेरणार आहे. जी गोष्ट भविष्यात रशियाला सुरक्षेच्या दृष्टीने नक्कीच धोकादायक आहे. म्हणूनच स्वतःच्या सुरक्षेचा विचार करण्याचा, कोणत्याही सार्वभौम देशाच्या हक्काचा विचार व्हायलाच हवा. या भेटीतून पुतीन यांनी आपली जगातील पकड, प्रभा अजून विस्तारित केली. त्याचप्रमाणे अमेरिकेने विशेषतः ट्रम्प यांनी चालवलेला टॅरीफचा खेळ आणि त्यातून रशियाला बाटलीत उतरवण्यात आपण यशस्वी होऊ या ट्रम्प यांच्या योजनेला, पुतीन यांनी वाटण्याच्या अक्षता देऊन परस्पर सुरुंग लावला आहे.

ट्रम्प यांना रशियाचा मुख्य मुद्दा सांगून, त्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी चर्चा होणार असेल, तर आपण तयार आहोत, हे गळी उतरवण्यात पुतीन यशस्वी झाले. म्हणजेच स्वतःच्या नोबेल पुरस्काराची चिंता करणाऱ्या ट्रम्प यांना आता युरोप, नाटो, झेलेंस्की या तिघांशी बोलण्यासाठी बाध्य करून, अजून काही काळ युद्ध काही थांबणार नाही, असा मस्त संदेश युरोप, नाटो व शेजारी झेलेंस्की यांना दिला आहे. त्याचप्रमाणे पुतीनला पटवणं ही इतकं सोप्प नाही, हे देखील, झेलेंस्कीला, ट्रम्प मार्फत सांगितलं आहे. अर्थात ट्रम्प यांची इच्छा अर्धवट पूर्ण झाल्यामुळे माझ्या अंदाजानुसार, टॅरिफचा राक्षस परस्पर मारण्यात पुतीन यशस्वी झाले आहेत. त्यांनी मोदींना व भारताला यातून सध्यातरी बाहेर काढलं आहे. ट्रम्प हे युरोप, नाटो व झेलेन्स्की यांना पुतीन मुद्दा पटवून दिल्याशिवाय, ट्रम्प यांना टॅरीफच्या राक्षसाला सध्यातरी बाटलीत बंद करून ठेवावाच लागेल. त्याचवेळी इकडून मोदींनी त्याच दिवशी काही तासांपूर्वी भारत, आपल्या देशाच्या हिताशी कोणतीही तडजोड स्वीकारणार नाही, असा सज्जड दम वजा संदेश ट्रम्प यांना दिला आहे. त्यामुळे रशिया व भारत अर्थात पुतिन आणि मोदीजी या सद्य स्थितीतील सर्वात बलाढ्य नेत्यांनी ट्रम्प यांचा मामा केला आहे, असच चित्र दिसत आहे.

या दोघांच्या नादी लागून ट्रम्पने स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. म्हणजेच आजचा हा शिखरभेटीचा खेळ फक्त युक्रेन पुरता मर्यादित न ठेवता, पुतीन यांनी त्याला जागतिक सामरिक समीकरणं बदलण्याच्या खेळात परिवर्तित केला आणि आपल्या प्रतिमेचा व्यास विस्तारित नेला.



**भारतावर प्रचंड आयात शुल्क लावल्यानंतर चीनने अमेरिकेवर टीका करत भारताची बाजू उचलून धरली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने चीन दौऱ्याचे सूतोवाच करताच चीनने पायघड्या घालण्याचेच बाकी ठेवले. एकंदरीत, अमेरिकेचे महत्त्व कमी करण्यासाठी चीन भारताला आपल्या जवळ घेऊ पाहात आहे. मात्र चीनने भारताची पाठराखण का करतोय हे तपासत आपण सावध असायला हवे.**

# पुन्हा हिंदी- चिनी भाऊ भाऊ!

दखल
उर्मिला राजोपाध्ये

अलिकडेच चीनने अमेरिकेच्या आयात शुल्काबाबत भारताने घेतलेल्या कठोर भूमिकेचे कौतुक केले. चीनचे सरकारी वृत्तपत्र असलेल्या 'ग्लोबल टाईम्स'ने आपल्या संपादकीयामध्ये भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. 'मोदी चीन दौऱ्यावर येत आहेत, ही खूप मोठी आणि चांगली गोष्ट आहे. याचा फायदा चीन आणि भारताला होईल. यामुळे संपूर्ण प्रदेशात शांतता आणि स्थिरता वाढेल. पुन्हा एकदा चीन आणि भारत भाऊ होतील' असे म्हणत 'ग्लोबल टाईम्स'ने लिहिले की, कठीण काळात भावाला मदत करणे स्वतःसाठीदेखील फायदेशीर आहे.

'ग्लोबल टाईम्स'च्या संपादकीयाला ट्रम्प यांच्या भारतावरील टॅरिफचा संदर्भ होता. भारतातील चीनचे राजदूत झू फेहोंग यांनी ट्रम्प यांच्या 'टॅरिफ'ला विरोध केला होता आणि ट्रम्प यांची भूमिका जागतिक व्यापार कराराच्या नियमांविरुद्ध असल्याचे म्हटले होते. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मोदी यांच्या चीन भेटीच्या निर्णयाचे स्वागत केले आणि म्हटले की, ही भेट दोन्ही देशांना जवळ आणेल. रशिया, चीन आणि भारत यांच्यातील वाढत्या जवळिकीमुळे ट्रम्प चिंतेत आहेत. त्यांनी भारताबद्दल आपली भूमिका कठोर केली आहे. या महिन्यात अमेरिकेचे एक पथक व्यापार करारावर चर्चा करण्यासाठी भारत दौऱ्यावर येणार होते; पण ट्रम्प यांनी 'टॅरिफ'चा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत भारताशी व्यापार करारावर चर्चा करणार नाहीत, अशी भूमिका घेतली आहे. त्यांनी मोदींना चिथावण्याचा बराच प्रयत्न केला; पण मोदी यांनी न झुकता आपली प्रतिष्ठा राखली. ट्रम्प यांनी भारतावर सतत दबाव आणण्याचा प्रयत्न केला, वारंवार धोरण बदलले; परंतु भारताच्या स्वाभिमानाशी कोणतीही तडजोड केली गेली नाही.

डोनाल्ड ट्रम्प भारताला रशियाकडून तेल खरेदी न करण्याची धमकी देत राहिले. चीनला सवलती देत राहिले; पण मोदी यांनी संकटाचे संधीत रूपांतर केले. भारत, चीन आणि रशिया यांनी एक आघाडी केली, तर तिघे मिळून ट्रम्प यांच्या 'टॅरिफ साम्राज्या'ला संपवू शकतात. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ज्या चीनशी भारताचा वाद होता, तो आता ट्रम्प यांच्यामुळे मोदी आणि भारताच्या बाजूने बोलू लागला आहे. अमेरिकेच्या करविरोधात राजकीय मुत्सद्देगिरी स्वीकारत मोदी चीन आणि जपानच्या दौऱ्यावर जात आहेत. ते चीनमध्ये शी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेऊ शकतात. पंतप्रधान मोदी ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चीनमध्ये असतील. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारत- चिनी सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षानंतर मोदी पहिल्यांदाच चीनला भेट देणार आहेत.

पंतप्रधान म्हणून ते सहाव्यांदा चीन दौऱ्यावर जात आहेत. २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी २०१५, २०१६, २०१७, २०१८ मध्ये चीन-ला भेट दिली आहे. याशिवाय, भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांची शेवटची बैठक ऑक्टोबर २०२४ मध्ये रशियातील काझान येथे झालेल्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेदरम्यान झाली होती. मोदी यांच्या चीन दौऱ्याचा आणि 'एससीओ' शिखर परिषदेत सहभागी होण्याचा उद्देश प्रादेशिक सुरक्षा, दहशतवाद आणि व्यापार यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करणे आहे.

भारत- चीन संबंधांमध्ये स्थिरता आणण्यासाठी द्विपक्षीय चर्चेवर लक्ष केंद्रित करणे हा या भेटीचा उद्देश आहे. एकंदरीत, भारत-चीन संबंधांना नवी दिशा देण्याच्या आणि सीमावाद सोडविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गलवान संघर्षानंतर तणावपूर्ण राहिलेले भारत-चीन संबंध सुधारण्याच्या दिशेने ही भेट एक मोठे पाऊल मानले जाते. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारत-चीन सैनिकांच्या चकमकीनंतर दोन्ही देशांमधील शत्रुत्व अगदीच शिगेला पोहोचले. शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) २५ व्या बैठकीत सहभागी होऊन मोदी प्रादेशिक सुरक्षा, दहशतवाद आणि व्यापार यासारख्या मुद्द्यांवर करार करू शकतात.

द्विपक्षीय बैठकीत भारत-चीन सीमा तणाव कमी करण्यावर आणि परस्पर सहकार्य वाढविण्यावर चर्चा होऊ शकते. व्यापार युद्ध आणि जकातीच्या वादाच्या पृष्ठभूमीवर, ही भेट भारताची राजनैतिक स्थिती मजबूत करण्यासाठी जागतिक व्यासपीठावर आवाज उठवण्याची सुवर्णसंधी प्रदान करेल. भारत पाश्चात्त्य देशांसोबत सहकार्य वाढवत असल्याने चीनचा दौरा रशियासोबतच्या संबंधांमध्ये संतुलन साधण्याची संधीदेखील आहे. लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील तणाव कमी करण्याचे प्रयत्न अधिक मजबूत होऊ शकतात.

भारत आणि चीन व्यापार तूट आणि आर्थिक सहकार्याच्या मुद्द्यावर चर्चा करू शकतात. मोदी यांच्या चीन दौऱ्यामुळे आर्थिक सहकार्य आणखी मजबूत होऊ शकते. भारत हिंद महासागरात चीनच्या वाढत्या प्रभावाला संतुलित करण्यासाठी रणनीतीवर काम करत आहे. या भेटीमुळे भारताला प्रादेशिक आणि जागतिक व्यासपीठांवर आपले स्थान मजबूत करण्याची संधी मिळेल.

भारत आणि अमेरिकेतील संबंध गेल्या काही दशकांमधील सर्वात खालच्या पातळीवर पोहोचले आहेत. अमेरिकेसोबतच्या तणावाच्या पृष्ठभूमीवर मोदी चीनला भेट देणार आहेत. जून २०२० मध्ये गलवानमध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या चकमकीनंतर भारत आणि चीनदरम्यानचे संबंध कमालीचे दुरावले. या चकमकीनंतर दोन्ही देशांनी एकमेकांना अटकाव घालण्यासाठी अनेक कठोर पावले उचलली. पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे चीन आणि भारत यांच्यातील संबंधांवरचा बर्फ वितळत असल्याचे दिसून येत आहे.

'स्पुटनिक इंडिया' संस्थेच्या अहवालात म्हटले आहे की, भारत आता चीनशी जवळीक साधत आहे आणि ते अमेरिकेमुळे होत आहे. मोदी चीनमध्ये होणाऱ्या 'एससीओ' शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. तथापि, त्यांच्या निर्णयाकडे चीनकडे झुकणे किंवा अमेरिकेविरुद्ध सूडाची कारवाई म्हणून पाहिले जाऊ नये. ते केवळ भारताची धोरणात्मक स्वायत्तता दर्शवते. ट्रम्प यांच्या टॅरिफ निर्णयामुळे भारताचा अमेरिकेसोबतचा तणाव वाढला आहे; परंतु भारत 'एससीओ'मधील सहभागाचा वापर सौदेबाजीचे साधन म्हणून करत नाही. चीन आणि भारत यांच्यात स्पर्धा आहे. चीनकडे झुकण्याऐवजी किंवा अमेरिकेपासून दूर राहण्याऐवजी भारत जटिल भू-राजकीय परिस्थिती स्वतंत्रपणे हाताळण्याचा प्रयत्न करत आहे. तथापि, भारत- चीनचे घनिष्ठ संबंध अर्थपूर्णरीत्या प्रत्यक्षात येणे अमेरिकेचे इंडो-पॅसिफिक गणित निश्चितच गुंतागुंतीचे करेल. अमेरिका आणि ट्रम्प यांच्यासमोर भारत झुकणार नाही. असे असले तरी भारत- चीन सहकार्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगली पाहिजे. दोन्ही देश अजूनही एकमेकांना प्रतिस्पर्धी मानतात आणि संयुक्त आघाडी तयार करण्याऐवजी प्रतिस्पर्ध्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिखर परिषदेचा वापर करत आहेत.

गलवान खोऱ्यातील चिनी सैनिकांच्या घुसखोरीनंतर दोन्ही देशांमधील संबंध सर्वात खालच्या पातळीवर आले. तथापि, आता त्यात सुधारणा होताना दिसत आहे. भारत आणि चीनमध्ये शत्रुत्व असूनही अलिकडच्या काळात संबंधांवरील बर्फ वितळताना दिसत आहे. ट्रम्प यांनी भारतावर कर लादण्याच्या घोषणेनंतर चीनने तीव्र नाराजी व्यक्त करीत नवी समीकरणे बनविण्याच्या उद्देशाने काही विधाने केली. चीनच्या मते अमेरिका इतर देशांना दडपण्यासाठी कर लादत आहे. आता दोन्ही देश रशियासह ट्रम्प यांना प्रत्युत्तर देऊ शकतात, अशी चर्चा आहे. 'एससीओ' शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी यांची उपस्थिती युरेशियामध्ये बहुपक्षीय राजनैतिकतेसाठी भारताची सतत वचनबद्धता दर्शवते. या भेटीमुळे भारताला प्रादेशिक सुरक्षा, दहशतवाद आणि व्यापार सहकार्य यासारख्या मुद्द्यांवर आपले मत व्यक्त करण्याची संधी मिळेल. मोदी यांचा चीन दौरा अमेरिकेला स्पष्ट संदेश देईल की, भारत त्याच्या परराष्ट्र धोरणात कोणत्याही एका गटापुरता मर्यादित नाही. अमेरिकेच्या दबावाखाली भारत आपल्या हितांशी तडजोड करणार नाही. मोदी यांच्या चीन दौऱ्यामुळे ट्रम्प यांच्यावर थेट दबाव वाढू शकतो.

नुकतेच २०२३ मध्ये निर्माण झालेल्या चित्रपटासाठींचे राष्ट्रीय आणि राज्य चित्रपट पुरस्कार जाहीर झाले. चित्रपटात उल्लेखनीय आणि दर्जेदार कामगिरी केल्याबद्दल हे पुरस्कार दरवर्षी दिले जातात. चित्रपट क्षेत्रात अनेक वर्षं कार्यरत असलेल्या तज्ज्ञ तसेच समीक्षक यांच्या समितीने निवड केलेले पुरस्कार कोणाला मिळणार? याबद्दल चित्रकर्मी आणि रसिकांमध्ये नेहमीच उत्सुकता असते. पुरस्कारांची घोषणा झाली की विजेत्यांच्या अभिनंदनाबरोबरीनेच नाराजीचे सूरदेखील उमटतात. आता घोषित झालेले पुरस्कारही याला अपवाद ठरले नाहीत.

सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार यावेळी 'जवान' चित्रपटासाठी शाहरुख खानला विक्रांत मेसी या गुणी कलाकारासोबत विभागून मिळाला. विक्रांत मेसीने विधू विनोद चोप्रा यांनी दिग्दर्शित केलेल्या 'ट्वेल्थ फेल' या चित्रपटात केलेल्या भूमिकेचं कौतुक चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा झालंच होतं. राष्ट्रीय पुरस्काराने त्यावर शिक्कामोर्तब केलं. शाहरुखला 'जवान'सारख्या तद्दन व्यावसायिक चित्रपटातील भूमिकेसाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, या बातमीने अनेकांच्या भुवया उंचावल्या. शाहरुख खानने याआधी स्वदेश, चक दे इंडिया यासारख्या चित्रपटात उत्तम अभिनयाचे प्रदर्शन केले आहे, त्यावेळी त्याचा या पुरस्कारासाठी विचार झाला नाही. मग 'जवान'मधील तुलनेने सामान्य असलेल्या भूमिकेसाठी त्याला हा पुरस्कार का दिला जावा? शाहरुखने चित्रपटसृष्टीत अनेक दशके सुपरस्टार हे बिरूद टिकवल्यानंतरही तो राष्ट्रीय पुरस्कारापासून वंचित राहिल्याने त्याला यावेळी हा सन्मान देण्यात आलाय का? असा टीकेचा सूर लावण्यात आलाय.

अमिताभ बच्चन यांना 'अग्निपथ'साठी राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला होता, तेव्हासुद्धा याच प्रकारची टीका करण्यात आली होती. शाहरुख असो की अमिताभ, हे दोघेही अभिनेते त्यांच्या वाट्याला आलेल्या भूमिकांचे सोनं करतात. त्यामुळे 'जवान' किंवा 'अग्निपथ' हे चित्रपट सामान्य दर्जाचे असले, तरीही या अभिनेत्यांच्या अभिनयाचे मूल्यमापन करताना निवड समितीने त्यांचा विचार पुरस्कारासाठी केला, असे समर्थन दुसऱ्या बाजूने करण्यात आलंय.

## पुरस्कारांचे गणित

घोषित झालेले पुरस्कार योग्य की अयोग्य? त्यात काही डावं- उजवं होतं का, या प्रश्नांची उत्तरं शोधताना ही निवड प्रक्रिया कशी असते ते जाणून घेणं सयुक्तिक ठरेल. दरवर्षी भारतात दोन हजारांहून अधिक चित्रपट आणि त्याहून अधिक संख्येने लघुपट, माहितीपट सेन्सॉर होत असल्याने राष्ट्रीय पुरस्कारासाठी येणाऱ्या प्रवेशिका असंख्य असतात. त्यातून सर्वोत्तम चित्रपटांची निवड करणे हे खरं तर मोठ्या जिकिरीचे काम आहे. यासाठी प्रादेशिक स्तरावर निवड समित्या नेमल्या जातात. या निवड समिती सदस्यांनी शिफारस केलेले चित्रपट अंतिम फेरीतील १० परीक्षक पाहतात आणि त्यातून वेगवेगळ्या विभागातील पुरस्कार निवडले जातात. या १० सदस्यांच्या समितीचा एक अध्यक्ष असतो. त्याच्या मताला स्वाभाविकच जास्त वजन असते. कोणतेही पुरस्कार हे कधीच वस्तुनिष्ठ नसतात, हे सत्य आपण लक्षात घ्यायला हवे. समितीमधील परीक्षकांचा दृष्टिकोन आणि सहभागी झालेल्या कलाकृतींचा दर्जा यावर पुरस्कार ठरत असतात. परीक्षक हे चित्रपट क्षेत्रात कार्यरत असल्याने त्यांच्या वैयक्तिक आवडी-निवडीचे प्रतिबिंब पुरस्कारांवर पडणे स्वाभाविक असते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सांस्कृतिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी साहित्य, नाट्य, संगीत अकादमीची स्थापना झाली. चित्रपट उद्योग मात्र संघटित नसल्याने तिथे निर्माण होणाऱ्या दर्जेदार कलाकृतींना पुरस्कार देण्याची योजना अंमलात आणली गेली. १९५४ साली चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्कार सुरू झाले. सर्वोत्तम भारतीय चित्रपटाचा पहिलाच पुरस्कार आचार्य अत्रेंच्या 'श्यामची आई'ला मिळाला. त्यानंतर मात्र मराठी चित्रपटाला हे सुवर्ण कमळ मिळविण्यासाठी तब्बल ५० वर्षे जावी लागली. २००४ मध्ये संदीप सावंत यांच्या 'श्वास'ने हा पुरस्कार मिळविला. त्या नंतरच्या काळात मात्र 'देऊळ' दिग्दर्शक उमेश कुलकर्णी, 'कोर्ट' दिग्दर्शक चैतन्य ताम्हणे, 'कासव' दिग्दर्शक सुमित्रा भावे, सुनीला सुकथनकर या मराठी चित्रपटांनी सुवर्ण कमळ मिळवून मराठीत होत असलेल्या प्रयोगांची दखल राष्ट्रीय पातळीवर घ्यायला लावली. २०२३ चा सर्वोत्तम मराठी चित्रपट म्हणून सुजय डहाकेच्या 'श्यामची आई'ला पुरस्कार जाहीर झाला, हा एक आनंदी योगायोग आहे. एकाच साहित्यकृतीवर आधारित चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळण्याची ही एकमेव घटना असावी. कोविडच्या संकटाआधी राष्ट्रीय आणि राज्य पुरस्कार हे नियमितपणे मे महिन्यात जाहीर होऊन त्यांचे वितरण केले जायचे. २०२० नंतर मात्र पुरस्कारांचे हे वेळापत्रक विस्कळीत झाले. पुरस्कारासाठी प्रवेशिका मागवून त्यांचे वितरण करण्यापर्यंत साधारण सहा महिन्यांचा कालावधी लागतो. या यंत्रणेत शेकडो माणसे गुंतलेली असतात. या कारणांमुळे नुकतेच २०२३ साली सेन्सॉर झालेल्या चित्रपटांना पुरस्कार जाहीर आले. पुढील वर्षापर्यंत ही प्रक्रिया सुरळीत होईल. कोणते चित्रपट पुरस्काराच्या शर्यतीत आहेत याचे काही अंदाज बांधले जात असले, तरीही ते प्रत्येक वेळी खरे ठरतील असं होत नाही. राष्ट्रीय आणि राज्य पुरस्कार एकाच वेळी घोषित होत असल्याने अनेकदा अनपेक्षित निकाल हाती येतात. सर्वोत्तम मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळवणारा 'बार्डो'सारखा चित्रपट राज्य पुरस्काराच्या अंतिम यादीत नव्हता तर 'कोर्ट'ने आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळवून राज्य पुरस्कारासाठी प्रवेशिका दाखल न केल्याने तो राज्य पुरस्कारांपासून वंचित राहिला होता. पुरस्कार नेहमीच कलाकाराला अधिक चांगलं काम करण्याची प्रेरणा देतात, समाजात प्रतिष्ठा मिळवून देत असतात. मात्र पुरस्कार नाही मिळाला म्हणून कलाकाराच्या कामाचं मोल कमी होत नाही. प्रेक्षकांचा प्रतिसाद हाच खरा पुरस्कार हे कलाकारांनी कायम लक्षात ठेवायला हवं.

(लेखक चित्रपट समीक्षक आहेत.)

# 'एआय'वरील अतिनिर्भरता घातकच!

**'एआय' तुमचा डॉक्टर, मानसोपचारतज्ज्ञ, वकील किंवा डायरी नाही! 'चॅट जीपीटी'चे सीईओ सॅम अल्टमन यांनी काही दिवसांपूर्वी केलेले वक्तव्य वरवर पाहता सल्ला देणारे असले, तरीही 'एआय'वर असणारे लोकांचे अति अवलंबित्व हा सर्वार्थाने पुढील काळात चिंतेचा विषय असणार आहे. त्याबद्दलचे हे आकलन...**

आकलन
तेजस परब

प 'चॅट जीपीटी' किंवा तत्सम सुविधा देणाऱ्या 'एआय' टूल्सचा वापर हा, गोपनीयतेच्या अधिकारात येत नाही. अर्थात डॉक्टर, मानसोपचारतज्ज्ञ आपल्या रुग्णांबद्दलची माहितीही गोपनीयतेच्या अंतर्गत येत नाहीत. अशी माहिती न्यायालये किंवा कायदेशीर स्थळी रुग्णाच्या इच्छेविरोधात वापरण्यास मनाई असते मात्र, 'एआय'शी संवाद साधताना साठवणूक झालेली माहिती ही या अधिकारांतर्गत येत नाही. त्यामुळे युझर्सच्या गोपनीयतेचा भंग होऊ शकतो. अनेकांना 'एआय' आता आपला खासगी आयुष्यातील मित्र वाटू लागला आहे, याबद्दल समाजमाध्यमांवरही चर्चा होते. मात्र, जागरूकता निर्माण होण्यासाठी नाही, तर खासगी संवाद आणि आयुष्यातील अडचणी विचारण्यासाठी चॅटबॉटचा वापर अधिक होत आहे. यामुळे मानसिक स्वास्थही बिघडण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली.

विभक्त होत चाललेली कुटुंबपद्धती, वाढता एकाकीपणा, नोकरी किंवा शिक्षणानिमित्त शहरांमध्ये राहताना एकटे झालेली सवय यातूनच सुरू झालेल्या या गोष्टी आहेत. अगदी साधा ई-मेल करण्यापासून असो वा एखाद्या ऑफिसमध्ये बैठकीत सादरीकरणाचा विषय असो, हल्ली सर्हास 'चॅटबॉट एआय'चा आधार घेण्याकडे सर्वसामान्यांचा कल असतो. त्याशिवाय 'एआय' कंपन्या सोशल मीडिया इन्फ्लूएर्न्सना त्यांच्या टूलचे प्रमोशन करण्यासाठी आशयनिर्मितीही करतात. त्यामुळे याबद्दल स्वतः कंपनी सीईओ यांनाच भूमिका मांडावी लागली.

'एआय' आणि 'चॅटबॉट'चा वापर हा मानवाच्या कल्पनाशक्तीवरचा आघात करणारा नाही ना? याचाही विचार करावा लागेल. नव्याने येणार्या 'एआय टूल्स' आणि 'चॅटबॉट्स'साठी, भारत हा लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून एक प्रकारे मोठी बाजारपेठच आहे. अमेरिका आणि पाश्चात्य देश भारताकडे बाजारपेठ म्हणूनच पाहतात. ज्याप्रकारे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या महत्त्वाकांशी आयातशुल्क प्रकरणाची चर्चा सध्या जशी जगभर आहे, तशीच भारतीय बाजारपेठ गमावण्याची चर्चाही अमेरिकेतच आहे.

अमेरिकन कंपन्यांवर बहिष्कार वगैरे टाकण्याच्या मोहिमा तीव्र झालेल्या नाहीत, उलट त्यावरून सरकारकडे बोटे दाखवण्याचे काम सुरू आहे. धोरणात्मकरित्या जी भूमिका असेल ती सरकार घेईलच पण, आपणही या गोष्टींवर कोणत्या प्रकारे अवलंबून राहायचे, याबद्दलही मर्यादाही हवीच. अर्थात अशा अवलंबित्वाबाबतच्या गोष्टी एकाएकी होणार नाहीत पण, त्याबद्दलचे सूक्ष्मनियोजन तर सुरू नाही ना याचा कानोसा घेण्याची वेळ आली आहे. काही दिवसांपूर्वी 'मायक्रोसॉफ्ट'च्या तांत्रिक बिघाडामुळे, अचानक जगभरातील विमानांच्या उड्डाणांसहित, रस्ते आणि इतर वाहतुकीवरही परिणाम झाल्याची बातमी आली होती.


आजही 'ट्विटर', 'मेटा', व्हॉट्सअॅपच्या सेवा काही काळासाठी ठप्प झाल्यानंतर जसा गोंधळ उडतो त्यावरून लक्षात येईल की, या सर्व टूल्सवर असलेले अवलंबित्व किती आहे.

चीनसारख्या या देशाला लक्षात आलेल्या या धोयामुळे, अमेरिकेच्या प्रत्येक टूल्स आणि सॉफ्टवेअर कंपन्यांवर त्यांनी बंदीच घातली. अर्थात त्यांनी स्वतःच्या यंत्रणाही उभ्या केल्या. त्यामुळे डेटा हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिलेला नाही. 'चॅटबॉट'मध्येही चीनने स्वतःचे 'डीप-सीक' तंत्रज्ञान उभे करून, जगभरातील 'एआय' क्षेत्राला धक्का दिला होता.

'एआय चॅटबॉट'वर अवलंबून असणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन म्हणून, सीए श्रेया जयस्वाल यांनी एक लिंकडीन पोस्ट लिहिली होती. ज्यात त्यांनी 'चॅटबॉट तुम्हाला तुरुंगात पोहोचवू शकतं,' असे शीर्षकही दिले होते. कारण, सॅम अल्टमनच्या वायाचा उल्लेख करत त्यांनी पुन्हा सांगितले की, जे 'चॅट-जीपीटी'मध्ये लिहिलेले आहे, त्याचा पुरावा म्हणून न्यायालयात त्याचा वापर होऊ शकतो. अर्थात न्यायालयाने तशी परवानगी दिली किंवा तो पुरावा म्हणून सादर झाला, तर त्या व्यक्तीला तुरुंगवास होऊ शकतो. तो कसा? तर समजा एखाद्या युझरने जर मस्करीत जरी त्यावर लिहिले की, मी माझ्या पतीला किंवा पत्नीला धोका दिला आहे, मला आता पश्चाताप होतो आहे मी काय करू? यावर चॅटबॉट हवे ते उत्तर देईल. पण, जर का तो पुरावा युझरच्या साथीदाराला सापडला आणि प्रकरण न्यायालयापर्यंत गेले, तर तक्रारदार हा पुरावा म्हणून सादर करू शकतो. पुढे प्रकरण कायदेशीररित्या पोटगी देण्यापर्यंत जाऊ शकते.

एखाद्याने जर 'एआय'ला प्रश्न विचारला की, इनकम टॅक्समध्ये वाचण्यासाठी पळवाटा काय आहेत? तर टॅक्स ऑडिट किंवा दिवाळखोरी प्रक्रियेतही हा पुरावा म्हणून वापरता येऊ शकतो. एखाद्या कर्मचार्याने कंपनीत कार्यरत असताना, कंपनीच्या ध्येयधोरणांचा उल्लेख करत स्वतःच्याच व्यवसायासाठी काय फायदा होऊ शकतो का? असा प्रश्न विचारला आणि हा पुरावा सापडला, तरीही कंपनीच्या गोपनीयता धोरणांचे उल्लंघन म्हणून कारवाई होऊ शकते, असे जयस्वाल यांनी सांगितले आहे. पुढे त्या म्हणतात, आपण सर्वचजण 'चॅटजीपीटी'शी बोलताना एकदमच मनमोकळेपणे बोलू लागलो आहोत. इतके की, काहीच अंतर बाळगत नाहीत. जसे 'चॅट जीपीटी' एक डायरी, मानसोपचार तज्ज्ञ, मार्गदर्शक किंवा एकदम खास दोस्त असल्यासारखे लोक चॅट करू लागले आहेत. जर तुम्ही न्यायाधीशांसमोर ते वाय बोलू शकणार नसाल, तर अशा गोष्टी त्यात लिहायच्या भानगडीतच पडू नका, असा सबुरीचा सल्लाही त्यांनी दिला आहे.

काही दिवसांपूर्वीच उघडकीस आलेली अनुप कुमार नायर यांची गोष्ट. ५५ वर्षीय नायर यांनी स्वतःला तीन वर्षे घरातच कोंडून घेतले. याक़ाळात जिवंत राहण्यासाठी त्यांनी, केवळ घरपोच अन्न पुरवणार्या अॅपचा आधार घेतला होता. घरातल्यांनी स्वतःचे जीवन संपवल्याने ते चिंताग्रस्त असायचे. त्यांनी बाहेरच्या जगाशी संपूर्ण संबंधच तोडून टाकले होते. जेव्हा त्यांना बाहेर काढण्यात आले, तेव्हा घराची अवस्था विचित्रच होती. ऑनलाईन जगावर अवलंबून राहिल्याचा अतिरेक आणि नैराश्याच्या कारणास्तव त्यांची ही अवस्था झाली. अर्थात आजही आपल्याकडे अशा गोष्टींवर चर्चा होत नाही. मूळात पुरुषांमध्ये तर नाहीच नाही.




मोबाईलचा अतिवापर, जंकफूडचे अतिसेवन, धुम्रपानाचा अतिरेक जितका गंभीर तितकाच गंभीर 'एआय'वरच्या अवलंबित्वाचाही आहे. अर्थात, 'सर्वच काही वाईट' अशातलाही भाग नाही. समाजमाध्यमांवर तयार केला जाणारा सृजनशील मजकूरही तितकाच आवर्जून शेअर करावा, असाच आहे. ज्याप्रमाणे इंटरनेट, संगणक, मोबाईल दुधारी शस्त्र मानले जायचे, त्याचप्रकारे 'एआय'चेसुद्धाही आहे.

वापरणारा त्याचा वापर कशाप्रकारे करतो, यावरही बर्याच गोष्टी अवलंबून आहेत. त्यामुळे 'एआय'पेक्षा कधीकधी सदसद्विवेकबुद्धीचा वापरही महत्त्वाचा.